म.ग्र.सं. ठाणे
विषय : ........
५/१०
REFBK-0021999

विश्वसंशोधन माला

# दक्षिण अमेरिकेचा शोध

ह. अ. भावे

REFBK-0021999

सरिता प्रकाशन

'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

प्रकाशक :

सौ. मंदाकिनी भावे
सरिता प्रकाशन
३९७/१ 'वरदा', सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११०१६.

प्रथमावृत्ति . दीपावली, नोव्हेंबर १९७७.

© ह. अ. भावे

किंमत चौदा रुपये

मुखपृष्ठ : अनंत सालकर

मुद्रक:

सौ आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

# प्रस्तावना

दक्षिण अमेरिका युरोपियन संशोधकांनी शोधून काढला, हे म्हणणे उद्धटपणाचे आहे. युरोपियन व प्रामुख्याने स्पॅनिश लोकांच्या दक्षिण अमेरिकेतील पदार्पणापूर्वी तेथे इंका आणि अ‍ॅझ्टेक लोकांची संघटित राज्ये होती व प्रगत संस्कृती होती. खगोलशास्त्रासारख्या काही शास्त्रांचे त्यांचे ज्ञान युरोपियनांच्या तोडीचे होते. उत्तर अमेरिकेतील तांबड्यांप्रमाणे दक्षिण अमेरिकेतील मूळ रहिवासी रानटी अवस्थेत नव्हते. दक्षिण अमेरिकेतील अकरा सार्वभौम राष्ट्रांपैकी काही राष्ट्रांत आजही मूळचे ताम्र रहिवासी बहुसंख्य आहेत. त्यांनी आपला शुद्ध वंश टिकवला आहे, व जुनी भाषा व संस्कृती राखली आहे.

दक्षिण अमेरिकेइतका विविधतेने नटलेला निसर्ग दुसरीकडे नाही. गुलबाक्षीसारखी फुलझाडे, बटाटे ही दक्षिण अमेरिकेने जगाला दिलेली देणगी आहे. दक्षिण अमेरिकेच्या शोधात येथील प्राचीन संस्कृतीचा व युरोपियन संस्कृतीचा जो झगडा झाला त्याचा उल्लेख येणे स्वाभाविक आहे. तेथील मूळ जमाती, नवीन आलेले निग्रो गुलाम व युरोपियन विजेते यांच्या एकमेकांतील संघर्षातून ही शोधाची कहाणी उलगडत गेली आहे. त्याचबरोबर विश्वाच्या संशोधनाची कहाणी या पाच पुस्तकांच्या विश्वसंशोधन मालेतून सांगत असल्याने विश्व-संशोधनाचे सूत्रही राखले गेले आहे.

अमाप नैसर्गिक संपत्ती असूनही दक्षिण अमेरिका अविकसित व गरीब राष्ट्रसमूहात मोडते. उत्तर अमेरिकेने जगात पहिले स्थान प्राप्त केले असताना दक्षिण अमेरिकेत मात्र लोकशाही रुजली नाही व आर्थिक प्रगतीही झाली नाही. त्याची काय कारणे असावीत त्याचा मागोवा इतिहासातील व भूगोलातील वस्तुस्थिती मांडून या पुस्तकातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

दि. १५–१०–१९७७
वरदा, सेनापती बापट मार्ग
पुणे १६

ह. अ. भावे

## अनुक्रमणिका


| प्रकरण | नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | साहसी प्रवासांचा प्रारंभ | ५ |
| २. | दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याचा शोध | १६ |
| ३. | प्राचीन दक्षिण अमेरिकन संस्कृती | ३२ |
| ४. | पश्चिम किनारा | ३६ |
| ५. | चिली | ४६ |
| ६ | स्पॅनिशांच्या मुख्य वसाहती | ५६ |
| ७. | वसाहतींचा विस्तार | ९१ |
| ८. | स्वातंत्र्य, विकास व सामाजिक स्थैर्य | ११२ |
| १०. | विसाव्या शतकातील मोहिमा | १४४ |
| ११. | भवितव्य | १४६ |

## प्रकरण पहिले

# साहसी प्रवासांचा प्रारंभ

कोणत्याही यशस्वी शोधामागे अनेक असफल व अयशस्वी संशोधने असतात देव एकाच्या नवसाला पावतो, पण त्याबरोबर इतर दहाजणाचे नवस पूर्ण झालेले नसतात ! आणि ते कुणाला माहिती नसते तसेच शोधाचेही आहे. चौदाव्या शतकाच्या शेवटी अझोर्स बेटापर्यंत आणि पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्याने अनेकांनी साहसी व धोक्याचे सागरी-प्रवास केले तरीही अटलांटिक महासागराच्या पलीकडे काय रहस्ये दडलेली आहेत हे तोपर्यंत समजलेच नव्हते. प्राचीन काळच्या अटलांटिस शहराची कथा पुराणामध्ये होतीच कधी कधी समुद्रात लांब जाणारे कोळी विचित्र आकाराची लाकडी होडगी दिसल्याचे सांगत. कधीमधी गव्हाळी रंगाची प्रेते किनाऱ्यावर वाहून येत या सर्वांवरून अतिपूर्व आणि युरोप यांमध्ये मोठी जमीन असावी असा अंधुक तर्क करणे शक्य होते. ज्ञात जग आईसलँडपासून चीनपर्यंत पसरलेले होते. अमेरिका खंडाचे अस्तित्व कुणाच्या स्वप्नीही नव्हते.

पण लोकांच्या मनात भौगोलिक संशोधन करण्याचे विचार येतच असत हिंदुस्थान व अतिपूर्वेकडून येणाऱ्या मसाल्याच्या जिनसांचा व्यापार ऑटोमन तुर्कांच्या नियंत्रणाखाली होता,

आणि त्यामध्ये जिनोवा आणि व्हेनिस येथील व्यापाऱ्यांची मक्तेदारी होती. हिंदुस्थानकडे जायचा सागरी मार्ग सापडला तर हे सर्व बदलणार होते. हा सागरी मार्ग शोधायचा ध्यास पोर्तुगालचा राजपुत्र डॉम हेन्री याने घेतला होता. १४१५ पासून १४६० पर्यंतच्या ४५ वर्षांत त्याने पोर्तुगालला त्या युगातील सर्वांत सामर्थ्यवान नौदल निर्माण करून दिले. त्याने आपले नाविक आफ्रिकेच्या किनाऱ्याकडे पाठवले आणि त्यांना माहिती गोळा करून आणायला सांगितली. त्या माहितीच्या आधारे दरबारातील नकाशा-तज्ज्ञांनी नकाशे तयार केले. त्या काळात तरी हे उत्तम नकाशे होते. त्याने नाविकांना शिक्षण देणारी शाळाही सुरू केली. हेन्रीने त्यावेळची सथ जाणारी मालवाहू जहाजे आणि जलद जाणारी शिडाची अरब नाव व दोहोंमधली चांगली वैशिष्ट्ये एकत्र करून 'कारव्हेल' हे शभर टनी जहाज सिद्ध केले. त्यात सामुग्रीही पुष्कळ राहात असे आणि वारा चांगला असेल तर शिडाच्या जोरावर ते वेगाने जात असे. या जहाजाच्या बांधणीमुळे हेन्रीचे नाविक जास्त वेगाने आणि जास्त लांब जाऊ लागले. पोर्तुगालच्या प्रतिस्पर्ध्यांना हे जमत नव्हते. हेन्री १४६० मध्ये मृत्यू पावला. पण तोपर्यंत पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून जवळ, अटलांटिक महासागरातील केप वर्दे बेटापर्यंत पोर्तुगीज नाविक पोहोचले होते.

त्या काळी भौगोलिक संशोधनाचा खर्च फार येत असे. सामान्य माणसाला तो परवडण्यासारखा नव्हता. जे राष्ट्र हा खर्च करत असे ते राष्ट्र त्यातून मिळणाऱ्या प्रदेशावर व फायद्यावर हक्क सांगत असे. मग नाविक त्याच्या देशाचे रहिवासी असोत वा नसोत. अनेक नाविकांनी स्वदेशाऐवजी दुसऱ्या देशाच्या आर्थिक

मदतीने सागरी संशोधन केले. ख्रिस्तोफर कोलंबस हा इटालियन नाविक हा त्यापैकीच एक होता.

कोलंबसाने फ्लॉरेन्समधील प्रख्यात भूगोलतज्ञ टास्कनेली याचा सल्ला घेतला. त्याचे म्हणणे असे होते की, पृथ्वी गोल असल्यामुळे हिंदुस्थान व अतिपूर्वेकडे जाण्याची जवळची सागरी वाट पश्चिमेकडून सापडेल टास्कनेलीच्या गणिताप्रमाणे त्याने पृथ्वीचा परीघ प्रत्यक्षापेक्षा २।३ धरला होता आणि आशियाचे पूर्व टोक पूर्वेकडे वाढवून धरले होते त्याच्या मते लिस्बन व जपान यामधील अंतर फक्त ४८०० किलोमीटर्स होते



ख्रिस्तोफर कोलंबस

कोलंबसाने आपले सर्व म्हणणे पोर्तुगालच्या राजापुढे ठेवले पण पोर्तुगालचे नाविक पूर्वेकडून आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थानला जायचा मार्ग शोधत होते त्यामुळे पोर्तुगीजांनी कोलंबसाला मोहीम काढायला मदत दिली नाही नंतर तो स्पेनमध्ये गेला तेथील दरबारात खटपट करू लागला अनेक वर्षांच्या तपश्चर्येनंतर स्पेनची राजा-राणी फर्डिनंड आणि इसाबेला यांनी शेवटी कोलंबसाला मदत करायचे ठरविले कोलंबसाला त्यांनी एक सनद दिली आणि हिंदुस्थानचा सागरी मार्ग सापडल्यास नव्या प्रदेशातील स्पेनचा राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक दिली

त्याला वंशपरंपरागत सरदारकी आणि अॅडमिरलची पदवी देण्याचेही राजा-राणीने मान्य केले.

शुक्रवार दिनांक २ ऑगस्ट १४९२ या दिवशी 'सांटा मारिया' या ध्वजनौकेतून त्याने स्पेनच्या दक्षिण-पश्चिमेस असलेले पालोस बंदर सोडले सोबत 'निना' आणि 'पिंटा'ही कारव्हेल जहाजेही होती. कॅनरी बेटाच्या रोखाने तो निघाला तेथून ६ सप्टेंबर १४९२ रोजी पश्चिमेकडच्या अज्ञात महासागरावर त्याने आपली जहाजे हाकारली. पुढच्या तेहेतीस दिवसात कोलंबसाला झोप आली नाही १० ऑक्टोबरला त्याच्या खलाशांनी प्रवास अर्धाच सोडून परतण्याची मागणी केली पण कोलंबसाचा बेत बदलला नाही पुढे प्रवास चालू ठेवण्यासाठी त्याने आपल्या खलाशांना खूप बक्षिसाची लालूच दाखवली दुसऱ्याच दिवशी जमीन जवळ आल्याची चिन्हे दिसू लागली शेवटी १२ आक्टोबरला पहाटे संध्याच्या बहामा बेटांपैकी एका बेटाजवळ त्याने आपली जहाजे नांगरली.

स्पेनच्या राजाचे निशाण घेऊन आणि आपले कप्तान व धर्मोपदेशक घेऊन कोलंबस त्या बेटावर उतरला आणि त्याने स्पेनच्या राजाच्या नावाने त्या बेटाचा ताबा घेतल्याचे जाहीर केले तेथील स्थानिक रहिवाशी नग्न होते त्यांनी युरोपियनांना त्रास दिला नाही उलट मैत्रीचा हात पुढे केला ते सौम्य प्रकृतीचे लोक होते तेव्हा त्यांना कल्पना नव्हती की युरोपियनांच्या या संपर्कामुळे आपला वंशच समूळ नष्ट होऊन जाणार आहे।

हे सौम्य प्रकृतीचे लोक पाहून कोलंबसाला आनंद झाला त्यांना सहज ख्रिश्चन करून घेता येईल आणि ते चांगले कामसू गुलामही बनू शकतील असे त्याला वाटले शिवाय त्याच्या कानात



वेस्ट इंडिज बेटावर कोलंबसाचे पदार्पण


सोन्याचे दागिने होते. स्पेनमध्ये त्याचे प्रदर्शन करण्यासाठी त्यांच्यातील सहाजणांना कोलंबसाने पकडून जहाजावर नेले आणि तो जवळपासच्या बेटाचा तपास करायला लागला तो क्यूबा आणि हैती या बेटांवरही जाऊन आला आपण आशियाच्या जपानजवळील बेटावर पोहोचलो आहोत याबद्दल त्याला खात्री वाटत होती आपल्यापैकी काहीजणांना त्याने या मोठ्या बेटावर

शहरे शोधण्यासाठी पाठवले पण एकही शहर आढळले नाही ख्रिसमस सणाच्या दिवशी सान्ता मारिया ' जहाज किनाऱ्यावर रुतून बसले हैती बेटाच्या उत्तर– पश्चिम टोकाजवळ कोलबसाने एक ठाणे बाधले, आणि तेथे काही लोक मागे ठेवून तो निना जहाजातून स्पेनला परतला तेथे त्याचे अभूतपूर्व स्वागत करण्यात आले स्पेनच्या राजा–राणीला लिहिलेल्या एका पत्रात कोलबसाने आश्वासन दिले की, त्यांना हवे असलेले सोने या नव्या प्रदेशात सापडेलच! शिवाय तेथे मसाले कापूस, डिंक याना तोटा नाही तिथल्या अनेक रहिवाशांना ख्रिश्चन धर्माची दिक्षाही देता येईल ' आदिवासीचे धर्मांतर करून त्याना ख्रिश्चन बनवणे हे सशोधकाचे कर्तव्यच आहे अशी त्याकाळी समजूत होती.

स्पेनच्या राजा-राणीने त्याचे चागले स्वागत केले आणि कबूल केलेल्या पदव्या त्याला दिल्या. शहरातील सर्व लोक गोळा होऊन कोलबसाने आणलेल्या विचित्र वस्तू व तांबड्या कातडीचे आदिवासी याची आश्चर्यचकित होऊन पाहणी करू लागले.

त्या काळी धार्मिक व राजकीय बाबतीत युरोपमध्ये पोपचे वर्चस्व होते आफ्रिकेमधील केप बोजोडोरच्या दक्षिणेकडील सर्व भूमी पोपने पोर्तुगालला बहाल केली होती तसेच हिन्दुस्थानबद्दलचा धार्मिक अधिकार त्यांना दिला होता. आता स्पेनने दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे हे सर्व अधिकार आपल्याला मिळावेत अशी मागणी केली पोर्तुगीज लोक कॅथॉलिक पथाचा हिरीरीने प्रचार करीत असत त्यामुळे त्याचे पोपकडे वजन असे स्पेनच्या मागणीला पोर्तुगीज राजा किंग जॉन याने तीव्र विरोध दर्शविला.

पोपच्या व्हॅटिकन राजवाड्यामध्ये अज्ञात जगाची वाटणी



टॉर्डेसिलासच्या तहान्वये (१४९३) जगाची वाटणी पोर्तुगाल व स्पेन या दोन देशात पोपने करून टाकली ! ती सीमा दाखवणारा नकाशा

स्पेन आणि आणि पोर्तुगाल या दोघात कशी करावी याबाबत जोरदार वाटाघाटी चालू होत्या पोर्तुगीजांना कॅनरी बेटाच्या दक्षिणेकडील (३० उ अक्षांश) सर्व नवी भूमी स्वत साठी हवी होती ! स्पेनने हे मान्य केले असते तर सर्व दक्षिण अमेरिका खंड पोर्तुगालच्या मालकीचे झाले असते पण पोपने पोर्तुगीजाचे म्हणणे मान्य केले नाही ! बऱ्याच वाटाघाटी व ओढाताण होऊन १४९३ ची पोपची धर्माज्ञा निघाली व नंतर टार्टेसिलास येथे तहही झाला त्यानुसार नकाशावर एक दक्षिणोत्तर रेषा काढण्यात आली. ही रेषा केप वर्दे बेटापासून पश्चिमेकडे ३७० लीग अंतरावर होती. या रेषेच्या पश्चिमेकडे असलेली सर्व भूमी स्पेनला बहाल करण्यात आली आणि पूर्वेकडची भूमी पोर्तुगालला देण्यात आली पृथ्वी गोल आहे हे क्षणभर सर्वजण विसरले ! ३६० लीग

अतराच्या अटीमुळेच पोर्तुगालला पुढे ब्राझीलवर हक्क सांगता आला. ह्या सर्व वाटाघाटी चालू असताना कोलंबस आपल्या दुसऱ्या मोहिमेची तयारी करीत होता.

या मोहिमेत भाग घेतल्यास आपल्याला झटपट श्रीमंत होता येईल या आशेने अनेक धाडसी लोक कोलंबसाच्या नव्या मोहिमेत



ग्वान्देलूप बेटावरील नरभक्षक

सामील होण्यासाठी गोळा झाले. एकंदर सतरा जहाजे सज्ज झाली. व बाराशे लोक जमले त्यामध्ये सशस्त्र सैनिक, धर्मोपदेशक, कारागीर असे सगळ्या प्रकारचे लोक होते. कोलंबसाने आपल्याबरोबर बी-बियाणे, घोडे, गुरे आणि डुकरे बरोबर घेतली यापैकी कोणतीच गोष्ट नव्या जगात अस्तित्वात नव्हती! यावेळी त्याने दक्षिणेचा रस्ता पकडला. आणि तो 'डोमिनिका' बेटाजवळ पोहोचला. तेथे चागले बदर न सापडल्यामुळे तो 'ग्वानदेलूप' बेटाकडे गेला तेथे त्याना नरभक्षकाची वस्ती आढळली! ते नरभक्षक उत्तरेकडच्या बेटावर छापा घालत आणि स्त्रीपुरुषाना पकडून आणत पुरुषांना मारून खाऊन टाकत आणि स्त्रियांना भोगदासी म्हणून ठेवून देत !

तेथून कोलबस तत्काळ निघाला आणि पोर्टोरिको बेटाकडे गेला तेथे त्याला आढळले की आपण हैती बेटाच्या अक्षाशावरच पोचलो आहोत म्हणून तो पश्चिमेकडे वळला हैती बेटावर त्याने वर्षापूर्वीच एक ठाणे बाधून काही लोक मागे ठेवले होते त्या ठाण्याजवळ पोचल्यावर त्याला आढळले की मागे ठेवलेल्या लोकाचा किंवा ठाण्याचा मागमूसही शिल्लक नाही. एकही जण जिवत नव्हता !

नतर कोलबसाने तेथे 'इसाबेला' या शहराची स्थापना केली त्याने जमिनीवर शहराची रचना चौकोनी आखली आणि नगर परिषदेचे सभासद व प्रशासक याच्या नेमणुका केल्या स्पॅनिश लोक पुढे जेथे जेथे गेले आणि जेथे जेथे वसाहती स्थापल्या तेथे त्यांनी अशीच नगररचना केली व कोलबसाच्या योजनेनुसारच शहरातील समाजाचे सघटन व नियन्त्रण केले.

नतर कोलबस जमेका बेटाकडे गेला अजूनही ही सर्व बेटे म्हणजे आशियाच्या पूर्वेची बेटे आहेत हे सिद्ध करण्याचा त्याचा खटाटोप चालूच होता तो पुन्हा इसाबेला शहराकडे परत आला तेव्हा तेथे राहिलेल्या स्पॅनिश लोकानी गोंधळ व गडबड माजवली आहे असे त्याला आढळले त्यानी अनेक स्थानिक रहिवाशाना ठार केले किंवा गुलाम बनवले होते त्यामुळे हे शात आदिवासी खवळून प्रतिकार करू लागले होते ! आदिवासी लोक शेती कधीच करीत नसत त्यामुळे अन्नपुरवठा कमी होऊन उपास पडू लागले होते सोने मिळवण्याच्या लालचीने आलेले अनेक लोक सोने न मिळाल्यामुळे स्पेनला निघून गेले नतर कोलंबसही परतला.त्याने सोन्याची साखळी धारण केलेला एक स्थानिक जातीचा राजा पकडून बरोबर नेला होता 'आपण दतकथेतील सालोमन राजाची 'ओफीर' ही सूवर्णभूमी शोधली आहे हे स्पेनच्या राजाला पटवून देण्यासाठी त्याचा हा अट्टाहास होता ! यावेळीही राजाने त्याचा मान-सन्मान केला पण लोकाचा आता भ्रमनिरास झाला होता त्याच्या तिसऱ्या मोहिमेत सामील व्हायला फारसे लोक पुढे आले नाहीत.

कोलंबस आपल्या तिसऱ्या सफरीवर १४९८ मध्ये निघाला. या वेळी त्याने आणखी दक्षिणेचा मार्ग धरला प्रथम त्याला दाट जगलानी भरलेले एक बेट लागले त्या बेटाच्या उत्तरेकडे पर्वतमय प्रदेश होता तेथून तो आणखी पश्चिमेकडे गेला तेव्हा त्याला समुद्राचे पाणी फिक्या रगाचे झालेले दिसले. आणि एक मोठ्या त्रिभुज प्रदेशाजवळ एक खाडी दिसली. कोलबस समजला की,

आपण आता आशिया खंडाच्या पूर्व टोकाला येऊन पोहोचलो आहोत. कारण त्या त्रिभुज प्रदेशाजवळ मोत्याच्या माळा घातलेले रहिवासी त्याला दिसले पण ते बेट त्रिनिदाद बेट होते. ती खाडी नसून 'ओरिनोको' नदीचे मुख होते. आणि ती भूमी म्हणजे दक्षिण अमेरिका खंड होते !

□

प्रकरण दुसरे

## दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याचा शोध

दक्षिण अमेरिकेपैकी ब्राझील किनाऱ्याचा शोध नक्की कोणी लावला हे सागता येणार नाही असे म्हणतात की, कोलबसाच्या-ही पूर्वी फ्रेंच नाविक डॉयपे अर्झोस बेटाजवळून निघून १४८८ मध्येच ॲमेझान नदीच्या मुखाजवळ पोहोचला होता. पण त्याच्या प्रवासासबधी काहीच पुरावा उपलब्ध नाही. जो पुरावा होता तो १६९४ त नष्ट झाला असे सागतात मिझेंन पिनॉश हा स्पॅनिश नाविक सन १५०० च्या जानेवारी महिन्यात सेंट ऑगस्टीन-पर्यंत आला होता असेही म्हणतात. आणखी काही नाविक ब्राझीलपर्यंत आल्याची शक्यता आहे पण पेद्रो काब्राल पोर्तुगीज राजाच्या आज्ञेवरून सन १५०० च्या मार्च महिन्यात तेरा जहाजे घेऊन काब्राल हिंदुस्थानला जायला निघाला होता त्या वेळी त्याने ब्राझीलचा किनारा १६ अश दक्षिण अक्षाशाजवळ गाठला. काब्राल तेथे चुकून पोचला की मुद्दामच जाणार होता हे समजण्यास मार्ग नाही कारण त्याला केप ऑफ गुडहोप या दक्षिण आफ्रिकेच्या टोकाला पोचण्यासाठी ४८०० किलोमीटरचा प्रवास पुन्हा करावा लागला काब्रालने एक जहाज पोर्तुगालच्या राजाकडे पाठविले व ब्राझीलचा शोध लावल्याचे कळविले. मग पोर्तुगालच्या राजानेही स्पेनच्या राजाला पत्र पाठवले की—

'आम्ही ब्राझीलचा शोध लावला आहे व तेथील ताबा घेतला आहे '

काब्राल प्रथम ब्राझीलच्या किनाऱ्यालगतच्या व्हेराक्रुझ या बेटावर पोचला. तेथून क्षितिजरेषेवर त्याला एक शिखर दिसले त्या शिखराचे नाव त्याने 'माउट पास्कोल्स' असे ठेवले.या ठिकाणी त्याना एक समुद्रकाठची सपाटजमीन दिसली. पण किनाऱ्या-वरच्या प्रचंड लाटामुळे त्यांना तेथे उतरता आले नाही मग ते थोडे उत्तरेकडे गेले, आणि तेथे त्याना एक चागली बदराची जागा दिसली त्या बदराचे नाव त्यानी 'पोर्टो सेगुरो' असे ठेवले. त्याचा अर्थ 'सुरक्षित बदर ' असाच होतो किनाऱ्यावर उतरल्यानतर तेथील आदिवासींनी त्याचे चागले स्वागत केले. काब्राल एक गालिचा पसरून त्यावर खुर्ची टाकून बसला आणि आदिवासीनी त्याला भेटी दिल्या. त्या आदिवासीनी आपल्या खालच्या ओठात छिद्र पाडून पाढरी हाडे अडकविली होती, पण त्याच्या अगावर बाकी काही वस्त्र नव्हते. भाषा येत नसल्यामुळे तोंडी सभाषण अशक्यच होते. पण चादीची शमादाने आणि सोन्याच्या साखळचा याच्याकडे बोटे दाखवून अशी सपत्ती त्या अतर्भागामध्ये असल्याचे ते सुचवत होते. नतर पोर्तुगीजानी आपली धर्मप्रार्थना म्हटली. अनेक आदिवासी त्यात सामील झाले.

पोर्तुगालचे मुख्य लक्ष हिंदुस्थान व अतिपूर्वेकडील बेटे याकडे होते. तरीही त्यांनी मे १५०१ मध्ये 'गोंझालो कोहिलो ' याच्या नेतृत्वाखाली तीन जहाजे देऊन एक सशोधन मोहीम पाठविली. त्यांची जहाजे ब्राझीलच्या किनाऱ्याला ५,अश दक्षिण अक्षाशाजवळ लागली तेथील जमीन झुडुपाची होती व हवा कोरडी होती.



अमेरिको व्हेस्पुसी

त्या भूमीला त्याने 'काबो सावो रोके' असे नाव दिले या सफरीत जहाजावरचा एक प्रमुख नाविक अमेरिको व्हेस्पुसी हा इटालियन होता. त्याने नंतर आपले प्रवासवर्णन लिहिले. ते प्रवासवर्णन वाचून युरोपातील नाविक या नव्या भूमीला 'अमेरिकोची भूमी' असे म्हणू लागले नकाशावरही ते नाव लिहिले जाऊ लागले. कालान्तराने या खंडाचेच नाव अमेरिका पडले

या पोर्तुगीजानी मग आपली जहाजे दक्षिणेकडे हाकारली जवळपासच्या भूमीत विपुल फळे होती स्थानिक रहिवासी शांत होते व मदत करायला तयार होते; आणि हवा चांगली होती. (त्या वेळी तेथे हिवाळा चालू होता.) आणखी दक्षिणेकडे जाता

जाता ते मकरवृत्तापर्यंत पोहोचले आता उन्हाळा भासू लागला होता १ जानेवारी १५०२ रोजी त्यांनी दीड किलोमीटरची एक नदी काळ्या खडकाच्या कड्यामधून वाहात आलेली दिसली. त्यानी या नदीला 'रिओ-द-जानेरिओ' असे नाव दिले त्याचा अर्थ 'जानेवारी नदी' असा होतो पण ती नदी नव्हतीच ! ग्युएनबारा उपसागराचे ते मुख होते, व अंतर्भागात उत्तम बंदर होते तेथेच आजचे रिओ-द-जानेरिओ हे शहर वसले आहे.

एप्रिल १५०२ मध्ये ३२ अंश दक्षिण अक्षांशावर असलेल्या सॅन्टा कॅटरिना येथे ते पोहोचले अमेरिको व्हेस्पुसीने लिहिले आहे की, 'येथे सारखी वादळे होत होती, हवा थंड होती, व किनारपट्टीचा प्रदेश निर्जन व ओसाड होता'

## कॅरिबियन बेटे

सन १५०२ मध्ये कोलंबस आपल्या चौथ्या प्रवासाला निघाला होता या वेळेपर्यंत बरीच जहाजे अटलांटिक महासागर ओलांडू लागली होती तीन आठवड्याचा सागरी प्रवास होता तो. तेव्हा या प्रवासात जाता विशेष धाडस राहिले नव्हते अजूनही कोलंबस हिंदुस्थानकडे जाण्याचा सागरी मार्ग शोधतच होता. जुलै १५०२ मध्ये तो दक्षिण अमेरिकेतील सध्याच्या हाडुरास देशातील किनारपट्टीजवळ पोचला. तेथे त्याला एक होडी भेटली. त्या होडीत बरीच सुधारलेली अवजारे होती आणि त्या लोकानी नेसलेली वस्त्रे कापसापासून बनवलेली होती. दक्षिण अमेरिकेतील खूपच सुधारलेल्या माया संस्कृतीचे हे लोक आहेत हे त्याला समजलेच नाही त्याने पुन्हा दक्षिणेचा रस्ता धरला नाताळचा सण आला तेव्हा ते पनामाजवळ पोहचले होते त्याने तेथे एक

ठाणे स्थापण्याचा प्रयत्न केला, पण तेथील आदीवासींनी ते ठाणे नष्ट करून टाकले तेथून आपली गळू लागलेली जहाजे घेऊन कोलबस हैती बेटावर कसबसा पोचला. तेथून तो स्पेनला परतला, आणि निर्धन अवस्थेत १५०६ साली मृत्यू पावला आपण हिंदुस्तानचाच किनारा शोधून काढला, असा त्याचा शेवटपर्यंत समज होता !

या काळापर्यंत होंडूरासपासून दक्षिणेकडे सान्टा काटारिना-पर्यंत सर्व किनारपट्टीची तपशीलवार माहिती झाली होती पोर्टो-लोनीचे नकाशे काढले गेले होते. हे अकरा वर्षांच्या कालावधीत साध्य झाले होते

सन १४९५ किंवा (१५०५) मध्ये स्पेनच्या राजाने आपल्या प्रजेला अमेरिकेत शोध मोहिमा काढण्यासाठी मुक्तपणे परवाने देणे सुरू केले कोलंबसाला दिलेल्या वचनाचा यामुळे भग होत होता. पण त्याकडे कोणी लक्ष दिले नाही आता स्पेनमधील धाडसी लोकांचा ओघच अमेरिकेच्या किनाऱ्याकडे वाहू लागला ते बहुधा किनारपट्टीवरच फिरत, आणि आत शिरून तेथील ताम्रावर वाटेल तसा जुलूम व अत्याचार करीत. ते आदिवासींना न समजणाऱ्या स्पॅनिश भाषेत त्याचा मुलूख ताब्यात घेतल्याची घोषणा करत ! आणि मग त्या ताम्रानी आज्ञाभग केला म्हणून त्याच्यावर तुटून पडत ! ते आदिवासी जर नरभक्षक असले, तर त्याना पकडून जाळून टाकणे, हेच स्पॅनिशाना आपले कर्तव्य वाटे सन १५०९ मध्ये ‘ अलोन्सो-द-ओजेडा ’ याने सध्याच्या कोलबिया देशाच्या उत्तर किनाऱ्यावरील भूमीची सनद मिळविली पूर्वीच्या एका सफरीत त्याला व्हेनेझुअेलाच्या किनाऱ्यावर मोती व सोने मिळाले होते सनद मिळाल्यानतर त्याने आपली सर्व सपत्ती या

मोहिमेसाठी पणाला लावली. त्याने आपल्याबरोबर तीनशे सैनिक व बारा घोडे नेले होते कोलंबियाच्या किनाऱ्यावर उतरून तो पश्चिमेकडे निघाला तेथे झुडपाळ मैदानापलीकडे डोंगराची शिखरे डोकावत होती, व जवळच एक उपसागर होता त्या उपसागराला सध्या कार्टाजेना हे नाव आहे तेथील ताम्रवर्णीय आदिवासींना आता क्रूर युरोपियनांचा परिचय झाला होता त्यानी ओजेडाच्या लोकावर विष माखलेल्या बाणांचा वर्षाव केला या विषारी बाणामुळे मनुष्य प्रथम वेडा होत असे मग मरत असे त्याचे सैनिक दररोज कमी होत होते, आणि उपासमारीचाही धोका होता तरी ते दक्षिणेकडे जात राहिले शेवटी मदत आणण्यासाठी ओजेडा हैती बेटाकडे गेला आणि तेथील सैनिकाचे नेतृत्व फॅन्सिस्को पिझारोकडे सोपवले नतर काही दिवसानी सर्व मोहिमेचा उपप्रमुख एन्सीसो रसद घेऊन आला पण अशा बिकट प्रदेशात व परिस्थितीत सैनिकाचे पुढारीपण करण्याची पात्रता एन्सीसोजवळ नव्हती अशा अडचणीच्या वेळी वास्को-नुजेज-द-बल्बोआ हा हुषार मनुष्य पुढे आला आणि त्याने सैनिकाचे नेतृत्व केले बल्बोआ या मोहिमेतल्या जहाजामध्ये लपून बसून चोरून आलेला होता त्याच्याजवळ दाडगा उत्साह व कार्यशक्ती होती दमले भागलेले सर्व सैनिक घेऊन तो पनामामधील डारियन येथे पोचला तेथे अन्नसाठा होता आणि ताम्र मैत्री करणारे होते. तेथे त्यांनी एक शहर स्थापन केले, व सर्वांच्या समतीने तो त्या शहराचा महापौर बनला पण त्याला स्पेनच्या राजाची मान्यता नव्हती, त्यामुळेच बल्बोआला पुढे प्राणाचे मोल द्यावे लागले खरा राजप्रतिनिधी एन्सीसो

याला बेडचा घालून स्पेनला परत पाठविण्यात आले.

दारियेन हे ठाणे वसाहतीला चांगले नव्हते पाऊस पुष्कळ पडत असे आणि वर्षभर हवा उष्ण होती. सभोवार पर्वतावर बरीच जगले होती, व रोगराई पुष्कळच होती बल्बोआने आता आपल्याला स्वतःच सेनापती नेमून घेतले आणि जास्त चांगला प्रदेश शोधण्यासाठी तो पश्चिमेकडे निघाला जाताना त्याने वाटेत भेटलेल्या ताम्रवर्णीयाना आपल्या अधिकाराखाली घेतले त्याच्या नेतृत्वाला जे स्पॅनिश सैनिक विरोध करीत होते त्याचा अनुनय करून त्याने आपले नेतृत्व कायम राखले स्थानिक रहिवाशाना कधी धाक दाखवून कधी प्रेमाने वाटाघाटी करून त्याने आपले मित्र करून घेतले, गुलामही मिळविले त्या गुलामाच्या साह्याने त्याने शेती करून धान्यही मिळविले, व सैनिकाच्या पोटाची सोय केली इतर विजेत्या स्पॅनिशापेक्षा बल्बोआ ताम्र वर्णीयाशी खूपच सहानुभूतीने वागला तरीही त्याने जी जुलूम जबरदस्ती केली ती आज क्रूरपणाचीच वाटेल त्याने नरभक्षकाना ठार केले, कारण, गुलाम म्हणून त्यांचा उपयोग नव्हता पळून जाणाऱ्या गुलामाना पकडून आणले आणि एका प्रान्तातून दुसऱ्या प्रान्तात लोकसंख्येची अदलाबदल केली

## पॅसिफिक महासागर

एके दिवशी पळवून आणलेले सोने वजन केले जात होते तेव्हा एका ताम्रवर्णीय टोळीप्रमुखाने तराजूतील सोने हातात घेऊन दक्षिणेकडे बोट दाखवले तेथे सोन्याचा अमर्याद साठा आहे असे त्याला सुचवायचे होते तेव्हा बल्बोआने त्या दिशेने जायचे ठरविले पनामातील त्याच्या ठाण्यापासून पॅसिफिक महासागर

फक्त ९६ किलोमीटर होता हे बल्बोआला माहीत नव्हते तरीही हा ९६ किलोमीटरचा प्रवास त्रासदायक ठरला. त्याला घनदाट जगलातून व अरण्यातून वाट काढावी लागली दलदली पार कराव्या लागल्या आणि ताम्रवर्णीय टोळ्यांशी लढावे लागले. शेवटी तो पॅसिफिक किनाऱ्यावर उभा राहिला समोर पसरलेला निळ्या पाण्याचा अमर्याद विस्तार पाहून तो भारावून गेला त्याने तेथे क्रूस उभारून आपल्या सहकाऱ्यासह प्रार्थना केली. काही दिवसानतर तो एका आखातात पोचला त्या आखाताला सध्या 'सॅन मिग्युएल' असे नाव आहे ही जागा दारिएन ठाण्यापेक्षा पुष्कळच चागली होती येथे बल्बोआ पॅसिफिक महासागराच्या शात पाण्यात उतरला आणि हातातील क्रॉस उचावून त्याने 'या सागराचा व सभोवतालच्या भूमीचा ताबा स्पेनच्या वतीने घेतल्याचे जाहीर केले' अशा तऱ्हेने पाश्चिमात्य युरोपियनाला पॅसिफिक महासागराची पूर्व सरहद्द सापडली बल्बोआने या समुद्राचे नाव 'दक्षिण सागर' असे ठेवले बल्बोआने ताम्रवर्णीयाच्या होड्या जबरदस्तीने ताब्यात घेतल्या आणि त्यात बसून तो पूर्वेकडे निघाला तेथे मोत्याचे साठे आहेत अशी बातमी त्याला मिळाली होती तेथे त्याला खरोखर खूपच मोती मिळाले पाच महिन्यानी तो दारियेन ठाण्याकडे



वास्को नुनेझ बल्बोआ

परतला परतताना ताम्रवर्णीयाच्या वीस टोळ्याशी त्याने दोस्ती केली होती.स्पेनच्या राजाला नजर करण्यासाठी काही उत्तम मोतीही तो पाठविणार होता पण ही भेट पाठवणे बल्बोआच्या नशिबात नव्हते बेड्या घालून पाठविलेल्या एन्नसीसको स्पेनच्या राजाकडे बऱ्याच कागाळ्या केल्या होत्या म्हणून राजाने पेड्रारिआस याला राज्यपाल म्हणून पाठविले होते त्याने आल्या आल्या उगाचच क्रूरपणा दाखवून ताम्रवर्णीयावर जुलूम सुरू केला बल्बोआच्या विनतीनुसार त्याने त्याच्याकडे बाराशे सैनिक पाठविले आणि त्याला नव्या दक्षिण सागराचा प्रशासक नेमले

पनामाच्या उत्तर किनाऱ्याजवळ अक्ला येथे पनामाच्या संयोग-भूमीची रुंदी कमीतकमी आहे. त्या ठिकाणी ' दक्षिण समुद्राकडे ' जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला या रस्त्याने चार जहाजे सुटी करून, जंगलातील रस्त्याने, गुलामाच्या साह्याने दक्षिण समुद्रावर नेण्यात आली हा प्रवास फार कष्टाचा झाला व त्यात अनेकाचे प्राण गेले बल्बोआच्या या यशामुळे राज्यपाल पेड्रारिआसला त्याचा मत्सर वाटू लागला त्याने बल्बोआला अटक केली कोणत्यातरी जुळवलेल्या आरोपाखाली गुन्हेगार ठरवून त्याचे मुडके उडविले.

पनामामध्ये स्पॅनिश राज्यकर्ते ताम्रवर्णीयावर फारच जुलूम करत बार्टोलोम–द–लॉस कासास या मिशनऱ्याने इतर दयाळू लोकांच्या मदतीने हा जुलूम बद व्हावा म्हणून खटपट केली आणि तशी राजाज्ञा काढायला लावली

परतु त्या आज्ञेचे प्रत्यक्षात पालन होणे त्या काळात कठीणच होते त्यामुळे ताम्रावर जुलूम होतच राहिला

एक प्रकारच्या वेठबिगारीची पद्धत स्पॅनिशानी अमलात

आणली तालुक्यातील जमीनदाराला त्याने कर द्यावे व त्याच्यासाठी काम करावे आणि मग उरलेल्या जमिनीत त्यांना पीक घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात येत असे ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी बिशप नेमण्यात आले होते. पण त्याचा मुख्यत. उपयोग गुलाम बनवण्याकडेच झाला। जर ख्रिश्चन धर्मश्रद्धा एखाद्याने स्वीकारली नाही तर त्याला गुलाम बनवायला हरकत नाही असे सेंट पीटरचे वचन होते. बिशप ताम्रवर्णीयांना स्पॅनिश भाषेत धर्मोपदेश वाचून दाखवत असे आणि तो त्याने ऐकला नाही व ते ख्रिश्चन झाले नाहीत म्हणून त्यांची कत्तल करत किंवा त्यांना गुलाम बनवत। राज्यपाल पेड्रारिआस आणि त्याचे अधिकारी यानी क्रूर कृत्ये करून नंगा नाच घातला पनामाच्या संयोगभूमीवर दक्षिण समुद्राकडे म्हणजेच पॅसिफिक महासागराकडे जाण्याचा मार्ग काढण्यासाठी स्पॅनिशाना सहा वर्षे लागली त्याना वाटत होते की या दक्षिण समुद्रातून आपल्याला मसाल्याच्या बेटांकडे जाता येईल. आणि पोर्तुगीज हक्क सागत असलेल्या आफ्रिकेच्या प्रदेशातून जाणे टाळता येईल. दक्षिण समुद्रात जहाजे नेल्याने अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याचे संशोधनही स्पॅनिशानी सुरू केले. नवीन भूमी सापडली आणि तेथे शिस्तबद्ध स्पॅनिशांनी आपली ठाणी बसवायलाही सुरुवात केली

## प्लेट नदी

सन १५१५ पर्यंत स्पॅनिश नाविकाना कळून चुकले की मसाल्याच्या बेटाकडे जाण्याचा सागरी मार्ग मिळणार नाही उत्तरेकडे लॅब्राडोरपासून विषुववृत्ताच्या दक्षिणेकडेही अमेरिकेचा किनारा अखंड होता पनामापासून अक्लापर्यंत जमीनीवरून

जाऊन पश्चिमेकडचा समुद्र लागत होता तरी तेथून मसाल्याच्या बेटाकडे जाणे सोईचे नव्हते व अवघड होते. दक्षिणेकडे ३५ अक्षांशाजवळ खंड ओलांडून पलीकडे जाण्यासाठी एखादी सामुद्र-धुनी असावी अशा बातम्या स्पॅनिश नाविकाना मिळाल्या होत्या.

जुआन डियाज-द्-सोलिस हा स्पॅनिश नाविक ती सामुद्रधुनी शोधण्यासाठी तीन जहाजे आणि अडीच वर्षे पुरेल इतकी रसद घेऊन निघाला १५१६ सालच्या फेब्रुवारी महिन्यात दक्षिण गोलाधीत उन्हाळा असताना तो सॅन्टा कॅटालिना या बेटाजवळ पोचला तेथून तो आणखी दक्षिणेकडे ४८० किलोमीटर्स गेला. तेथे वाळूच्या बंधाऱ्यामुळे त्याचा मार्ग अडला सध्याच्या रिओ-ग्रँडेजवळ तो आला होता तेथे लागोडो पाटोस या उप-सागरात तो वळला पण ती सामुद्रधुनी नव्हती हे त्याला लव-करच समजले. तो आणखी दक्षिणेकडे ४८० किलोमीटर गेला. तेथील भूमीचे टोक पश्चिमेकडे वळत होते उजव्या हाताला चढाची जमीन होती आणि तेथे दाट झाडी होती. त्या प्रदेशाला सध्या 'युरुग्वे' असे नाव आहे ते युरुग्वे नदीच्या मुखाजवळ पोचले तेथे सोलिस किनाऱ्यावर उतरला एखादा स्थानिक रहिवासी नमुन्यासाठी पकडण्याचा त्याचा उद्देश होता पण त्याला स्थानिक रहिवाश्यानी घेरले, मारून टाकले आणि जहाजावरील खलाशाच्या दृष्टीसमोर खाऊनही टाकले! आता उरलेल्या लोकांनी परतायचे ठरवले परतताना त्याचे एक जहाज लागोडो पाटोस उपसागरात नाहीसे झाले त्यातील खलाशी किनाऱ्यावर उतरले तेव्हा त्यांना गुवारानी ताम्रवर्णीयांनी पकडले. पण त्यांना चांगली वागणूक दिली आदिवासी बायकाशी त्यांची लग्नेही लावून दिली तेरा वर्षांनतर ते आदिवासी बायका-मुलांसह



गार्शियाने पाहिलेले ताम्रवर्णीय

सापडले! दुसरा एक खलाशी अलेजो गार्शिया साता कॅटॅरिना बेटाला लागला तो तिथला राजाच बनला. लौकरच त्याच्या कानावर दंतकथा आली की पूर्वेकडे चांदीचे डोंगर आहेत. त्याला तेथे दुसरा काही उद्योगही नव्हता म्हणून त्याने चार सहकारी बरोबर घेतले आणि आणि त्या चांदीच्या डोंगराच्या शोधाला निघाला सर्वस्वी अज्ञात भूमीतील त्याचा हा प्रवास अत्यंत रोमहर्षक ठरला!

त्याच्याजवळ साधनसामुग्री काहीच नव्हती, तरीही त्याने पॅरानाचे अज्ञात पठार ओलाडले पॅराना आणि पॅराग्वे या प्रचंड नद्याही ओलाडल्या आणि ३२०० किलोमीटर्सचा प्रवास करून ते अँन्डीज पर्वताजवळ पोचले ग्रान चाको या झुडुपानी व दलदलीने भरलेल्या प्रदेशातून त्याने प्रवास केला त्या भागात अतिशय मागासलेल्या मोबोएस ताम्रवर्णीयाची वस्ती होती ते क्रूर होते. या प्रदेशाची आजही संपूर्ण माहिती झालेली नाही अँन्डीज पर्वत जवळ आल्यानतर त्याने तेथील चेनेसे जमातीच्या ताम्रवर्णीयाशी दोस्ती केली चादीचे डोंगर जेथे होते त्या चिकवीसाका प्रदेशातील ‘ काराकेरेस ’ ताम्रवर्णीयाच्या जमातीशी या चेनेसे ताम्रवर्णीयाचे हाडवैर होते या चेनेसे जमातीच्या लोकाना बरोबर घेऊन गार्सियाने हल्ला केला आणि चांदीच्या वस्तू पोती भरून आणल्या त्यानतर ते पॅराग्वे नदी ओलाडून गुवारानी प्रदेशात पोचले तेथून गार्शियाने साता कॅटारिना बेटावर जासूद पाठवले नतर थोड्याच दिवसात स्थानिक टोळीवाल्यानी गार्सियाचा खून केला. तरी पण त्याचा मुलगा वाचला

या चादीच्या पर्वताची अफवा स्पेनच्या नोकरीत असलेल्या फर्डिनड–डी–मॅगेलान या पोर्तुगीज नाविकाच्या कानी पोचली सोलिस जेथपर्यंत पोचला होता तेथपर्यंतच्या समुद्राची त्याने पाहणी केली ती सामुद्रधुनी नसून एका मोठ्या नदीचा त्रिभुज प्रदेश आहे असे त्याला आढळले त्याने या नदीचे नाव ‘ रौप्य नदी ’ म्हणजेच ‘ रिओ–द–ल–प्लाटा ’ असे ठेवले. तेथून तो आणखी दक्षिणेकडे गेला ४९ दक्षिण अक्षाशाजवळ पोचल्यानतर कडक हिवाळ्यामुळे त्याला तेथेच थाबावे लागले तेथील ताम्रवर्णीय त्रास देणारे आणि चिवट होते ते पायांना फर

लोकरीचे कातडे बांधत असत. म्हणून मॅगेलॉनने त्यांचे नाव 'विशाल-पद' किंवा 'पॅटागॉन्स' असे ठेवले, त्या प्रदेशाला आजही पॅटागॉनिया असेच नाव आहे

१५२१ मध्ये दक्षिण गोलार्धात उन्हाळा सुरू झाल्यावर तो आणखी दक्षिणेकडे निघाला तेथे त्याला उपसागराच्या मुखा-प्रमाणे दिसणारे एक सामुद्रधुनीचे मुख दिसले तो त्या सामुद्र-धुनीत धाडसाने शिरला या सामुद्रधुनीत या वेळी सारखी वादळे होत होती दोन्ही बाजूला बर्फाच्छादित पर्वत शिखरे होती. या वादळी सामुद्रधुनीतून पश्चिमेकडे बाहेर पडायला त्याला पाच आठवडे लागले बाहेर पडल्यावर सामुद्रधुनीतील वादळाच्या मानाने खूपच शात असलेला महासागर त्याला आढळला तेव्हा त्याने या महासागराचे नाव 'एल्-मार-पॅसिफिको' म्हणजेच पॅसि-फिक महासागर असे ठेवले हेच नाव पुढे कायम झाले ! पॅसिफिक महासागरावरून त्याने आपला प्रवास तसाच चालू ठेवला आणि तो अतिपूर्वेकडील मोल्यूकास बेटाजवळ पोहोचला तेथे एका चक-मकीत मॅगॅलान मारला गेला पण त्याचे एक जहाज पृथ्वी-प्रदक्षिणा करून स्पेनला पोहोचले मानवाने केलेली ही पहिली पृथ्वीप्रदक्षिणा होती ! दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोकाजवळ असलेल्या सामुद्रधुनीला मॅगेलॉनचे नाव दिले आहे

पोर्तुगीजाच्या आशिया व आफ्रिकेतील पोपने दिलेल्या हक्कांना बाध न आणता अतिपूर्वेकडच्या मोल्यूकास बेटांकडे जाण्यासाठी हा नवीन सागरी मार्ग सापडल्यामुळे स्पेनला फार आनद झाला सबॅस्टियन कॅबट हा व्हेनिसचा नाविक स्पेनच्या नोकरीत होता पूर्वी त्याने इग्रजाची नोकरी केली होती स्पेनच्या राजाने त्याला १५२६ मध्ये नव्या मोहिमेवर पाठवले. राजाची कृपा

संपादन करण्यासाठी आणि संपत्तीचा लोभ बाळगून कॅबट निघाला तो 'रिओ-द-प्लाटा' येथे पोचला व त्याने त्या प्रदेशाची पाहणी केली 'युरेग्वे' नदीत त्याने एक होडी पाठविली पण ती फुटून किनाऱ्याला लागली व बोटीवरचे सर्व खलाशी मारले गेले त्याने युरूग्वेच्या किनाऱ्यावर एक ठाणे बांधले पण चारुआ जमातीच्या ताम्रवर्णीयांनी हल्ला केल्यामुळे त्याला ते ठाणे सोडून द्यावे लागले नंतर त्याने आपले जहाज पॅराना नदीच्या मुखातून आत नेले या प्रदेशात जाणारा तो पहिलाच युरोपियन होता। दोन्ही किनाऱ्यावरची जमीन सपाट होती आणि ओसाड होती। सध्याच्या 'रोसरिओ'जवळ त्याने एक किल्ला बांधला आणि तो नदीतून आणखी वर निघाला आता त्याला वस्तूंच्या मोबदल्यात चांदी देणारे स्थानिक रहिवासी भेटू लागले, ही चांदी शुभ्र


व्हेनिसचा नाविक सेबॅस्टिअन कॅबट

राजा इंका याच्या राज्यातून येते अशीही माहिती त्याला मिळाली कॅबटने या प्रदेशात तीन वर्षे काढली तेथे त्याला थोडीबहुत संपत्ती मिळाली त्याने या प्रदेशाचे जे नकाशे काढून ठेवले त्याचा पुढील संशोधकांना फार उपयोग झाला

आता ब्राझीलपर्यंतचा प्रवास ही नित्याची गोष्ट झाली होती पोर्तुगीजांचे लक्ष आफ्रिकेकडे व हिंदुस्थानाकडे जास्त लागले होते त्यामुळे दक्षिण अमेरिकेत स्पेनला रान मोकळे मिळाले। पोर्तुगीजांची लहानशी वसाहत होती. पण ती मुख्यत. पळून आलेल्या

लोकांची होती। पुढे फ्रान्सच्या चाच्यांनी पोर्तुगीज जहाजावर हल्ला करावयास सुरुवात केल्यामुळे पोर्तुगीजाना वसाहत करणे भाग पडले। 'रिओ-द-प्लाटा' या प्रदेशाकडे स्पॅनिश लोकानी लक्ष दिले. आणि त्याना सध्याच्या साओ पावलो शहराजवळ साओ-व्हिन्सेट येथे उत्तम हवामानाचे पठार सापडले सन १५३२ मध्ये 'आल्फान्सो-द-सुझा' याने तेथे पहिली कायमची वसाहत स्थापन केली

स्पेनच्या हालचालीमुळे पोर्तुगीज सावध झाले पोर्तुगीजाच्या मते पूर्वेकडे त्याचा अधिकार होता व पॅसिफिक मार्गे मोल्युकास बेटाकडे जाण्यात पोपने दिलेल्या आज्ञांचा भग होत होता। पोर्तुगालला असा काही अधिकार नाही हे सिद्ध करण्यासाठी स्पेनने लोइसा या नाविकाच्या नेतृत्वाखाली मोल्युकास बेटाकडे मॅगेलानच्या सामुद्रधुनीतून सात जहाजे पाठवली पॅसिफिक महासागरात प्रवेश करीपर्यंत तीन जहाजे शिल्लक उरली पॅसिफिक महासागरातील १३० दिवसाच्या प्रवासानंतर फक्त एक जहाज मोल्युकास बेटाजवळ पोहोचले तेथील राजधानी तिडोर पोर्तुगीजानी जाळून टाकली होती स्पॅनिश लोकाशी व्यापार केल्याबद्दल त्यानी ही शिक्षा दिली होती स्पॅनिश जहाजाच्या खलाशांनी तेथेच मुक्काम केला व ते तीन वर्षे मोल्युकास बेटातच राहिले. पॅसिफिक महासागरात शिरलेल्या जहाजापैकी एक जहाज पॅसिफिक महासागर ओलाडायची भीती वाटल्यामुळे उत्तरेकडे वळले व मेक्सिकोपर्यंत पोहोचले अगदी योगायोगाने या जहाजाची आणि मेक्सिकोमधील स्पॅनिश विजेता कोर्टेझ याची गाठ पडली त्याने मोल्युकास बेटाकडे एक जहाज पाठवले. पोर्तुगीजाचा पराभव केला, आणि सध्या फिलिपाईन्स या नावाने ओळखला जाणारा द्वीपसमूह स्पेनच्या ताब्यात आला. □

प्रकरण तिसरे

# प्राचीन दक्षिण अमेरिकन संस्कृती

दक्षिण अमेरिकेतील आदिवासी तेथे केव्हा राहायला आला हे नक्की सांगता येत नाही, पण तो पचवीस हजार वर्षांपूर्वी बेअरिंग सामुद्रधुनीच्या वाटेने व पनामाच्या संयोगभूमीवरून दक्षिणेकडे उतरला असावा त्याची स्थानिक भाषा सर्वस्वी वेगळी होती तेथील नाना प्रकारच्या वनस्पती व अन्नपदार्थ बाहेरच्या जगाला अज्ञातच होते । दक्षिण अमेरिकेत पोहोचल्यावर स्थानिक परिस्थितीनुसार आदिवासी टोळ्यांची प्रगती निरनिराळ्या प्रकारे झाला

अँन्डीज पर्वतश्रेणी पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्याला समांतर धावते. किनाऱ्यापासून मुख्य पर्वतांची रांग शंभर ते दीडशे किलो-मीटर अंतरावर लागते कोकणपट्टीपासून सह्याद्रीच्या रांगा जशा पसरल्या आहेत तशीचही रचना आहे । शून्य अक्षांशाच्या उत्तरे-कडे आणि ४२ अंश दक्षिण अक्षांशाच्या दक्षिणेकडे या चिंचोळ्या किनारपट्टीत जंगल आहे पण मधली किनारपट्टी मात्र वाळवंटाचीच आहे. पॅसिफिक महासागराला मिळणाऱ्या लहान लहान नद्या या वाळवंटातून घुसल्या आहेत अँन्डीजच्या पूर्वेकडे बहुतेक सर्व नद्या तीन मुख्य नद्यांना मिळतात उत्तरेकडे जाणारी ओरिनोको नदी,

थेट पूर्वेकडे वळणारी ॲमेझॉन नदी. आणि दक्षिण-पूर्वेकडे वाहणारी ‘ रिओ द-प्लाटा ’ ऊर्फ ‘ रौप्य नदी ’ या तीन प्रमुख नद्या लक्षात घेतल्या म्हणजे दक्षिण अमेरिकेची भौगोलिक रचना समजेल या तीन नद्याना विभागणारी उच पठारे आहेत आणि मधून मधून पेरनामबुकोपासून सँटाकॅटारिनापर्यंत वाकडयातिकडया पसरलेल्या छोटया पर्वताच्या रांगा आहेत ॲमेझान नदीच्या खोऱ्यात सर्वांत जास्त तपमान आहे व सर्वांत जास्त पाऊस पडतो ५ अंश दक्षिण अक्षांशापासून ५० अंश दक्षिण अक्षांशापर्यंत एका अरुंद पट्टयात अजिबात पाऊस पडत नाही हा पट्टा सुरुवातीला ॲंडिज पर्वताच्या पश्चिमेकडे आहे, व आणखी दक्षिण दिशेला गेल्यानतर तो पट्टा ॲंडिज पर्वताच्या पूर्वेकडे येतो

ओरिनोको नदीच्या खोऱ्यात आर्वाक हे शात प्रवृत्तीचे ताम्र-वर्णीय राहात असत त्याची भाषा लांब दक्षिणेकडे पसरली होती ओरिनोको नदीच्या पूर्व किनाऱ्यावर राहाणारे कारिब ताम्रवर्णीय आर्वाक ताम्राचे शत्रू होते आणि ते नरभक्षकही होते युरोपियनाना त्यानी प्रखर विरोध केला ॲमेझानच्या खोऱ्यात व ब्राझीलच्या उच पठारावर तुपी जमातीचे ताम्रवर्णीय राहात होते त्याना अनेक प्रकारचे अन्नपदार्थ माहीत होते ते कपडे विणत असत आणि घरे बाधून राहात असत गुवारानी जमातीचे ताम्रवर्णीय रिओ-द-प्लाटाच्या म्हणजेच रौप्य नदीच्या मुखा-जवळ राहात असत ते स्वभावाने शात होते. ते मासेमारी करत’ व प्राथमिक स्वरूपाची शेतीही करत पपास सरोवराच्या दक्षिणे-कडे भटके व युद्धखोर लोक होते सध्याच्या दक्षिण चिलीमध्ये या युद्धखोर आरुकानियन जमातीचा प्रभाव होता

मध्य पेरूमध्ये संस्कृतीचा बराच विकास झाला होता. ‘ चाविन

ताम्रवर्णीय जमातींची मदिरे भव्य आकाराची होती भीती निर्माण करणारे मातीचे पुतळे ते बनवत. शेतीतही त्याची बरीच प्रगती झाली होती नाझका जमातीचे लोक मातीची रगीत भाडी बनविण्यात प्रवीण होते.

कोला जमातीच्या लोकानी टिटाकाका सरोवराजवळ दगडाची प्रचड बाधकामे केली होती. तो बहुधा बाजार असावा आणखीही काही ठिकाणी बऱ्याच प्रगत सस्कृतीचे अवशेष आढळून आले आहेत.

१५ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास क्वेच्यूआ जमातीचा उदय झाला त्यानी क्विडोपासून दक्षिण चिलीमधील अरुका-नियन प्रदेशापर्यंत आपले साम्राज्य स्थापले त्यांचा राजा इन्का



इका जमातीची शेतीची पद्धत

होता त्याला सूर्याचा अवतार मानले जाई त्याची देवाप्रमाणे पूजा होई व त्याच्या नावाने मंदिरेही बांधली जात एकप्रकारे त्याची हुकूमशाहीच होती पण त्यामुळे आर्थिक विकास होत होता त्यांच्या संस्कृतीला लिखित भाषा नव्हती, पण दोऱ्याची विशिष्ट गुंफण करून ते निरोप पाठवू शकत असत कुझको येथे त्यांनी दगडाची प्रचंड बांधकामे केली.

उत्तरेकडे मॅग्डलेना नदीच्या मुखाजवळ ' चिपचा ' जमातीच्या ताम्रवर्णीयांनी शेतीत बरीच प्रगती केली होती व्यापार करण्या-साठी ते लोक रत्ने, सोने व मीठ चलनाप्रमाणे वापरत असत नाणी म्हणून सोन्याच्या गोल चकत्या ते वापरत वजनमापाची पद्धती त्यांनी शोधून काढली होती

दक्षिण अमेरिका खंड रिकामे नव्हते सन १५०० मध्ये या खंडात एक ते तीन कोटी लोक राहात असावेत. या पुढच्या काळात ही लोकसंख्या खूपच कमी झाली.

□

प्रकरण चौथे

## पश्चिम किनारा

पनामामध्ये या वेळी दोन निरक्षर धाडसी पुरुष बरेच श्रीमंत झाले होते आणि त्याचा प्रभाव वाढत होता.

ओजेडाचा विश्वासू अनुयायी फ्रान्सिस्को पिझारो व दियागो –द–अल्माग्रो अशी त्याची नावे होती पिझारोनेच बल्बोआला अटक केली होती त्याच्याकडे अनेक ताम्रवर्णीय गुलाम होते. अल्माग्रो त्या मानाने उदार अत करणाचा होता काटकसरीने राहून त्याने बरीच जमीन, कुळे व गुलाम जमविले होते या दोघानी राज्यपाल पेड्रारिआस याचा मित्र धर्मोपदेशक द–लूक याच्याबरोबर भागीदारी ठरविली आणि एक मोहीम काढावयाचे ठरविले दक्षिणेकडे तीन श्रीमत राज्ये आहेत अशी बातमी १५२२ मध्ये त्याना समजली होती तेथील सपत्ती लुटण्यासाठीच त्या तिघानी ही मोहीम काढावयाचे ठरविले होते द–लूकने पंधरा हजार पौंड जमविले, आणि दोन जहाजे घेऊन पिझारो व अलमांग्रो मोहिमेवर निघाले तीन वर्षे ते फिरत राहिले या काळात त्याची उपासमार झाली, सकटे आली, अनेक सैनिक मेले पण त्यांच्या हाती काहीच लागले नाही सन १५२६ मध्ये रसद घेण्यासाठी ते पनामा येथे थाबले, व पुन्हा एकदा मोहिमेवर निघाले

विषुववृत्ताजवळ पोचल्यावर त्याना सुसंस्कृत जमातीची चिन्हे दिसू लागली. अलमाग्रो रसद आणायला पनामाला परतला आणि जवळच्याच गालो बेटावर पिझारो वाट पाहात थांबला रोज पडणारा मुसळधार पाऊस आणि डास यामुळे तो त्रासून गेला रसद घेऊन जहाज आले तेव्हा पिझारोला परत घेऊन येण्याविषयी राज्यपालाने आज्ञा दिली होती पिझारोने वाळूमध्ये एक रेषा काढली ज्याना मोहिमेवर येण्याची इच्छा आहे, त्याना रेषा ओलाडून पलीकडे येण्यास सागितले तेरा लोकांनी रेषा ओलांडली बाकीच्याना त्याने परत पाठविले अलमाग्रोची वाट पाहात तें तेथेच थांबले अशी प्रतीक्षा करण्यात सात महिने गेले शेवटी अलमांग्रो सैनिक व रसद घेऊन एकदाचा पोचला. आता त्यांनी विषुववृत्त ओलांडले आणि ३ अंश दक्षिण अक्षांशावर त्यानी ग्वायकिल उपसागरात प्रवेश केला तेथे तुबेझ हे इका राजाचे मोठे शहर वसलेले होते, तेथील समाज सघटित होता, आणि तेथे बरीच सपत्ती असावी असे वाटत होते ते किनाऱ्यावर उतरले तेव्हा त्याना विरोध झाला नाही तेथे सोने सापडेल अशी खात्री नव्हती मग पिझारो पनामाला परतला सोने-चांदी न मिळाल्यामुळे त्याच्या भागीदारानी यापुढे मदत करायचे नाकारले मग पिझारो स्पेनला परतला आणि राजाकडून त्याने स्वत साठी पेरू देशाचे आजीव प्रशासकपद मिळविले त्याबद्दल पुष्कळ सपत्ती पाठविण्याचे आश्वासन त्याने दिले स्पेनच्या राजाला कागदावर खलिता लिहिण्यापलीकडे काहीच खर्च नव्हता ! शेवटी १५३० मध्ये पिझारोने पेरू देशावर स्वारी करावयाचे ठरविले. तो १ अंश उत्तर अक्षाशावरच्या सॅन माटेओ या जागी उतरला

व तेथून किनाऱ्याने दक्षिणकडे जाऊ लागला. जवळच काक येथ पाचू, हिरे व सोने मोठ्या प्रमाणात मिळाले. ही बातमी पनामाला पोचल्यामुळे त्याच्या टोळीत बरेच लोक सामील होण्यासाठी आले. सहा महिन्यानी त्याने मागच्या सफरीत पाहून ठेवलेले हे शहर हस्तगत केले व लुटले. तेथून दक्षिणेकडे २५० किलोमीटरवर पिझारोला चिरा नदीच्या किनारी एक चागली जागा सापडली. तेथेच स्पॅनिशाचे पेरू देशातील पहिले शहर 'सॅन मिग्युएल'ची स्थापना झाली.

पिझारो धाडसी होता. त्याच्याजवळ घोडेस्वार होते आणि बदुका होत्या तरीही इन्कावर त्याला विजय योगायोगानेच मिळाला इन्का लोकांच्या धर्मात सागितले होते की, राज्य घेण्यासाठी गोरा देव समुद्रावरून एक दिवस येणार आहे' हा एक योगायोग सातच वर्षांपूर्वी इन्काचा पराक्रमी राजा कापेक मृत्यू पावला होता त्याची दोन मुले उकासार आणि अटाहुल्फा दोन ठिकाणी राज्य करीत होते. पिझारो तेथे येण्यापूर्वी वर्षभरच त्या दोघात यादवी युद्ध होऊन अटाहुल्फाचा जय झाला होता त्यानी आपली राजधानी कजामार्का येथे ठेविली होती अँडियन पर्वताच्या कुशीत हे शहर होते, आणि सभोवती १४ हजार फूट उचीची पर्वतशिखरे होती. 'सॅन मिग्युएलच्या दक्षिणेकडे २४०० मैलाची किनारपट्टी निर्जल वाळवटाचीच होती धाडसी पिझारोने सेच्यूरा वाळवटातून वाट काढली आणि अँडियन पर्वताच्या खिंडीतून तो पेरू देशाकडे निघाला

मार्गात त्याना काहीच विरोध झाला नाही. पिझारोबरोबर १०८ सैनिक होते. त्यातले ६२ घोडेस्वार होते. इन्का लोकांच्या तीस हजाराच्या जमावादेखत पिझारोने १५ नोव्हेंबर १५३२

रोजी रिकाम्या केलेल्या कझमार्का शहरात प्रवेश केला व तेथेच त्यानी मुक्काम केला. तीस हजारापैकी एकानेही विरोध केला नाही दुसऱ्या दिवशी फर्नांडो-डी-सोटो याने इन्काच्या राजाला निरोप दिला की, 'तुझा भाऊ तुला भेटू इच्छितो' शहरामधल्या चौकात पिझारोने इन्काचे स्वागत केले इन्का सोन्याच्या सिंहासनावर पालखीसारख्या एका वाहनातून आला होता. इन्काच्या राजाला स्पेनच्या राजाचे घोषणापत्रक वाचून दाखवण्यात आले भाषान्तर करून त्याचा अर्थ सांगितल्यावर अटाहुल्फा संतापला आणि त्याने ते घोषणापत्रक नाकारले व लढाईचा संकेत केला अर्ध्या तासाच्या आत स्पॅनिशांनी दोन हजार लोक ठार केले व अटाहुल्फाला कैद केले राजा नसल्याने इन्काचे सैनिक हतबुद्ध झाले

दुसऱ्याच दिवशी स्पॅनिशानी लूट जमवायला सुरुवात केली त्यानी अटाहुल्फा राजाला सन्मानाने वागवले व त्याला बुद्धिबळे खेळायलाही शिकवले त्याने पाहिले की स्पॅनिशाना सोन्याचा फार मोह आहे तेव्हा आपली सुटका होण्यासाठी त्याने १७ फूट लांब व १२ फूट रुंद आणि ७ फूट उंच खोली पूर्णपणे भरेल इतके सोने द्यायचे कबूल केले पिझारोने ते मान्य केले आणि दोन महिन्यात ३३ लाख पौंड किंवा सहा कोटी रुपये किंमतीचे सोने जमले हे सोने दागिने, पुतळे, भांडी व कलाकुसरीच्या वस्तू या स्वरूपात होते दुर्दैवाने ते सर्व वितळविण्यात आले लुटीची वाटणी करण्यात आली आणि पंचमांश भाग स्पेनच्या राजाला पाठविण्यात आला पनामाहून अल्माग्रो आणखी सैन्य घेऊन आला अटाहुल्पा राजाला स्वातंत्र्य दिले असते तर इन्का उलटण्याचा संभव होता म्हणून राजद्रोहाच्या आरोपाखाली त्याला दोषी

ठरवून मृत्यूदंड देण्यात आला त्याला जाहीररीत्या सर्वांसमक्ष गळा दाबून मारण्यात आले आता सर्व प्रकारचा विरोध संपला. नामधारी राजा असावा म्हणून कापेकच्या मुलाला राज्यावर बसविण्यात आले

इन्काच्या राज्यात कुझो हे दुसरे संपन्न राज्य होते पिझारो आता तिकडे जायला निघाला आता वसंतऋतू सुरू झाला होता पेरू देशाच्या मध्यवर्ती खोऱ्यातील हा प्रदेश फारच रमणीय होता डावीकडे पेरूमधील २२ हजार फूट उचीची शिखरे होती व त्यांच्या शिखरावर बर्फ होते रस्ताही प्रवासाला चागला होता वाटेत त्याना फारसा विरोध झाला नाही ‘ कजामार्का ’ येथील विजयानतर एका वर्षाने त्यानी कुझको शहरात प्रवेश केला इन्काची ही उपराजधानी समुद्रसपाटीपासून ११२५० फूट उच होती ह्या ठिकाणी इन्का लोकांची संस्कृती व कला जास्तच प्रगत झाली होती, आणि संपत्तीही खूप साठवलेली होती स्पॅनिशानी येथे अधिक क्रूरपणे लूटमार केली येथून पिझारो क्येचूहा येथे छापा घालायला निघाला येथे स्पॅनिशानी इन्का संस्कृतीच्या सूर्यमदिराचे रूपांतर गिलावा वगैरे करून चर्चमध्ये केले होते चारशे वर्षांनतर अलीकडे झालेल्या भूकपात गिलावा गळून पडला व इन्काचे सूर्यमदिर दिसू लागले.

तेथून उत्तरेकडे मध्य अमेरिकेत दुसरा एक महत्त्वाकाक्षी स्पॅनिश विजेता धुमाकूळ घालत होता त्याचे नाव पेड्रो-द-अल्वोराडो पिझारो आणि अल्माग्रो याना मिळालेल्या घबाडाची बातमी त्याच्या कानावर आली तेव्हा त्याने दक्षिणेकडे मोहीम काढावयाचे तावडतोब ठरविले विषुववृत्ताजवळच्या जगलानी भरलेल्या किनाऱ्याजवळ तो उतरला त्याचे बरोबर पाचशे

सैनिक, ग्वाटेमालातील दोन हजार गुलाम व २२७ घोडे होते. तो इन्का साम्राज्याच्या उत्तरेला पोहोचला होता तरीही त्याला भरपूर लूट मिळाली खरे पाचूचे रत्न हातोड्याच्या घावाने फुटत नाही अशी गैरसमजूत त्या काळी होती. अशी हातोड्या-खाली परीक्षा घेण्यामध्ये त्याने हजारो पाचू वाया घालवले तेथील हिरव्यागार जगलात व दलदलीत त्याना अन्न मिळेनासे झाले. तेव्हा लुटीपैकी बराचसा माल वाहून न्यायला पुरेसे लोक न मिळाल्यामुळे तो मागेच टाकावा लागला. इन्काच्या साम्राज्यात क्विटो हे शहर होते ते पर्वतमय प्रदेशात शिखरांनी वेढलेले होते तेथे खूप सोने आहे असे बोलले जात होते उच्च पर्वतराजी-तून जाणारे रस्ते स्पॅनिश सैनिकाना परिचित होते. पण अल्वो-राडोने जे ग्वाटेमालातील दोन हजार गुलाम आणले होते, त्याना थडीची सवय नव्हती व त्यांच्याजवळ उबदार कपडेही नव्हते तेव्हा या डोंगरातल्या रस्त्याने जाताना शेकडो लोक मृत्यू पावले. इतक्या कष्टातून जेव्हा अल्वोराडो क्विटो शहरात पोहोचला तेव्हा पिझारोच्या एका दुय्यम सेनानीने तेथे आधीच तळ टाकून लूटमार केली आहे असे त्याला आढळले.

पिझारोने सॅन मिग्युएलच्या रक्षणाकरता सेबास्टियन-द-बेनाल्कझार याला नेमले होते लुटीच्या बातम्या मिळाल्यामुळे अनेक लोक तेथे गोळा झाले होते. त्याची त्याने आपल्या सैन्यात भरती केली त्याच वेळी त्याच्याकडे कानरी जमातीच्या ताम्र-वर्णीयानी लष्करी मदतीची विनती केली. रुमिनावी या जुलमी इन्का सेनापतीविरुद्ध लढण्यासाठी ही मदत हवी होती या संधीचा फायदा घऊन सेबास्टियनने आपले स्वतःचेच राज्य स्थापण्याचे ठरविले रुमानावीचे सैन्य स्पॅनिश लोकापुढे मुळीच टिकले

नाही सेबास्टियननें तेथे स्पॅनिश वसाहतही स्थापन केली· अल्वोराडो आणि अल्माग्रो उत्तरेकडे पोहोचले तेव्हा सेबॅस्टियन बेनाल्कझार चांगलाच पाय रोवून बसला होता आता या स्पॅनिश लोकातच लढाई होणार की काय असे वाटले पण वाटाघाटी होऊन तोडगा निघाला अल्वोराडोने आपली हत्यारे व सैनिक एक लाख सुवर्ण नाण्याच्या बदली बेनाल्कझारला दिले आणि तो अल्माग्रोबरोबर दक्षिणेकडे पिझारोला भेटायला निघाला बेनाल्कझारला इक्वोडोर येथेच अमल गाजवायला मोकळीक दिली फक्त त्याने पिझारोच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत असे ठरले.

पाचाकामक हे इन्काचे शहर त्याच्या तीर्थयात्रेचे ठिकाण होते इन्काचा राजा आटाहुल्पा कैदेत असताना त्याने आपले सैनिक या शहराकडे पाठविले होते त्याना तेथे लुरिन खोऱ्यात एक मोठा पिरॅमिड आढळला हे लुरीन खोरे नाझका वाळवटात ओयासिसप्रमाणे होते. तेथे पुष्कळच सपत्ती स्पॅनिश विजेत्याना मिळाली तेथील उत्खननात आजही भाडी व विणलेली वस्त्रे सापडतात. पिझारोने या परिसरातच आपली राजधानी स्थापण्याचे १५३५ साली ठरविले कुझको खूपच अतभागात व उच पठारावर होते सॅन मिग्युयेल सुपीक प्रदेशापासून फार लाब होते. म्हणून पाचाकामक शहरापासून ३२ किलोमीटर उत्तरेकडे रिमेक नदीकिनारी पिझारोने आपली राजधानी स्थापण्याचे ठरविले त्याने या शहराचे नाव ‘ सिटी ऑफ किंग्ज ’— ‘ राजाचे शहर ’ असे ठेवले नतर हे शहर लिमा या नावाने प्रसिद्ध झाले येथे सन १५५५ मध्ये मार्कोस विश्वविद्यालयाची स्थापना झाली पॅसिफिक महासागराच्या या किनाऱ्यावर थडीच्या दिवसात सतत धुके पसरलेले असते त्यामुळे तेथील हवामान सौम्य झाले आहे येथे

पाऊस कधीच पडत नाही विषुववृत्तापासून फक्त १२ अंश दक्षिणेकडे असले तरी तेथे विषुववृत्तीय हवामान व उकाडा अजिबात नाही. यामुळेच तेथील लोक नेहमी उत्साही दिसतात

## रिओ–द–ला–प्लाटा, रौप्यनदी

दक्षिण अमेरिकेच्या अंतर्भागात स्पॅनिशांनी पश्चिमेकडून म्हणजे पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्याकडून प्रवेश केला व राज्ये स्थापली. त्या मानाने त्यांनी पूर्व किनाऱ्याकडे फारसे लक्ष दिले नाही पोर्तुगीज राजा तिसरा जॉन याने मार्टिन अल्फान्सो डिसोझा याला सन १५३० मध्ये पूर्व किनाऱ्याकडे संशोधन करायला पाठविले त्याचे बरोबर १५१५–१६ मध्ये गेलेल्या सोलीस याच्या मोहिमेतून वाचलेला हेन्री मॉंटेस हा नाविक होता. त्यांनी या वेळी पराना नदीची आणखी एक उपनदी शोधली पण त्यांना संपत्ती काही मिळाली नाही फुकटच्या संशोधनासाठी स्पॅनिशांची गैरमर्जी परवडण्यासारखी नव्हती म्हणून ते सर्व ब्राझिलला परतले.

सन १५३६ मध्ये स्पॅनिशांनी एक वसाहत स्थापन केली. प्लाटा नदीच्या दक्षिण तीरावर पेट्रो–द–मेंडोझा याने वसाहत स्थापून तिचे नाव ' द पोर्ट ऑफ अवर गुड लेडी ऑफ सेंट मेरी' असे ठेवले तेच शहर आज ' ब्युनोस आयर्स ' या नावाने ओळखले जाते तेथे जमीन सपाट होती व हवा दमट होती तेथील स्थानिक रहिवाशी भटके होते ते शिकार करून व मासेमारी करून उपजिविका चालवत असत स्पॅनिश लोकांशी ते मित्रत्वाने वागत नव्हते नवीन वसाहतींतल्या एक हजार स्पॅनिश लोकांना शेती करणे भाग होते. त्याशिवाय त्यांना अन्न मिळाले नसते

युरुग्वेच्या बाजूलाही परिस्थिती समाधानकारक नव्हती. तेथे राहणारे चारुआस ताम्रवर्णीय धाडसी व क्रूर होते. ' ज्युआॅन-द-आयोलास ' याला पराना नदीतून वर पाठविण्यात आले. कॅबटने तयार केलेले नकाशे त्याला उपयोगी पडले त्याचेबरोबर लहानशी सैन्यतुकडी होती त्याना एक ताम्रवर्णीय भेटला त्याने 'अलेजो गार्सिया ' बरोबर प्रवास केला होता त्याने आयोलासला अँडीज पर्वताकडे वाट दाखवण्याचे मान्य केले. वाटेतील आदिवासींशी लढाई करत त्याने चारकास ताम्रवर्णीयाच्या प्रदेशापर्यंत प्रवास केला तेथे त्याना पुष्कळच संपत्ती मिळाली पण परतीच्या ताम्रवर्णीयांनी त्यांच्यावर छापे घातले. आणि त्यातच आयोलास मारला गेला

पॅराना नदीच्या वरच्या भागात पॅराग्वे व पिल्कोमायो नद्यांच्या संगमाजवळ गुवारानी ही शांत ताम्रवर्णीय जमात राहात होती येथेच आयोलासच्या तुकडीपैकी काहीजण थांबले आणि त्यांनी ऑसेन्शनची वसाहत उभी केली पराग्वे देशाची राजधानी म्हणून आज ऑसेन्शन शहर प्रसिद्ध आहे. ब्युनोस आयर्सची स्थापना करणाऱ्या मेंडोझाने त्या प्रदेशाला अर्जेंटा म्हणजेच 'लँड ऑफ सिल्व्हर'– ' रौप्य प्रदेश ' असे नाव दिले. ब्युनोस आयर्स-मधील अनेकजण ऑसेन्शन येथे राहायला गेले ऑसेन्शन हे शहर मकरवृत्ताच्या अगदी जवळ आहे. तेथील सौम्य उन्हाळा व कडक थंडी स्पॅनिशाना आवडली पॅराना नदीत दरवर्षी पुराबरोबर वाळू वाहून येऊन नदीमध्ये अडथळे निर्माण होत असत त्यामुळे जहाजाच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होत असे जहाजाच्या वाहतुकीच्या या गैरव्यवस्थेमुळे ऑसेन्शन शहराची वाढ होत नव्हती सन १५४२ मध्ये काबेझा-द-वाका याची पूर्व किनाऱ्या-

वरील राज्यपाल म्हणून नेमणूक झाली तो दोनशे सैनिकासह सॅन्टा काटारिना येथे उतरला आणि गार्सियाप्रमाणे जमिनीवरून चालत ॲसेन्शनला पोहोचला तो ज्या रस्त्याने आला तो रस्ता लवकरच व्यापारी मार्ग बनला

या काळात स्पॅनिश लोकाचे सर्व लक्ष ॲसेन्शन येथेच केंद्रित झाले होते तेथूनच उत्तरेकडे संशोधन करता येत असे ॲसेन्शनच्या पश्चिमेस असलेल्या ग्रानचाको वाळवटामुळे पश्चिमेकडचा मार्ग अडला होता म्हणून पेरू देशातील स्पॅनिश वसाहतींशी पूर्व किनाऱ्याकडून सबध जोडण्याचा प्रयत्न १५४६ पर्यंत होऊ शकला नाही

□

प्रकरण पाचवे

# चिली

सन १५३५ पर्यंत दक्षिण अमेरिकेची बाह्य किनारपट्टी माहीत झाली होती अतर्भाग मात्र बराचसा अज्ञातच होता आता पिझारो पेरू देशाचा सत्ताधीश झाला होता अल्माग्रोला नुकसान भरपाई म्हणून चिली देश देण्याची त्याने तयारी दाखविली त्या वेळी त्या प्रदेशाला न्यू टोलेडे असे नाव होते अल्माग्रो मग मोठा काफला घेऊन कुझको शहरातून बाहेर पडला ते जरा अनिच्छेनेच जात होते पण पेरू देशाप्रमाणेच नवीन प्रदेशातही अफाट सपत्ती आपली वाट पाहात आहे, याची त्याच्यातील एकालाही कल्पना आली नव्हती त्या वेळी हिवाळा होता व हवा कोरडी होती हा काळ प्रवासाला चागला होता इन्का राजाचा भाऊ पाऊलू त्याचेबरोबर मार्गदर्शक म्हणून निघाला. कारण इन्काचे साम्राज्य दक्षिणेकडे १६०० किलोमीटरपर्यंत पसरले होते. या डोंगराळ प्रदेशातून इन्कानी रस्ता तयार केलेला होता त्या रस्त्यानेच ते निघाले होते हा रस्ता समुद्रसपाटीपासून १५००० फूट म्हणजेच ४५७२ मीटर उचीवरून अनेकदा जात होता. त्या उचीवरचा हा अल्टिप्लेनो पठाराचा मुलूख अगदी विचित्र होता स्पॅनिशाना असा मुलूख कधीच भेटला नव्हता.

तेथे एकही झाड नव्हते की लहानसे झुडुपही नव्हते माणसाच्या वस्तीची पुसट चिन्हेही कोठे दिसत नव्हती.

या सर्व ओसाड प्रदेशात निळेशार पाणी असलेले टिटाकाका सरोवर हे एक आश्चर्यच होते ! ते सरोवर १४४ किलोमीटर लांब होते व सरोवरात अनेक बेटे होती त्यातील काही बेटे इन्का संस्कृतीची तीर्थस्थाने होती. सरोवराचा किनारा रमणीय होता व सरोवराचे पाणी पारदर्शक व स्वच्छ होते या सरोवरातून एक लहानशी नदी निघून १२७ किलोमीटर वरील पोपो [illegible] पाणी ॲटकामा वाळवटात पाझरत होते व तेथे गुप्त होत होते सरोवराच्या दक्षिण टोकाकडून थोडे पूर्वेकडे गेल्यावर दगडी बांधकामाचे अवशेष पडलेले होते इन्का संस्कृतीच्या पूर्वी होऊन गेलेल्या कोणत्यातरी अज्ञात संस्कृतीचे ते अवशेष होते या जागेला टीहुआनको असे नाव होते

अल्माग्रोच्या नजरेपुढे पसरलेला देखावा थक्क करणारा होता ! दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे अटाकामा वाळवट पसरले होते जगातल्या मोठ्या वाळवटातील हे एक आहे पूर्वेकडे उच्च पर्वतराजी होती व त्याच्या शिखरावर बर्फ होते

पावलूच्या मार्गदर्शनाखाली अल्माग्रो दक्षिणेकडे जात होता पावलूच्या सपर्कामुळे ताम्रवर्णीयाचा विरोध होत नव्हता ज्वालामुखीचा प्रदेश टाळण्यासाठी तो पूर्वेकडे वळला आणि तेथून इन्का साम्राज्याच्या चाराकास या प्रांतात उतरला तेथील नद्या दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे अज्ञात प्रदेशात वाहत जात होत्या

ते आता कुझकोपासून १२८० किलोमीटर आले होते त्या ठिकाणी त्याना उताराची जमीन लागली आणि दक्षिणेकडे तोंड

असलेल्या खोऱ्यात ते पोहचले. येथील हवा उत्तम व उबदार होती. साल्टा या ठिकाणाजवळ त्यांनी अॅन्डीज पर्वत ओलाडला. त्यावेळी त्याच्या ताब्यातले १५०० ताम्रवर्णीय थडीमुळे मृत्यू पावले आता ते पॅसिफिक महासागरावरच्या किनाऱ्यावरील कोपियापो येथे पोचले होते येथे त्याना भरपूर प्रमाणात अन्न मिळाले. अल्माग्रोने त्याला होणारा विरोध अत्यत क्रूरपणे दडपला आणि स्पॅनिश सत्ता कायम केली एकदा तीन स्पॅनिशाना ठार केल्याबद्दल त्याने ताम्रवर्णीयाच्या तेरा टोळीप्रमुखांना पकडले आणि जिवत जाळले. येथे प्रदेश रमणीय होता, जमीन सुपीक होती, व हवामान सुखदायक होते तरी पण अल्माग्रोचे समाधान झाले नाही. कारण त्याना सोने किंवा चांदी मिळाली नव्हती. तो दक्षिणेकडे ३६ अश दक्षिण अक्षांशाजवळ असलेल्या मॉले नदीपर्यंत पोचला. तेथील स्थानिक ताम्रवर्णीयानी फारच प्रखर विरोध केला तेव्हा त्याला पुढचा प्रवास सोडून द्यावा लागला त्याचवेळी पेरूमध्ये बड झाल्याची बातमी आल्यामुळे त्याने कुझकोकडे परतायचे ठरविले किनारपट्टीने परतताना त्याने अटकामा वाळवंट ओलाडले हे वाळवंट ओलांडताना त्याची उपासमार झाली

इकडे पेरू देशामध्ये कैदेत ठेवलेला इन्का 'मानको' निसटला आणि त्याने सैन्य जमवून कुझकोला वेढा घातला. लहान लहान स्पॅनिश तुकड्याचा त्याने नायनाट केला. अल्माग्रो परत आल्यावर त्याने मानकोचा पराभव केला मानको जवळच्या विल्काम्बा पर्वतराजीत पळून गेला. अल्माग्रोने कुझको शहर स्वत च्या ताब्यात घेतले. पण फ्रॉन्सिस्को पिझारोने त्याच्याशी लढाई केली आणि अल्माग्रोला पकडले आणि आपल्याच पूर्वीच्या

जीवश्चकठश्च मित्रावर व सहकाऱ्यावर खटला चालवून त्याला फाशी दिले

ॲन्डीज पर्वताच्या पलीकडे स्पॅनिश विजेते फारसे गेले नव्हते. एकट्या अल्माग्रोने चिलीपर्यंतचा प्रवास करताना ॲन्डीज पर्वत ओलाडला होता स्पॅनिश लोकाच्या नव्या टोळ्या पेरू देशात घुसल्या पण तेथे पूर्वी आलेल्या स्पॅनिशानी सर्व जमीन वाटून घेतली आहे असे त्याना आढळले मग त्यांच्यातील काहीजण सोने-चादी मिळविण्यासाठी पर्वत ओलाडून पूर्वेकडे जायचा विचार करू लागले टिटाकाका सरोवराजवळ या उच पठाराचे टोक थोडे पूर्वेकडे वळले होते पण इतरत्र अतिशय घनदाट अरण्याचा प्रदेश सुरू होत होता मोठ्या मोठ्या नद्या या घनदाट जगलात शिरून नाहीशा झालेल्या दिसत होत्या या घनदाट जगलात शिरणे अशक्य होते आणि एकदा शिरल्यास पुढे वाट काढणे अशक्य होते स्पॅनिश सैनिकाच्या जवळ सशोधनाचा परवाना आणि ताम्रवर्णीयाचे धर्मातर करण्याविषयी आज्ञा वगैरे कागदपत्रे घेतलेली असत पण त्याचा मुख्य उद्देश सोने मिळविणे असे हे लोभी स्पॅनिश सैनिक सोन्याविषयी कोणत्याही गप्पावर विश्वास ठेवत आणि त्याच्या शोधाला निघत त्यातल्या एखाद्याला गाळाचे जमीनीत सोने सापडे सुद्धा, पण ते फारच कमी प्रमाणात असे त्यातलेच काही स्पॅनिश लोक शेवटी तेथे कायमचे राहिले आणि शेती करू लागले व ताम्रवर्णीयावर जुलूम करू लागले. मूर्ख स्पॅनिश सैनिक ताम्रवर्णीयांना पकडत आणि त्याचा छळ करून सोन्याबद्दलची माहिती मिळविण्याबाबत प्रयत्न करत. हे त्याच्या छळातून सुटण्यासाठी वाटेल ती गप्प झोकून देत यातूनच एल् डोरॅडोची गप्प निर्माण झाली दक्षिण अमेरिकेत कोठेतरी एल्

डोरॉडो नावाचे सुवर्णाने भरलेले शहर आहे आणि तेथील राजा आघोळीच्या आधी सर्वांगाला सोन्याची पूड चोळतो वगैरे दतकथा प्रचारात होत्या आणि स्पॅनिश सैनिकाचा त्यावर विश्वासही होता ! हे एल् डोराडो कधीच सापडले नाही सोन्याच्या या निष्फळ शोधामधून अॅन्डीज पर्वतातून पूर्वेकडे वाहणाऱ्या बऱ्याच नद्यांच्या उगमाच्या प्रदेशाची माहिती झाली पण त्याच्या पलीकडचे घनदाट अरण्य अज्ञातच राहिले.

स्पॅनिशानी स्थानिक ताम्रवर्णीयाना फारच वाईट व क्रूर वागणूक दिली अनेकदा गुलामाना गळचात कडचा अडकवून बाधत असत जर एखादा गुलाम प्रवासात आजारी पडला किंवा दमला तर त्याच्या गळचातील कडे सोडवण्यात बराच वेळ जाई म्हणून त्याचे डोके उडवून टाकत असत ! अशा प्रकारच्या क्रूर वागणुकीमुळे व जुलमामुळे हळूहळू स्थानिक ताम्रवर्णीयाची लोकसख्या कमी होऊ लागली. काही ठिकाणी त्याचा वश नष्ट झाला फक्त मौंटाना सारख्या विस्तीर्ण प्रदेशात ताम्रवर्णीय जिवत राहू शकले कारण तेथे स्पॅनिश सैनिकाना पोचणे अवघड जात होते

विलकाम्बा पर्वतश्रेणी व त्यासारखे आणखी काही प्रदेश इतके दुर्गम होते की तेथे जाणे स्पॅनिशाना शक्य नव्हते. १९५० पर्यंत तेथील शिखरे पादाक्रान्त झाली नव्हती. एका बाजूला अॅपूरीमॅक नदी आणि दुसऱ्याबाजूला उरुबाम्बा नदी याच्या दुआबातील प्रदेश घनदाट अरण्याचा आहे आणि आजही त्या प्रदेशात वस्ती जवळ जवळ नाही येथून जवळच नऊ हजार फूट उचीच्या एका पर्वतश्रेणीच्या पायथ्याशी इन्काचे माचूपिचू हे शहर होते त्याचा स्पॅनिशांना पत्ता लागला नव्हता. त्या शहरी

काही इन्का सरदार राहात होते, पण त्याची सत्ता फारच लहान भागात होती त्यानी स्पॅनिशावर मधूनमधून हल्ले केले, पण शेवटी स्पॅनिशाचाच जय झाला. शेवटचा इन्का राजा टुपाक अमारू याला त्याच्या सर्व सरदारासह स्पॅनिशांनी फाशी दिले

## उत्तर पूर्वेचा प्रदेश

स्पॅनिश दक्षिणेकडून उत्तरेकडे आपल्या वसाहती सरकवत होते. ॲन्डीज पर्वताच्या पूर्व बाजूला असलेला प्रदेश त्याना स्पेनची आठवण करून देत असे पण क्विटो येथील प्रदेश अगदी निराळा होता या शहराकडे येण्याचा रस्ता ४८ किलोमीटरच्या एका



क्विटो (पेरू) मधील ज्वालामुखी

पठारावरून होता. मार्गाच्या दोन्ही बाजूला पहाऱ्यासाठी उभ्या राहिलेल्या सैनिकांप्रमाणे उंच उंच ज्वालामुखीच्या डोंगराची राग लागलेली होती. सिम्बोराझो हा ज्वालामुखी वीस हजार फूट म्हणजेच ६०९६ मीटर उंचीचा होता. येथे चालून गेलेला स्पॅनिश सेनापती बेनाल्कझार याला तेथील नागरिकानी मदत केली. पण शिस्तबद्ध ताम्रवर्णीय सैनिकाशी त्याला लढावे लागले तेथील रायोबाम्बा प्रदेशाचा राजा काचुलिमा याने ख्रिस्ती व्हायला समती दिली तेव्हा त्याला नवीन स्पॅनिश राज्ययन्त्रणेत चागली जागा मिळाली

स्पॅनिशांनी येथील युद्ध जिंकले आठ महिन्याच्या युद्धानतर क्विटो त्याच्या ताब्यात आले सोने काढून घेण्यासाठी बेनाल्क-झारने अनन्वित अत्याचार व जुलूम केले त्याच्या या अत्या-चारामुळे वीट आलेला स्पॅनिश धर्मोपदेशक मार्को-द-लिझा स्पेनला परतला आणि स्पॅनिश लोकाच्या अत्याचाराबद्दल त्याने अहवाल लिहिला व प्रसिद्ध केला

क्विटो शहर समुद्रसपाटीपासून ९३०० फूट किंवा २८३५ मीटर उचीवर आहे तेथील हवा दमट पण उत्साही आहे. ज्वालामुखीमुळे भुसभुशीत झालेल्या जमिनीत झाडे उगवत नाहीत फक्त झुडपे दिसतात आसपास उच पठारे आहेत, तेथे गुरे व मेंढ्या चरू शकतात. पिके फारशी होत नाहीत

क्विटोच्याच अक्षांशावर किनाऱ्यावर लिमा हे शहर आहे स्थानिक लोकाना तेथले हवामान आवडत नसे खूप दिवसपर्यंत क्विटोकडून लिमाकडे जायला रस्ता नव्हता स्पॅनिश विजेते इन्कानी तयार केलेल्या रस्त्यावरूनच गेले होते पण उत्तरेकडे

आणि पश्चिमेकडे इंकाचे अधिराज्य केव्हाच नव्हते. तेव्हा त्या प्रदेशांविषयी फारशी माहिती नव्हती

आपल्या पहिल्या १६० किलोमीटरच्या प्रवासात बेनाल्कझारला सर्व प्रकारचा प्रदेश भेटला. गोयालबाबा नदीच्या खोऱ्यात अतिशय सुपीक जमीन होती. त्याच्या पलीकडे अँडीज पर्वताच्या पायथ्याशी अतिशय नापीक जमीन होती स्थानिक ताम्रवर्णीयांपैकी काही जमाती नरभक्षक होत्या तर बाकीच्या असघटित असून त्यांची आपसात नेहमी युद्धे चालत असत अशा ताम्रवर्णीयांचा पराभव करणे फार सोपे होते तेथून पुढे गेल्यावर प्रदेश दुर्गम होऊ लागला. अँडियन पर्वताच्या तीन रांगा वेड्यावाकड्या पसरल्या होत्या. या रांगाच्या मधल्या खोऱ्यात थोडीफार सुपीक जमीन होती. पण एकंदर प्रदेश डोंगराळ होता नदीकाठच्या अरुंद पट्ट्यातच शेती करणे शक्य होते.

बेनाल्कझारला चांगल्या गोष्टीची निवड करण्याची उपजत बुद्धी असावी. त्यामुळेच तो माग्देलना खोरे टाळून काऊका खोऱ्याकडे वळला. हे खोरे समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट म्हणजेच १८२९ मीटर उंचीवर होते. त्या खोऱ्यात शिरताच त्याला रमणीय देखावा दिसला निरनिराळ्या प्रकारचे मनोहर निवडुंग, बांबू व अनेक प्रकारचे वृक्ष यांनी त्या खोऱ्यात दाटी केली होती. बेनाल्कझारने येथे वस्ती केली. स्पॅनिशांनी तेथल्या भटक्या टोळ्यांना छळल्यामुळे लवकरच त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली पुढे सन १५३६ मध्ये पोपायान या शहराची बेनाल्कझारने स्थापना केली. आता या प्रदेशाला हेच नाव पडले आहे त्या खोऱ्यातून तो आणखी खाली निघाला तेव्हा त्याला

जास्त कसदार जमीन सापडली. मात्र दोन्ही बाजूला १६ हजार फूट म्हणजे ४८७६ मीटर उंचीची बर्फाच्छादित पर्वतशिखरे होती. त्याने १५३७ मध्ये काली येथे आणखी एक शहर स्थापन केले त्याच्या कानी बातमी आली की उत्तरेकडे स्थिर राज्य असलेला एक राजा आहे आणि त्याच्याजवळ भरपूर सोने आहे. त्याने आपले ठाणे मागे ठेवले आणि या सोन्याच्या शोधात तो निघाला त्याने आता पिझारोकडची आपली निष्ठा सोडून द्यायचे ठरविले होते त्याच वेळी त्याला अटक करण्याच्या आज्ञा पिझारोने दिल्या होत्या, हे त्याला माहीत नव्हते अल्दानोला पिझारोने क्विटो या शहराकडे शांतता व सुव्यवस्था करायला पाठविले होते तो बेनाल्कझारच्या पाठलागावर निघाला त्यावेळी काली आणि पोपायान येथे दुष्काळ पडला होता त्याने या सुपीक जमिनीत मका लावला. त्यामुळे दुष्काळ दूर झाला व तेथील जनतेचे त्याने प्रेम संपादन केले

एके दिवशी अल्डानो काली येथे असताना त्याच्या सैनिकाना दाढी वाढलेले व वल्कले नेसलेले लोक भेटले पण ते स्पॅनिश बोलू लागल्यावर त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही कार्टेजैना येथून एका वर्षापूर्वी ३४५ स्पॅनिशांची एक टोळी पूर्व किनाऱ्याहून निघाली होती त्या टोळातील शिल्लक राहिलेले हे लोक होते. हे लोक ज्या प्रदेशातून अँडीज पर्वतावर पोहोचले त्या प्रदेशाचा म्हणजे न्यू ग्रॅनाडाचा नकाशा त्यांच्या माहिती-नुसार दुरुस्त करण्यात आला या न्यू ग्रॅनाडालाच पुढे 'कोलंबिया' असे नाव पडले.

दक्षिण अमेरिकेच्या उत्तर-पश्चिम कोपऱ्याचा भूगोल अनेक रहस्ये उलगडून दाखवणार होता. मग्दलेना नदीचे खोरे कौका

खोऱ्याला समांतर जात होते या दोन्ही नद्या अतिशय घनदाट अरण्यातून जात होत्या. एक मीटर अंतर चालण्यासाठीसुद्धा झाडे तोडावी लागत होती शिवाय अंडेन्स पर्वताचे सहा फाटे तेथून निघत होते ते जवळजवळ समांतर होते. पश्चिमेकडचा फाटा पनामा द्वीपकल्पात घुसला होता तर पूर्वेचा फाटा व्हेनुझुएलाच्या पर्ल कोस्टपर्यंत पोहोचला होता. या सहा फाट्यामधली खोरी समुद्रसपाटीपासून २००–३०० मीटरच उंच होती. पण दोन खोऱ्यातील शिखरे मात्र ३००० मीटर उंच होती. या खोऱ्यात शांतता प्रस्थापित करताना सन १५४० मध्ये कालीच्या उत्तरेस अन्झेमा व कार्टगो ही दोन शहरे वसवण्यात आली कार्टगो हे शहर कौका नदी ज्या ठिकाणी खोऱ्यात शिरते तेथे वसवण्यात आले होते.

□

प्रकरण सहावे

# स्पॅनिशांच्या मुख्य वसाहती

आता पुन्हा पूर्वेकडे वळूया ज्या वेळी पेरु, रिओ-द-प्लाटा वगैरे भागात स्पॅनिशांचे सशोधन व आक्रमण चालू होते त्याचवेळी म्हणजे १५२० ते ४० च्या दरम्यान कॅरेबियन समुद्रात व पर्ल कोस्ट किंवा स्पॅनिश मेन येथेही सशोधन व वसाहती करणे चालू होते. ज्यावेळी खूप अतर्भागातील लिमा शहर उदयाला येत होते व वाढू लागले होते त्यावेळी पोर्टोरिको जवळची बेटे दुर्लक्षितच राहिली होती. १५२८ पर्यंत या बेटातून नरभक्षकाचीच वस्ती होती! १५२८ मध्ये सुद्धा डोमिनिका बेटातील नरभक्षक टोळ्या लाकडी होड्यात बसून पोर्टोरिकोच्या जवळ आल्या आणि त्यानी काही चविष्ट गोरे लोक उचलून नेले। त्रिनिदाद बेटावर तर १५९० पर्यंत स्थानिक आदिवासींचेच राज्य होते पण या बेटापासून पश्चिमेकडे मुख्य भूमीच्या किनाऱ्याजवळच्या ओसाड बेटावरही वस्ती झाली होती. कारण तेथे मोती सापडत असत जर वस्तूविनिमय कमी पडला तर स्पॅनिश विजेते बहामामधून आणलेल्या गुलामांना बुड्या मारायला लावून मोती मिळवत. व त्यावर आपले काम भागवत पण पुढे मोत्याचा साठा कमी व्हायला लागला. मग मुख्य भूमीवरील

आपसात वैर करणाऱ्या टोळ्या आपले युद्धकैदी गुलाम म्हणून स्वस्तात विकायला तयार असतच. मग हा गुलामांचा व्यापार जोरात सुरू झाला पकडलेले गुलाम नरभक्षक किंवा विश्वास-घातकी होते असे म्हटले की या गुलामांच्या व्यापाराला नैतिक आधारही मिळत असे.


[illegible] तेथील किनाऱ्यावर स्पॅनिश विजयाच्या मोहिमेतील प्रशसा करता येईल अशी घटना घडली फ्रॅन्सिस्कन धर्मोपदेशकानी येथे सन १५१३ मध्ये एक मठ स्थापन केला होता जवळपासच्या ताम्रवर्णीयाशी त्यानी मैत्रीचे सबध जोडले होते पण गुलाम पकडणाऱ्या स्पॅनिशाविरुद्ध ताम्रवर्णीयानी जे बड १५१९ मध्ये उभारले त्यात या बिचाऱ्या फ्रॅन्सिस्कन धर्मोपदेशकाचीही आहुती पडली सान्टो डामिंगो येथून ताम्रवर्णीयाचा पाठलाग करण्यासाठी सैनिक पाठविले होते त्याच सुमारास तेथे लास कासास हा मिशनरी तेथे पोचला होता ताम्रवर्णीयाना दयाळूपणे वागवावे व या प्रदेशात शेती करून वसाहत करावी असे त्याला वाटत होते. त्याचे अनुयायी धाडसी विजेते नसून साधे शेतकरी होते पण ताम्रवर्णीयाची ससेहोलपट सुरू झाल्यानतर शेतकऱ्यालाही शस्त्र धारण केल्यावाचून आपले सरक्षण करता येणे शक्य नव्हते लास कासास तेथील किनाऱ्यावर उतरला पण ताम्रवर्णीयानी पुन्ह एक बड केले व लास कासासला काही काळ पळून जावे लागले त्याचो ताम्रवर्णीयाशी वागण्याची पद्धत व वसाहती करण्याचे धोरण आदर्श होते लास कासासने स्पॅनिश विजेत्यांच्या क्रूरतेचे वर्णन आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. या पर्ल किनाऱ्यावरील पहिले कायमचे गाव कुमाना १५२२ साली पुन. वसवण्यात आले. कुमानापासून पनामाच्या सयोग

भूमीपर्यंतची २०९२ मीटरची किनारपट्टी अरुंद आहे व पलीकडेच उंच पर्वतश्रेणी पसरली आहे किनारपट्टीचा काही प्रदेश रुक्ष व कोरडा आहे तर काही ठिकाणी घनदाट जंगल आहे या किनार-पट्टीवर ताम्रवर्णीयाची वस्ती फारशी दाट नव्हती व त्याच्या जमातीमध्ये आपसात खूपच वैर होते. स्पॅनिशानी एखाद्या जमातीला जिंकले तर ३० किलोमीटरवरच्या दुसऱ्या जमातीला त्याचे काहीच सोयर सुतक वाटत नसे स्पॅनिश विजेते तेथे शेती करण्यासाठी आले नव्हते त्याना शेतात घाम गाळायचा नव्हता, आरामात उपभोग घ्यायचा होता त्यामुळे शेतीचे कष्ट करण्या-साठी जेथे ताम्रवर्णीय भरपूर प्रमाणात मिळाले तेथेच वसाहती झाल्या पण १५०९ नंतर ओजेडा आणि पेड्रारियास वगैरे सेना-पतीनी या भागात क्रूरपणे जो नगा नाच घातला त्यामुळे स्थानिक ताम्रवर्णीय मजूर म्हणून मिळेनासे झाले

या पर्ल किनाऱ्यावर माराकैबू हे वैशिष्ठ्यपूर्ण सरोवर आहे. या सरोवराचे मुख कॅरेबियन समुद्राशी पाच किलोमीटर रुदीचे आहे. पण अतर्भागात तो विस्तार पावून ते एक भूमीवेष्ठित समुद्रच बनले आहे. या प्रदेशाच्या पश्चिम बाजूला लाबलाब पसर-लेला दलदलीचा प्रदेश आहे. तेथील मोतीलोनेस जमातीचे ताम्र-वर्णीय या दलदलीत खाब उभारून दलदलीच्यावर येणाऱ्या झोपड्या उभारीत असत आणि जायला यायला होड्या वापरीत असत ते पाहूनच या प्रदेशाचे नाव ‘छोटे व्हेनिस’ किंवा स्पॅनिशमध्ये ‘व्हेनुझुएला’ असे ठेवले या दलदलीच्या प्रदेशात काही सापडण्यासारखे नव्हते व तेथील ताम्रवर्णीयातही काहीच आकर्षण नव्हते म्हणून या दलदलीच्या प्रदेशाला पश्चिमात्यांचा

स्पर्श १९६० पर्यंतही झाला नाही. तोपर्यंत तेथील ताम्रवर्णीय आपले पूर्वीचेच टोळीवाल्यांचे जीवन जगत होते.

१५२० पर्यंत पर्ल किनारपट्टीची फक्त माहिती झाली होती. अंतर्भाग अज्ञातच होता स्पॅनिश राजवटीने या किनाऱ्याचे दोन विभाग पाडले. पहिल्या विभागाचे ठाणे कार्टेजेना येथे वसवले. व दुसऱ्या विभागाचे ठाणे सँटामार्टा येथे ठेवले. ही दोन शहरे आजही अस्तित्वात आहेत. या किनाऱ्यावरून पाच संशोधक दक्षिणेकडे घुसले होते. तरीही संपूर्ण किनारा स्पॅनिशांना व्यापता आला नाही गुलाम पकडणाऱ्या टोळ्यांनाच या किनाऱ्याची जास्त माहिती होती.




स्पॅनिश मेन आणि पर्ल किनारा

त्रिनिदाद बेटाभोवती ' पॅरियाचे आखात ' या नावाने ओळखला जाणारा एक पाण्याचा पट्टा आहे तो वर्षभर पिवळ्या चिखल-पाण्याने भरलेला असतो. सन १५३१ मध्ये दियागो-द-ओडाझ या स्पॅनिश विजेत्याची जहाजे ॲमेझॉन नदीजवळ बुडली. तेव्हा तो वाट काढत पॅरियाच्या आखाताजवळ आला. पिवळे पाणी आणणाऱ्या ओरिनोको नदीने त्याचे लक्ष वेधून घेतले तेथे त्याने नदीत फिरू शकेल अशी नाव बांधण्यात दोन महिने खर्च केले. मग २८० लोक बरोबर घेऊन तो त्या नदीतून वरच्या दिशेने निघाला. ओरिनोको नदीच्या सहा मुखांपैकी एका मुखातून आपण वर जात आहोत हे त्याला माहीत नव्हते. नदीतून वर गेल्यावर त्याला एक विशाल व सपाट मैदान दिसले. ३२० किलोमीटर्स वर गेल्यानंतर नदी पूर्वेकडे वळत होती दक्षिणेकडे ठेंगण्या टेकड्या दिसू लागल्या व नदीचे पात्र अरुंद होऊ लागले. या प्रवासात त्याला रोजच किनाऱ्यावरच्या ताम्रवर्णीयांशी लढाया कराव्या लागल्या त्याचे पुष्कळ सैनिक रोगराईमुळे व लढाईमुळे मेले त्याला काही ताम्राकडून घेवड्याच्या बिया, थोडे सोने, कातडी आणि हिरे मिळाले

त्याच्या कानावर बातमी आली की, नदीच्या उगमाकडे वस्त्रे नेसणारे लोक राहतात आणि त्यांच्याजवळ खूप सोने आहे अशा अफवा उठणे व सोन्याच्या लोभामुळे स्पॅनिश-विजेत्यांनी त्यावर विश्वास ठेवणे हे आता नित्याचेच झाले होते. या आमिषाला दिआगो-द ओडाझ बळी पडला नसता तर नवल होते त्याने आपला प्रवास तसाच पुढे चालू ठेवला मुखापासून हजार मैल किंवा १६०० कि. मी आल्यानंतर त्याना मेटा नावाची नदी ओरिनोको नदीला मिळालेली दिसली ताम्रवर्णीयाच्या अफवे-

प्रमाणे या नदीच्या किनाऱ्यावरच ती सुवर्णभूमी होती पण आता उन्हाळा लागला होता. आणि नदीचे पाणी कमी झाले होते त्यामुळे त्याना नाव पुढे हाकारता येईना मग ओडझिने किनाऱ्यावर उतरायचे ठरविले आणि जमिनीवरूनच त्या मेटा नदीकिनारी असलेल्या सुवर्णभूमीकडे जायचे ठरविले.


पण ओडझिच्या अधिकाऱ्यात यादवी माजून त्याचे सर्व अधिकार अलोन्सो-द- हेरेरे याने घेतले. त्याने मेटा नदीत नाव घातली व उथळ पाण्यात खाली उतरून आपल्या सैनिकांना नाव ओढायला लावली स्थानिक ताम्रवर्णीयांनी त्याच्यावर हल्ला केला तेव्हा विष माखलेले बाण लागून हेरेरा व अनेक स्पॅनिश सैनिक मृत्यू पावले मोहिमेतील उरलेले सैनिक परत फिरले पुढची शंभर वर्षे या प्रदेशात कोणत्याच पाश्चात्याने पाऊल ठेवले नाही. सतराव्या शतकात ज्यावेळी मिशनऱ्यांनी आपले भूतदयेचे कार्य सुरू केले त्यावेळीच ओरिनोको व तिच्या उपनद्या याबाबत सपूर्ण भौगोलिक माहिती मिळाली.

आता स्पेनहून आपले नशीब काढायला येणाऱ्या धाडसी लोकाचा लोंढा वाढू लागला दुसरीकडे आधीच धाडसी लोक पोहोचले होते तेव्हा पर्ल किनाऱ्यावर या धाडसी वीराना नाईलाजाने वसाहती कराव्या लागल्या किनाऱ्याच्या पूर्व टोकाला त्रिनिदाद बेटाजवळ जमीन कोरडी, व झुडपाळ आहे व हवामान उष्ण आहे याच आसमंतात जेथे ओरिनाको नदी उत्तर किनाऱ्याजवळच्या पर्वतश्रेणीतून बाहेर पडते तेथे बार्सीलोनाची स्थापना १५३४ मध्ये करण्यात आली बार्सीलोना आणि मारीकैबू याच्या पश्चिमेकडे असणारा किनारा पर्लकोस्ट म्हणून प्रसिद्ध होता. तेथे किनाऱ्यालगत जी पर्वताची राग होती तेथील दक्षिण उतारा-

वर सुपीक जमीन व उत्तम हवामान होते फ्रेंच आरमारी जहाजाच्या भीतीमुळे व ताम्रवर्णीयावर विजय मिळविल्यामुळे स्पॅनिशानी अतर्भागात ४८७ मीटर उचीवर व्हॅलेन्सिया ही वसाहत स्थापन केली.

स्पॅनिशाची अशी पद्धत होती की परकीय देशाशी सर्व व्यापार स्पेनच्या व्यापारी बदरातूनच झाला पाहिजे त्यामुळे सर्व फायदा स्पेनमध्येच राहत असे ज्या ठिकाणी स्पेनचे लष्करी सामर्थ्य प्रभावी असे तेथेच फक्त इतर राष्ट्रे हा स्पेनचा नियम पाळत कॅरेबियन बेटात आणि स्पॅनिशमेन, किंवा पर्ल किनारा येथे फ्रेंच चाच्याचा सुळसुळाट होता आणि त्याचा बदोबस्त स्पेनला करता येत नसे या चाच्यापासून सुटका व्हावी म्हणून किनाऱ्यावरच्या पर्वताच्या एका खोऱ्यात ९१४ मीटर उचीवर स्पॅनिशांना एका सुरक्षित जागा सापडली. तेथे त्यानी आपले ठाणे स्थापन केले. या जागेला काराकास असे नाव पडले. हे शहर आज व्हेनुझुएला देशाची राजधानी आहे

स्पॅनिश मेनच्या या भागात स्थानिक ताम्रवर्णीयांची कसलीच आर्थिक संघटना अस्तित्वात नव्हती. शिवाय सुरुवातीला स्पॅनिशानी ताम्रवर्णीयावर फार जुलूम व अत्याचार केल्यामुळे त्याची सख्याही कमी झाली होती आणि ते सहकार्य करत नव्हते लवकरच स्पॅनिशाना पटले की, कष्टाची कामे करण्यासाठी गुलामाची जरूर आहे कायद्याने गुलामगिरीला बदी होती, तरीही इंग्रज व्यापारी आफ्रिकेच्या किनाऱ्यावर गुलाम पकडून चाळीस दिवसाच्या सागरी प्रवासानतर स्पॅनिश मेन येथे नेहमी येत असत स्पॅनिश लोक इग्रज व्यापाऱ्याचे स्वागत करत व भरभक्कम किमत देऊन गुलामाची खरेदीही करत.



इग्रजाची जहाजे व्हेनुझुअेलात निग्रो गुलाम आणू लागली

अमेरिकेत खूप संपत्ती मिळाली असली तरी स्पॅनिश राज्यकर्त्यांचा खर्च खूपच होत असे. स्पेनच्या राजाने जर्मनीतील वेस्लर या प्रसिद्ध सावकारी पेढीकडून मोठे कर्ज घेतले होते. त्या कर्जाची परतफड करण्यासाठी व्हेनुझुअेलाच्या आसपासचा बराचसा प्रदेश स्पेनच्या राजाने या जर्मन सावकाराला सन १५२९ मध्ये दिला. अर्थात हा व्यवहार कागदोपत्रीच होता ! कारण जर्मन सावकाराने तेथे जाऊन प्रत्यक्ष ताबा घेतला नव्हता. कठोर व्यापारी दृष्टिकोनामुळे स्थानिक ताम्रवर्णीयांचा जसा छळ होई त्याचप्रमाणे मोहीम घेऊन जाणाऱ्या स्पॅनिशांचाही होत असे

मोहिमेचा खर्च केल्यास त्यावर चांगले व्याज सुटावे अशी कर्ज देणाऱ्या सावकाराची इच्छा असे अल्फिंगर याने अशीच एक मोहीम काढली. त्याने तीनशे स्पॅनिश सैनिक एकत्र केले. खर्चासाठी उभ्या केलेल्या भांडवलावर त्याने चांगले व्याज द्यावे अशी अपेक्षा होती अल्फिंगरने यापूर्वी एकही संशोधन मोहीम काढली नव्हती मराकैब्रूच्या आखातात तो कोरो येथे उतरला तेथे हवा उष्ण होती व वारा अजिबात नव्हता त्याने एक वर्ष-पर्यंत या आखातात संशोधन केले आणि एका ठिकाणी एक ठाणे बांधले आता त्याच्या जवळचे पैसे संपले होते म्हणून त्याने काही गुलाम पकडून जहाजात घातले आणि तो सॅन्टो डॉमिंगो येथे गेला तेथे गुलाम विकून त्याने पैसे जमा केले व त्यातून अन्न सामुग्री व रसद विकत घेतली. ताजातवाना होऊन तो मराकैब्रूच्या आखातात परतला तेथे किनाऱ्यावर उतरून तो पश्चिमेकडे गेला; तेथे त्याला सिअेरा-द-पेरीजा हे मैदान लागले. ताम्र-वर्णीयांनी त्याच्या जथ्थ्यावर सतत हल्ले केले. त्यांनी ते मैदान ओलांडले, तेव्हा त्याना एक नदी आडवी आली त्या नदीचे नाव त्याने रिओ सिझर असे ठेवले ती नदी मॅक्डेलना नदीला जाऊन मिळत होती त्या संगमापर्यंत अल्फिंगर गेला. तेथे पोचल्यावर तो खूप थकला होता म्हणून त्याने आपल्या एका अधिकाऱ्याला कोरो ठाण्याकडे रसद आणायला पाठविले. अल्फिंगरने आतापर्यंत सहाशे पौंड म्हणजेच २७२ किलोग्रॅम सोने गोळा केले होते ते त्याने या अधिकाऱ्याजवळ सुरक्षित नेण्यासाठी दिले त्याची टोळी ज्या मार्गाने आली होती, त्या रस्त्याने त्याला परतायची भीती वाटू लागली कारण त्या ताम्रवर्णीयाना लुटूनच त्याने सोने जमा केले होते ! मागच्या अत्याचारांचा ते सूड उगवतील असे त्याला

वाटले होते म्हणून त्याने परतीचा निराळाच रस्ता धरला. तं जगलात आणि दलदलीत रस्ता चुकले आणि निराश होऊन त्याने आपले सोने एका ठिकाणी पुरून ठेवले. ते सोने नतर कधीच सापडले नाही ! त्याच्यापैकी काही जण रोगराईने मृत्यू पावले काही लोकाना नरभक्षक ताम्रवर्णीयानी खाऊन टाकले ! आणि काही जण गुलाम म्हणून विकले गेले ! शेवटी एकच मनुष्य वाचला ! तो वैद्य होता त्यामुळे ताम्रवर्णीयांना त्याचा चांगलाच उपयोग होत होता. त्या नशीबवान माणसाचे नाव फ्रान्सिस्को मार्टिन त्याने एका ताम्रवर्णीय स्त्रीशी लग्न केले आणि तो त्या आदिवासींतच राहू लागला

इकडे अल्फिगर मॅक्डेलना व सिझर नदीच्या जवळ वाट पाहतच थाबला होता मधूनमधून काही लोकाना संशोधना-साठी तो आसपास पाठवत असे. त्यातील एक जथा पूर्वेकडच्या मैदानात गेला होता. त्याने बातमी आणली की तेथून दक्षिणेकडे सुपीक जमिनीची व उत्तम हवामानाची खोरी आहेत. ते पुन्हा त्या दिशेला गेले व ३ अश दक्षिण अक्षांश।पर्यंत पोचले. तो सुपीक प्रदेश काही किलोमीटर अतरावर राहिला असताना ताम्रवर्णीयांशी उडालेल्या चकमकीत अल्फिगर मारला गेला. खूप दिवसानी त्याच्या तीनशे लोकांच्या टोळीतील काही लोक कोरो येथे सुखरूप पोचले पण त्याना तेथे सुखरूप पोचवण्याची जबाबदारी आदिवासींत राहिलेला वैद्य फ्रॉन्सिस्को मार्टिन याने घेतली म्हणूनच शक्य झाले

जॉर्ज होहेमुट याने अल्फिगरचा वारसा पुढे चालविला. त्याने मारिकैबू आखाताचा किनारा सोडला आणि तो थेट दक्षिणेकडे निघाला तो विषुववृत्ताच्या दक्षिणेस आठ अश दक्षिण

अक्षांशाजवळ पोचला तेथे त्याला उंच व कायम बर्फाच्छादित असलेली शिखरे दिसली. तेथून खाली आणखी दक्षिणेकडे त्याला प्रचंड सपाट मैदाने दिसली ओरिनोको नदीचा उगम येथेच होत असला पाहिजे असा साधार तर्क त्याने केला पुन्हा एकदा मेटा नदीच्या काठी खूप सोने असल्याची बातमी त्याच्या कानांवर आली. तेथे खरोखरच सोने व संपत्ती होती पण नदी खूपच लांब होती व तिचा उगम सापडेना. पश्चिमेच्या किनाऱ्याजवळ फार उंच पर्वतराजी होती. त्या सगळ्या प्रवासामुळे तो खूपच त्रासून गेला संपत्तीच्या त्या ठिकाणाच्या तो अगदी जवळ पोचला होता थोड्याशा प्रयत्नाने ती संपत्ती त्याला मिळाली असती पण आजवरच्या प्रवासाने वैतागून त्याने परतायचा निर्णय घेतला ती संपत्ती त्याच्या भाग्यात नव्हती हे खरे !

ते सर्व कोरो येथे परतले आता होहेमूटचा दुय्यम अधिकारी फेडेरमान पुन्हा एकदा आपले नशीब अजमावयाला निघाला. तो मेटा नदीतून वर गेला आणि अल्पाईन कुरणातून पुढे जाऊ लागला. तेथील थंडीमुळे त्याच्या बरोबरचे ताम्रवर्णीय माश्यांसारखे मेले ! शेवटी तो बोगोटाच्या पठारावर पोचला. हा प्रदेश चिबचास जमातीच्या श्रीमंत ताम्रवर्णीयांचा होता त्याच्या टोळीतील पाचशे लोकांपैकी १/३ लोक जिवंत राहिले होते. आणि त्याच्या या प्रवासाला तीन वर्षं लागली होती. पण त्याच्या आधी दुसराच एकजण तेथे पोचला होता. गोन्झालो जिमेनेझ-द-क्वेसेडा याला एक चांगला रस्ता सापडला होता व तेथे तो फेडेरमानच्या आधीच पोचला होता. त्याचा वृत्तान्त लवकरच सांगू.

जर्मन लोकांच्या व्हेनुझुएलातील हालचालींमुळे स्पेनचा राजा

अस्वस्थ झाला. आणि त्याने जर्मनाशी केलेला करार १५५० मध्ये रद्द केला त्याकाळी जर्मन लोक हे सर्वांत जास्त हुषार व कसलेले संशोधक होते ते जेथे गेले तेथे त्यांनी त्या प्रदेशाची खूप तपशिलवार वर्णने लिहून ठेवली.

आणखी एक असाच जर्मन संशोधक व्हॉन हुटेन कोरो येथून निघाला आणि व्हेनुझुएलातील इलानॉस या मध्यवर्ती मैदानाकडे निघाला हे मध्यवर्ती मैदान पूर्णपणे गवताळ होते व १६० किलोमीटर लांब व ३२० किलोमीटर रुंद होते या सर्व मैदानात दरवर्षी पुराचे पाणी भरून राही त्यावेळी मधला काही थोडासाच भाग कोरडा राहत असे.

ओरिनोको नदीच्या पलीकडे आणखी दक्षिणेला गियानाचे पठार आहे या पठारावर अटलांटिक महासागराच्या बाजूने स्पॅनिश विजेते नियमितपणे येऊ जाऊ लागले होते. तेथे त्याना सोनेही सापडत असे. त्या वेळी स्पॅनिश सैनिकाची ताम्रवर्णीयाशी वागण्याची पद्धत कशी होती हे धर्मोपदेशक कॅस्टोलिनोने लिहून ठेवले आहे ऑगस्टाईन डेलगाडो या स्पॅनिश विजेत्याची हकीकत नमूद करण्यासारखी आहे कॅस्टोलिनो लिहितो– ‘त्याला एक ताम्रवर्णीय प्रमुख भेटला. त्याने त्याचे चांगले स्वागत केले. व सोन्याच्या व इतर भेटी दिल्या. परीसारख्या तीन सुदर तरुणीही दिल्या या स्वागताची परतफेड म्हणून की काय या कॅप्टनने जितके सोने गोळा करता येईल तितके नेले आणि शेवटी आपल्या ताम्रवर्णीय यजमानालाही कैद करून चालविले ’

पण चोरावर मोर असतोच ! इंग्लिश चाच्यानी संपत्ती मिळविण्याचा फार सोपा उपाय शोधून काढला ! स्पॅनिश विजेते अन्तर्भागात साहसी मोहीमा काढून सोने वगैरे घेऊन किनाऱ्या-

वरच्या बंदरात पोचले की इंग्रज चाचे त्यांच्यावर झडप घालत व सोने लुटत । पुढे १८ व्या शतकात स्पॅनिश मेन येथून वेस्ट इंडीजच्या ब्रिटिश शासनाखाली असलेल्या भागात स्मगलिंग–चोरट्या आयातीचा व्यापार चांगलाच भरभराटीला आला. १८१० मध्ये नेपोलियनने ज्यावेळी स्पेनचा ताबा घेतला तेव्हा व्हेनुझुएला येथील स्पॅनिश राजवटी विरुद्ध उठाव झाला तोवर या प्रदेशात स्पॅनिशांचेच अधिराज्य चालू होते

## न्यू ग्रेनाडा– कोलंबिया

दक्षिण अमेरिकेच्या संशोधनाची कथा सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आपण आणलेली आहे या कालावधीतील एकाच प्रदेशाच्या संशोधनाची गोष्ट सांगायची बाकी राहिली आहे ज्यावेळी स्पॅनिश विजेते क्विटो येथून निघून पोपायान नदीच्या खोऱ्यात पोचले होते त्याच सुमारास स्पॅनिश विजेत्यापैकी एक धाडसी वीर कॅरेबियन बेटापासून निघून दक्षिण अमेरिकेच्या अन्तर्भागात चालला होता त्या प्रदेशाकडेच मागे वर्णन केलेला जर्मन संशोधन फेडेरमान निघाला होता पण फेडेरमान तेथे उशीरा पोचला

सन १५३६ मध्ये उत्तर किनाऱ्यावरच्या सान्टा मार्टा येथे बातमी पोचली होती की, 'अन्तर्भागात अफाट संपत्ती व सोने आहे ' त्यावेळी स्पॅनिशानी एक मोठी सैनिक तुकडी तिकडे पाठवायचे ठरविले मॅग्डेलना नदीतून रसद घेऊन बोटी पुढे गेल्या आणि सिझर नदी मॅग्डेलना नदीच्या संगमावर जाऊन थांबल्या गोंझालो जिमेनेझ-द-केसेडा-खुष्कीच्या मार्गाने निघाला. आणि संगमाजवळ पोचला त्याला हा प्रवास सुरुवातीला ओसाड

रुक्ष व निपाणी प्रदेशातून आणि नंतर जंगलातून करावा लागला. प्रवासात अनेक लोक मेले. ते जेव्हा संगमाजवळ पोचले. तेव्हा तेथे रसदीच्या बोटी त्याना दिसल्या नाहीत. त्या बोटी प्रचंड वादळ झाल्यामुळे नदीच्या मुखाकडे भरकटत गेल्या होत्या रसद घेऊन पुन्हा नव्या बोटी आल्या पण तोपर्यंत जथ्यातील आणखी बरेचजण खतम झाले होते! आजारी माणसाना रसदीच्या बोटीतून परत पाठविण्यात आले व त्याची मोहीम पुढे चालू झाली जथ्यातील काही लोक हातात कुऱ्हाडी व भाले घेऊन जंगलातून रस्ता काढत व साफ करत मग बाकीचे लोक त्याच्या मागोमाग जात काही लोक उपासमारीने मेले, काहीना साप चावले तर काही सुसरीच्या भक्षस्थानी पडले. ताम्रवर्णीयाच्या विष माखलेल्या बाणामुळे मरण्याचे भाग्य काही जणांना लाभले! अशा तऱ्हेने आठ महिने प्रवास करून ते एका ओसाड पडलेल्या ताम्रवर्णीयाच्या खेड्यात पोचले तेथे मक्याची शेतेही होती

काही लोकाना पाहणी करण्यासाठी पुढे पाठविले. वीस दिवसाचा प्रवास करून परतावे अशा त्याना आज्ञा होत्या ते परतले व त्यांनी काहीच आशादायक बातमी आणली नाही

पण जेमेनेझ्-द- क्वेसेडा याने पूर्वेकडच्या पठारावरून येणारी एक उप-नदी शोधली त्या उपनदीच्या वरच्या भागाकडे जायचे त्याने ठरविले या निर्णयाने त्याचे नशीब उघडलें बिनीची पथके आशादायक बातम्या घेऊन परतली लाकडाच्या होड्यात त्यांना आदिवासींची विणलेली वस्त्रे सापडत होती व जमीनही सुपीक होती त्या उपनदीतून होडी चालवणे अशक्य झाल्यावर क्वेसेडा जमीनीवरून जाऊ लागला. जे आजारी होते त्याना त्याने परत

पाठवले. पण ते परतीच्या वाटेवर झालेल्या चकमकीत मारले गेले नदीकिनाऱ्याने व जगलातून रस्ता काढता काढता त्याला तीन महिने लागले. तो जेव्हा पठारावर पोचला तेव्हा मोहिमेतील सुरुवातीच्या नऊशे लोकांपैकी १६२ लोकच शिल्लक राहिले होते।

जिमेनेझ-द-क्वेसेडा आता चीबचा ताम्रवर्णीयाच्या प्रदेशात पोचला होता. या अलग पडलेल्या ताम्रवर्णीयाच्या सस्कृतीचा जो काही विकास झाला तो निसर्गाच्या कृपेमुळेच। तेथे निसर्ग अत्यत उदार होता चीबचा ताम्रवर्णीयाचे हे उच पठार तिन्ही बाजूने पर्वतानी वेढले होते व उत्तरेकडे उतरते होते त्या उतारा-कडेच ओपा नदी वाहत होती याच नदीच्या किनाऱ्याने क्वेसेडा पठार चढून आला होता ह्या पठारावर सोने, पाचू आणि मीठ भरपूर प्रमाणात सापडत असे जमीन सुपीक होती. चीबचा जमातीचे लोक युरोपियनाना माहीत नसलेला एक विचित्र कद पिकवत असत आज जगभर प्रसार झालेला 'बटाटा' हा कद १५३६-३७ सनापर्यंत तरी फक्त चिबचा ताम्रवर्णीयाना माहीत होता। येथूनच तो जगभर पसरला


चिबचा ताम्रवर्णीय अनेक बाबतीत अत्यत मागासलेले होते त्याना गुरे पाळून त्यांच्याकडून श्रम करून घ्यायचे किंवा दूध घ्यायचे माहिती नव्हते। कारण तेथे गुरे नव्हतीच। पण काही बाबतीत त्याची खूपच प्रगती झाली होती. ते तलम कापड विणत असत उत्तम घरे बाधत असत! व गालिचे विणत असत व वापरत असत आसपासच्या भटक्या व क्रूर टोळ्यांचा त्यांना नेहमी उपद्रव होत असे विशेषत पाचेस जमातीच्या नरभक्ष-कांचा फारच त्रास असे. चिबचा जमातीचे दोन राजे किंवा टोळीप्रमुख बोगोटा व तुजा येथे राहत असत तेथील हवामान

थंड व बटाट्याना मानवणारे होते. अतिशय उष्ण प्रदेशातून आलेल्या क्वेसेडाला तर ते फारच थंड वाटले

स्पॅनिश लोकाना हा सर्व प्रदेश सहज जिंकता आला त्याना विरोध असा झालाच नाही खरे म्हणजे स्पॅनिश लोक तेथे पोचले तेव्हा इतके थकलेले व दमलेले होते की चिबचा ताम्रवर्णीयांनी थोडा जरी विरोध केला असता तरी १६२ लोकाची चटणी उडायला वेळ लागला नसता !

चिबचा ताम्रवर्णीयाना मांजरासारखे लहान प्राणी फक्त माहीत होते घोडा व त्यावरचा स्वार पाहूनच ते गर्भगळित झाले ! स्पॅनिशाचा हा विजय त्याना एखाद्या स्वप्नासारखा वाटला. ताम्राना नरभक्षकांच्या हल्ल्याची सवय होती आपल्याला वाचवावे म्हणून अनेकदा त्यानी आपली बालके स्पॅनिशाना देऊ केली. परिकथेत सिंहाला दररोज एक जनावर भक्ष्य म्हणून पाठवण्याचे इतर जनावरे ठरवतात अशी गोष्ट तुम्ही ऐकली असेल. बाकीचे वाचावे म्हणून एक पुरुष व एक स्त्री यांना पाठीला पाठ लावून बांधून ठेवलेले व टोपलीत दोन तीन बालके घालून ठेवलेली स्पॅनिशाना आढळली रुचकर अन्न म्हणून याना वापरावे व बाकीच्याना नरभक्षकानी जीवनदान द्यावे यासाठी त्याची अशी योजना असे !

अशा भित्र्या व शांत जमातीचा पुरा फायदा स्पॅनिशानी घेतला नसता तर नवल ! स्पॅनिशाना लवकरच आढळले की आपण कुठेही गेलो व कोणत्याही घरात घुसलो तरी आपल्याला विरोध कसा तो होतच नाही ! मग त्यांनी सर्व घरात घुसणे सुरू केले आणि काय आश्चर्य ? अनेक घरात सोन्याचे मोठे मोठे पत्रे भिंत झाकण्यासाठी वापरलेले त्याना आढळले !



चिबचा ताम्राची घरे व त्यांचे सोन्याचे पत्रें !

स्पॅनिशाना अमाप लूट मिळाली. त्यातच स्पॅनिशानी चिबचा याचे नरभक्षक शत्रू पाचेस ताम्रवर्णीयावर प्रखर हल्ला. केला व त्याना पळवून लावले. त्यामुळे चिबचा ताम्रवर्णीय स्पॅनिशावर खूष होऊन त्याच्या आज्ञेत राहू लागले एखाद्या स्वप्नात किंवा परिकथेत घडावे तशा या घटना होत्या

ताम्रवर्णीयाच्या स्त्रिया स्पॅनिशानी पळविल्या त्या स्त्रियानी स्पॅनिशाना अशी काही औषधे दिली की त्यामुळे ते स्पॅनिश प्रेमवीर काही काळ ठार वेडे व्हायचे ! नरबळी देण्यापूर्वी अशी

औषधे त्या बळीला देण्यात येत असत हे त्या स्पॅनिश प्रेमवीराना माहीत नव्हते आसपास सोनेही बरेच सापडत असे स्पॅनिशाच्या डोळ्यासमोर अगदी थोड्याशा प्रयत्नाने ताम्रवर्णीयानी पाचू खणून काढून दाखविले

पाच महिन्यानतर क्वेसेडाने तुजा येथील राजाला पकडायचे ठरविले त्याच्याजवळचा खजिना अजून मिळाला नव्हता. सुरुवातीला उडालेल्या धामधुमीत तो खजिना केव्हाच लुटला गेला होता ! किंवा कोठे तरी लपविला गेला होता ! राजाला पकडून तो खजिना कोठे आहे हे त्याने सागावे म्हणून क्वेसेडाने त्याचे हाल सुरू केले. त्यात तो बिचारा मेला ! पण खजिना काही मिळाला नाही क्वेसेडाने पुष्कळ सपत्ती गोळा केली होती तरीही बराचसा खजिना कोठे तरी लपवला गेला होता



जिमेनेझ-द-क्वेसेडा

१५३९ पर्यंत जिमेनेझ-द-क्वेसेडा याने या पठारावर आपला अधिकार प्रस्थापित केला क्वेसेडा आता किनाऱ्याकडे परतायच्या बेतात होता इतक्यात पूर्वेकडचे पठार चढून १६० स्पॅनिशाचा एक जथा तेथे पोचला हा फेडेरमानचा जथा होता त्यानतर काही दिवसानी दक्षिणेकडून दमला-भागलेला बेनेल्कझारही येऊन पोचला आपल्या लुटीला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी क्वेसेडाला मदतनीस हवेच होते. त्याने फेडेरमानच्या लोकांना

अन्न दिले, कापड पुरवले आणि फेडेरमानला उची भेटी दिल्या क्वेसेडाने बेनाल्कझार व फेडेरमान याच्या टोळचा आपल्या जथ्यात सामील करून घेतल्या बेनास्कझारने बरोबर डुकरे आणली होती पठारावरच्या कोवळ्या लुसलुशीत गवतावर ती चांगलीच पोसली व लठ्ठ झाली. सर्वांचीच मग चगळ उडाली. इतर स्पॅनिश विजेत्यांच्या मानाने क्वेसेडा फारच दयाळू म्हटला पाहिजे. आता तो आणि इतर तुकड्यांचे दोन नेते किनाऱ्याकडे निघाले परतीचा प्रवास त्याने कार्टेजेना नदीतून केला इकडे येण्यासाठी ज्या पायी प्रवासाला त्याना अकरा महिने लागले होते तोच प्रवास बोटीतून केल्यामुळे फक्त चौदा दिवसात संपला !

या नव्या प्रदेशाचे नाव त्यांनी 'न्यू ग्रॅनाडा' असे ठेवले. जिमेनेझ-द-क्वेसेडा या नव्या प्रदेशाचा प्रशासक बनला. बोगोटा येथे राजधानी बाधण्यात आली क्वेसेडा पुढे ऐंशी वर्षांचे वय होईपर्यंत जगला हाही एक विक्रमच होता ! कारण दक्षिण अमेरिकेतील हे स्पॅनिश विजेते वैरी बरेच असल्याने ऐन उमेदीत असतानाच कोणाकडून तरी मारले जायचे !

## बोलिव्हिया

१५३८ पर्यंत फ्रॅन्सिस्को पिझारोने आपले राज्य चाराकास प्रदेशापर्यंत वाढविले होते पण या नव्या प्रदेशामुळे त्याचा काहीच फायदा झाला नाही या प्रदेशातील आयमारा ताम्रवर्णीयावर इन्का राज्याने पूर्वीच विजय मिळविला होता त्यावेळेस त्या इन्कानी या प्रदेशातील सोने वगैरे नेले असावे. १५४५ पर्यंत नवीन नवीन स्पॅनिश विजेते इकडे येऊ लागले होते आणि अधिकृत स्पॅनिश अधिकाऱ्याना त्याचा उपद्रवच होऊ लागला

होता स्पॅनिश राज्यकर्त्यांशी बिनसल्यामुळे गोंझालो-पिझारोला पकडण्यासाठी स्पेनचे अधिकारी प्रयत्न करीत होते. या वेळी म्हणजे १५४५ मध्ये एका शोधामुळे सर्वच घटनाक्रम बदलला !



पोटोसी येथे चांदीचा डोंगरच सापडला !

चाराकासच्या दक्षिणेकडे कुझकोपासून १६०० किलोमीटर अंतरावर 'अल्टिप्लेनो' या नावाचे उंच पठार आहे. तेथे पोटोसी या खेड्याजवळ शंकूच्या आकाराची एक मोठी टेंकडी होती या टेंकडीवर एक ताम्रवर्णीय मजेत गवत उपटत बसला होता गवत उपटता उपटता एकदा त्याने त्या गवतांच्या मुळाकडे पाहिले त्या गवताच्या मुळाना चमकदार पांढरे कण चिकटून वर आले होते गवतांच्या मुळयाना चिकटलेले हे कण शुद्ध चांदीचे होते ! त्या ताम्रवर्णीयांचे नाव इतिहासाला अज्ञात आहे, पण तोपर्यंतच्या

इतिहासातील सर्वांत मोठी चांदीची खाण त्याने शोधली होती पोटोसी येथील पर्वतांची उंची १३ हजार फूट म्हणजेच ३९६२ मीटर आहे या उंचीवरही १०० वर्षांच्या काळातच पोटोसीजवळ दीड लाख लोकांचे शहर तयार झाले नव्या जगातील त्या वेळचे हे सर्वांत मोठे शहर होते या शोधामुळे गोंझालो-पिझारोची बाजू भक्कम झाली आपल्याकडील आणि स्पेनच्या राजातील दुरावा नष्ट व्हावा म्हणून सापडलेल्या चांदीपैकी एक पंचमांश चांदी त्याने राजाला देऊ केली.

फ्रॅन्सिस्को पिझारो पेरु देशाचा राजाच बनला होता या सर्व कालावधीत पेरु देशामध्ये कायम अशांतता व गोंधळ होता. ताम्रवर्णीयावर जुलूम होत होतेच पण स्पॅनिशांच्याही आपसातल्या मारामाऱ्या कमी नव्हत्या ! आपला निकटचा मित्र अल्माग्रो याला पिझारोने ठार मारले होते अल्माग्रोच्या मुलाने आपल्या बापाच्या वधाचा सूड उगवावयाचा ठरविले आता फ्रॅन्सिस्को पिझारो मृत्यू पावला होता आणि त्याच्या जागेवर गोन्झालो पिझारो आला होता अल्माग्रोच्या मुलाने स्वतंत्र राज्य स्थापले व गोंझालो पिझारोशी त्याचे यादवी युद्ध सुरू झाले अन्डीज् पर्वतातील ३००० मीटर उंचीवरच्या चुपास येथे दोघांची मोठी लढाई झाली आणि त्यात अल्माग्रोच्या मुलाचा पराभव झाला

दरम्यान स्पेनहून वाको-द-कास्ट्रो याला शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या विशेष कामावर पाठविले होते. विशेषत ताम्रवर्णीयाना न्याय देण्यासाठी त्याची नेमणूक होती. त्याने या प्रदेशात नवे कायदे लागू केले त्यामुळे त्याला खूपच विरोध झाला स्पॅनिश विजयी वीरांनी येथे ज्या इस्टेटी केल्या होत्या त्यावरच नव्या कायद्यामुळे गदा येत होती. आपल्या जमिनी सर-

कारच्या व ताम्रवर्णीयांच्या हवाली करण्याची त्याची तयारी नव्हती धोका पत्करून व मृत्यूशी सामना करून मिळविलेल्या इस्टेटी सरकारच्या स्वाधीन करण्यासाठी होत्या काय ? असे ते विचारू लागले गोंझालो पिझारो दक्षिणेकडे चिकवीसाका येथे गेला आणि तेथून त्याने राजप्रतिनिधीविरुद्ध बंड केले नतर झालेल्या यादवी मध्ये राजप्रतिनिधी मारला गेला

आता स्पेनने पेड्रो-द-ला गास्का या धर्मोपदेशकाला तेथील परिस्थिती ताळयावर आणण्यासाठी पाठविले त्याने कुठलाही पगार घ्यायचे नाकारले पण अमर्याद अधिकार मागितले ते त्याला मिळाले. इकडे गोंझालो पिझारो लिमा या राजधानीच्या शहरी पोचला होता आणि या प्रदेशाचे अनियंत्रित राज्यपद आपल्याला मिळालेच, अशा आत्मविश्वासात वावरत होता. गास्का दक्षिण अमेरिकेत पोचला, आणि त्याने मित्र मिळवायला सुरुवात केली गास्काच्याभोवती लवकरच सैनिक व आरमार जमले गास्काने पिझारोवर सैन्य पाठविले पण त्या सैन्याचा टिटकाका सरोवराच्या किनाऱ्याजवळ पराभव झाला गोंझालो पिझारो चिलीला पळून जायच्या तयारीत होता. पण मिळालेल्या विजयामुळे तो कुझकोला परतला पण १५४८ च्या मार्च महिन्यात गास्काने प्रचंड सैन्य गोळा करून पेरु देशात पाठविले गोंझालोचे सैनिक आता त्याला सोडून जाऊ लागले. शेवटी गोझालो पिझारोला शरण जाण्याखेरीज गत्यतर उरले नाही त्याच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्याचे मुडके उडविण्यात आले पाच प्रख्यात पिझारो बंधूंच्यापैकी फक्त एकच वाचला कारण तो तुरुगात होता ! या धामधुमीत ओल्याबरोबर सुके जळते त्या प्रमाणे काही निष्पाप लोकही मारले गेले काही

निरपराध लोकाना पेरु देशातून हद्दपार करण्यात आले आता पेड्रो गास्काचा सपूर्ण अधिकार प्रस्थापित झाला होता त्याने पाहिले की आपल्या सैनिकाना धाडस दाखवायची सधी मिळाली पाहिजे. म्हणून त्याने त्याना मोहीमा काढायला उत्तेजन दिले. दक्षिणेचा प्रदेश अजून असशोधितच राहिला होता तिकडे मोहीमा काढण्याचे ठरले नुनेझ-पेड्रो रिव्हर प्लेटच्या दिशेने निघाला वल्दीव्हॉया चिली देशाकडे आधीच निघाला होता. पश्चिमेकडे आणखी काही सशोधक गेले गास्काने आता जप्त केलेल्या इस्टेटीचे पुर्नवाटप केले ताम्रवर्णीयाना वेठबिगार करायला लावण्याची पद्धत सपूर्ण बद करणे त्याला शक्य झाले नाही. पण त्याने त्यातल्या त्यात जुलूम कमी कसा होईल ते पाहिले. १५४८ मध्ये देशात प्रस्थापित झालेल्या शाततेबद्दल एक उत्सव करावयाचे ठरले या उत्सवाच्या वेळीच चारकासच्या उत्तरेला एक नवे शहर स्थापायचे ठरले. ही नवी जागा अलोन्सो-द-मेंडोझा याने निवडली होती या नवीन जागेला हिवाळचात वाहणाऱ्या थड वाऱ्यापासून सरक्षण मिळाले होते. ही जागा टिटाकाका सरोवराच्या दक्षिणपूर्वेला अल्टीप्लेनो पठाराच्या खोलगट भागात होती या जागेची समुद्रसपाटीपासूनची उची बारा हजार फूट किंवा ३६५८ मीटर होती. नव्या शहराला 'अवर लेडी ऑफ पीस' किंवा स्पॅनिशमध्ये 'न्यूअेस्त्रा सेनोरा-द-ला-पाझ' असे नाव ठेवण्यात आले. आज या शहराला फक्त ला-पाझ असे म्हणतात सध्या हे शहर बोलिव्हिया राष्ट्राची राजधानी आहे कोणत्याही राष्ट्राची राजधानी समुद्रसपाटीपासून इतक्या उचीवर वसलेली नाही. ला-पाझची रचना लक्षणीय आहे. अल्टीप्लेनो पठाराच्या व शहराच्याभोवती २१ हजार फूट किंवा ६४०० मीटर उचीची

पर्वतशिखरे दिमाखाने उभी आहेत बशीसारख्या खळग्यात असलेल्या या शहराकडे यायची प्रवेशद्वारे दोन आहेत वरच्या उच्च भागाकडे गेल्यास टिटाकाका सरोवर व पेरु देश लागतो. उताराच्या दिशेने १६०० किलोमीटरवर पपास लागते. अनेक वर्षे अर्जेंटिनातील व्यापार ला-पाझच्याच मार्गाने होत असे स्पॅनिश वसाहतींच्या व्यापार मार्गातील ला-पाझ हे महत्वाचे ठाणे होते.

## चिली

पूर्वी अल्माग्रोने चिली देशात मोहीम काढली होती तेथे वाळवंटाशिवाय फारसे काही नव्हते म्हणून त्याच्यानंतर त्या मोहीमेत पैसे खर्च करायला कोणी तयार नव्हते. नतर पेड्रो-वल्दीव्हॉया या सशोधकाने हा देश मार्क्विससाठी जिकून घेण्या-बाबत सनद मिळविली. अल्माग्रो दोन मार्गांनी गेला होता. त्यापैकी त्याचा किनाऱ्याचा मार्ग जास्त पसत करण्यात आला. वल्दीव्हॉयाच्या टोळीत दीडशे स्पॅनिश सैनिक आणि एक हजार ताम्रवर्णीय होते. ते पॅसिफिक महासागराच्या किनारपट्टीने निघाले

तेथील रुक्ष वाळवंट ओलाडायला अकरा महिने लागले शेवटी त्याना गवताळ कुरणाचा व वृक्षराजीचा प्रदेश लागला तो १५४५ सालातील फेब्रुवारी महिना होता आणि त्या वेळी चिली देशात उन्हाळा होता त्याना ३३ अश दक्षिण अक्षाशा-जवळ एका उपसागरात बदरासाठी सुरक्षित जागा सापडली तेथून ते अतर्भागात वळले आणि त्यानी काही ठेंगण्या टेकड्या ओलांडल्या समोरच त्याना सुपीक खोरे आढळले. त्या खोऱ्यात ताम्रवर्णीयाची पुष्कळच वस्ती होती. मोपाचो नदीच्याकाठी

वल्दीव्हॉया थाबला आणि चागली जागा बघून त्याने एक स्पॅनिश पद्धतीच्या शहराची आखणी केली. या नव्या शहरात त्याने बाजाराची जागाही वेगळी आखून ठेवली तसेच त्या शहरात सैनिकाना व ताम्रवर्णीयाना निरनिराळ्या जागा नेमून दिल्या. अल्माग्रोने चिलीवर विजय मिळविला नाही म्हणून त्याचे डोके उडविण्यात आले होते, असे त्याने आपल्या सैनिकाना सागितले. थोडक्यात चिली पादाक्रान्त केल्याशिवाय आपण परत फिरणार नाही असे त्याने सैनिकाना बजावले नव्या आखणी केलेल्या शहराचे नाव त्याने 'सॅन्टीयागो-द-नूअेव्हो एक्स्ट्रिमो असे ठेवले ते शहर सध्या फक्त सॅन्टीयागो या नावानेच ओळखले जाते आणि चिली राष्ट्राची राजधानी याच शहरी आहे त्याने जे बदर शोधून काढले होते त्या बंदराचे नाव त्याने तेथील रमणीय निसर्ग लक्षात घेऊन 'नदनवनाचे खोरे'–'पॅराडाईज व्हॅली–किंवा स्पॅनिशमध्ये 'व्हल्पराईसो' असे ठेवले

उत्तरेकडल्या माको आणि इन्का जमातीचे लोक दक्षिणेकडे आले. आणि त्यानी इकडील ताम्रवर्णीयाना शेत-जमिनी न पेरता ओसाड पाडायला सागितले यावर उपाय म्हणून वल्दीव्हॉयाने एके ठिकाणी वसाहत स्थापून शेती केली. आणि आपल्या सैनिकाना दोन वर्षं पुरेल एवढे अन्नधान्य जमविले ताम्रवर्णीयाच्या जवळ लिखित भाषा नव्हती तरी दोऱ्या विणून ते सदेश पाठवीत असत अशाच एका सदेशामधून उत्तरेकडे २५०० किलोमीटर अतरावर फ्रॉन्सिस्को पिझारो मरण पावला आहे ही बातमी त्याला समजली. त्याने शहर समितीची सभा बोलावली आणि त्याच्या समतीने स्वत:लाच चिली देशाचा प्रशासक नेमून घेतले.

मध्यंतरी वल्दीव्हॉया व्हल्पराइझो येथे होता तेव्हा त्याच्या

मागे सॅन्टीयागो शहरात बड उभे राहिले तो लागलीच परतला आणि ते बड त्याने निष्ठूरपणे मोडून काढले. मध्यन्तरी व्हॅल्प राइझो येथील एका सैनिकी तुकडीवर ताम्रवर्णीयानी हल्ला केला त्या तुकडीतील दोनच स्पॅनिश सैनिक निसटू शकले. बाकीचे सर्व मारले गेले! वल्दीव्हाया नसताना सॅन्टीयागोला हजारो ताम्र-वर्णीयानी वेढा घातला. शहराचा नाश व्हायची वेळ आली होती पण वाल्दीव्हॉयाची प्रेयसी इनेज हिने पूर्वीच ओलीस ठेवलेल्या सात टोळी प्रमुखांच्या माना छाटल्या आणि त्याची मुडकी वेढा घालणाऱ्या शत्रूच्या फळीवर फेकली. तिच्या या कृत्यामुळे शहर वाचले ही घटना तेथील लोकगीतात व लोक-कथात अजूनही सागितली जाते

परतु स्पॅनिशाना शेवटी त्याच्या घोडेस्वारामुळे विजय मिळाला. घोडा पाहिला की ताम्रवर्णीय फार घाबरत असत! वल्दीव्हॉयाचा सेनापती मोनोरॉय घोडेस्वाराची एक तुकडी घेऊन सान्टी-यागोच्या किल्ल्याबाहेर पडला. आणि त्याने ताम्रवर्णीयावर चाल केली घोडेस्वारांचा हा हल्ला पाहून ताम्रवर्णीय पळत सुटले. स्पॅनिशानीही शहर सोडले तेव्हा ते शहर अगदी जळून गेले. अन्नसाठ्यापैकी थोडाफार मका शिल्लक राहिला वल्दीव्हॉयाने शेते पेरली व पुन्हा अन्नसाठा तयार केला आतापर्यंत लुटलेले सोने बरोबर देऊन त्याने मोनोरॉयला पेरुकडे पाठविले. जाताना प्रवासात मोनोरॉयवर अनेक सकटे कोसळली पण शेवटी तो लिमा येथे पोचला सोने देऊन त्याने रसद घेतली आणि ती बोटीत भरून तो व्हल्पराइझो बदराकडे सागरी मार्गाने परतला या सर्व प्रवासाला त्याला दोन वर्षे लागली. नतर काही दिवसानी १५४३ मध्ये ६० घोडेस्वार घेऊन त्याने सॅन्टीयागो शहरात

प्रवेश केला तेथे मागे राहिलेले सैनिक उपासमारीने वाळून गेले होते भूतासारखे दिसत होते ! पण या कालानतर चिली देशाचा विकास सुरू झाला संशोधन पुन्हा एकदा चालू झाले. पॉस्टेन याने समुद्रमार्गाने मागेलॉनच्या सामुद्र धुनीपर्यंत सर्व किनारपट्टी तपासली उत्तरेकडे ३२० किलोमीटरवर सुपीक खोऱ्याच्या किनाऱ्यावर सेरेना हे गाव वसविण्यात आले त्याना वेठबिगारी करण्यासाठी ताम्रवर्णीयाची कमतरता भासू लागली तेव्हा ताम्रवर्णीयाना पुढे होणारी मुले वेठबिगारीसाठी कोणी घ्यायची हे आधीच ठरवून ठेवण्यात आले !

लवकरच गोंझालो पिझारोचा शेवट झाल्याची बातमी आली. वल्दीव्हॉयाने लागलीच राजप्रतिनिधी गास्का याच्याकडे आपली निष्ठा जाहीर केली गास्काने चिलीचा राज्यपाल म्हणून त्याची नेमणूक कायम केली शिवाय पॅसिफिक किनाऱ्यापासून अत-र्भागात आठशे किलोमीटरपर्यंत जमीन व्यापण्याचे हक्क त्याने वल्दीव्हॉयाला दिले त्यामुळे अँन्डीज पर्वताच्या पूर्वेकडे जमीन व्यापण्याचे हक्क त्याला मिळाले

वल्दीव्हाया लिमाहून चिलीला यायला निघाला तो सेरेना येथे पोचला, तेव्हा ताम्रवर्णीयाच्या हल्ल्यामुळे ते बदर ओसाड पडलेले त्याला आढळले तेथील अधिकारी बिलाग्रे याला त्याने अर्जेन्टिनापासून सशोधन करावयास सागितले स्वत वल्दीव्हाया नवी सैन्य भरती करण्यासाठी पेरुला परतला यावेळी त्याने अॅन्डीज पर्वताच्या पूर्वेकडून चिलीला परतायचे ठरविले. तो चाराकासच्या दक्षिणेला पोचला आणि तेथून त्याने अल्माग्रोचा रस्ता धरला तो सोलिस नदीजवळ पोचला तेव्हा तेथून पूर्वेकडे स्पॅनिशाचा आणखी एक जथा आहे असे त्याला समजले तो

त्याच्याकडे झुडपाळ व गवताळ जमिनीतून जायला निघाला तो सॅन्टीयागो डेल एस्टेरो येथे पोचला, तेव्हा त्याची भेट न्यूनेझ-डेल-प्राडो याच्याशी झाली. प्राडो गास्काच्या आज्ञेवरून इकडे आला होता प्राडोजवळ जास्त मोठे सैन्य होते व राजप्रतिनिधी-कडून मिळालेली कायदेशीर आज्ञापत्रेही होती. त्यामुळे वल्दी-व्हायाने स्वत होऊनच प्राडोला सर्व तुकडीचा उपनेता नेमले. चिलीमधील सँटियागो परत मिळविण्याच्या उद्दिष्टाने ते जाऊ लागले. त्याचा रस्ता उत्तर पश्चिमेकडे जात होता. या वाटेने त्याना पुष्कळच पर्वतरांगा ओलाडाव्या लागल्या, व प्रवासाचा खूप त्रास झाला पण त्यांच्या डाव्या हाताजवळच पपासचे मैदान होते आणि त्या मैदानातून हा प्रवास करणे फार सुखाचे झाले असते. पण त्या मैदानाची माहिती नसल्यामुळे त्यांना हाल अपेष्टा काढाव्या लागल्या ३३ अंश दक्षिण अक्षांशाजवळ गेल्यानतर त्यांनी अँडीज पर्वत ओलाडायचे ठरविले. ही पर्वतशिखरे नेहमीच बर्फाच्छादित असतात, व त्या पर्वतातील 'उपालाटा' ही खिंड वर्षातून सहा महिने बर्फाखाली असते. त्या खिंडीतूनच त्याना पश्चिमेकडे जावे लागले चिलीमध्ये उतरल्यानतर तेथील दक्षिणे-कडची सुपीक जमीन पाहून वल्दीव्हायाला आनद झाला. किनाऱ्याने जाणे जरी अवघड होते तरी मधले खोरे सुपीक जमिनीचे होते तेथून प्रवास करणे सुखकर होते. नद्यात भरपूर मासे होते आणि शिकारही चागली मिळण्यासारखी होती ३६ अंश दक्षिण अक्षांशाजवळ त्यांना 'बायोबायो' ही नदी आडवी आली नदीच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या ताम्रवर्णीयानी त्याला संघटित व प्रखर विरोध केला. त्याने या ठिकाणी 'कन्सेप्शन' हा किल्ला बाधला आता ते चिलीमधले तिसरे मोठे शहर आहे

या ठिकाणी १५५२ मध्ये त्याला नदीच्या वाळूत सोने सापडले

वल्दीव्हायाला बायोबायो नदीच्या दक्षिणेकडच्या अरुकान जमातीच्या ताम्रवर्णीयानी प्रखर विरोध केला तरी त्याने तेथे दोन किल्ले बाधले ‘ इपिरियल ’ आणि ‘ वल्दीव्हाया ’ या नावाचे हे दोन किल्ले अतिशय रमणीय असलेल्या व खूप सरोवरे असलेल्या प्रदेशात होते बायोबायो नदीच्या उत्तरेकडचे ताम्रवर्णीय सुरुवातीला स्पॅनिशाशी लढले पण एकदा त्याचा पराभव झाल्यावर ते स्पॅनिशांचे चागले सेवक बनले, व त्याच्या सैन्यातही सामील झाले पण दक्षिणेकडचे अरुकान जमातीचे ताम्रवर्णीय सघटित, प्रखर व चिवट लढवय्ये होते. वल्दीव्हायाचा एक वैयक्तिक ताम्रवर्णीय नोकर– लौटारो– पळून गेला आणि त्याने आपल्या जमातीच्या लोकाना संघटित करून वल्दीव्हायाशी योजनाबद्ध लढाई सुरू केली त्याने लवकरच वल्दीव्हायाला पकडले वल्दिव्हायाचा शेवट कसा झाला; याचा तपशील इतिहासात मिळत नाही नेता नसलेल्या स्पॅनिश लोकावर अरुकान ताम्रवर्णीयानी हल्ला चढवला आणि घाबरलेल्या स्पॅनिशांना पळता भुई थोडी झाली काही दिवसानी लिमा येथून घोडे व शस्त्रे यांची मदत आली आणि बायोबायो नदीच्या उत्तर किनाऱ्यावरून ताम्राना हुसकण्यात आले पण बायोबायो नदीच्या दक्षिणकडे अरुकान ताम्रवर्णीयाचे वर्चस्व कायम राहिले आणि तेथून त्याचा प्रभाव नष्ट करून तो प्रदेश स्पॅनिश लोकाच्या अधिपत्याखाली यायला आणखी दोनशे वर्षे लागली !

**प्लेट नदीचे सशोधन**

दक्षिण अमेरिकेतील सुखद हवामानाच्या सुपीक जमिनी प्लेट नदीच्या दक्षिणेस व पश्चिमेस आहेत, व तेथे पोहोचणेही अगदी

सुलभ आहे असे असूनही या भागात स्पॅनिशांचे संशोधन व वसाहती मंद वेगाने व उशीरा झाल्या याचे कारण समजत नाही तरी पण ब्राझीलच्या किनाऱ्यावर पोर्तुगालने हक्क सांगितल्याने स्पॅनिशांनी पश्चिम किनाऱ्यावर आपले लक्ष केंद्रित केले. आणि सुरुवातीला तरी स्पॅनिश विजेत्यांना सुपीक जमिनीपेक्षा सोन्याचे आकर्षण जास्त होते दक्षिण अमेरिका खंडाच्या या भागात पहिल्या ३६ वर्षांत महत्वाची म्हणता येईल अशी एकच असेन्शनची वसाहत होती, व ती समुद्रकिनाऱ्यापासून १६०० किलोमीटर आत होती. १५१६ मध्ये पश्चिम अर्जेंटिनामध्ये व्हिलाग्रेच्या आज्ञेनुसार मेंडोझा शहराची स्थापना झाली आणि त्यानंतर सहा वर्षांनी 'सॅनजुवान' वसवण्यात आले प्लेट नदीपासून अंतर्भागात ७०० किलोमीटरपर्यंत पपासचे सुपीक मैदान पसरले आहे या मैदानातल्या वसाहतींची सुरुवातही पश्चिमेकडून झाली याचे आश्चर्य वाटते हे मैदान 'ब्यूनोस आयर्स' हे केंद्र धरून पंख्यासारखे पसरले आहे पश्चिमेकडील आणि दक्षिणेकडील तीन बुटकी पठारे सोडल्यास हे मैदान अगदी सपाट आहे नद्या फार कमी आहेत या सर्व मैदानावर हिरव्यागार गवताचा गालिचा पसरलेला स्पॅनिशांना आढळला ते गवत घोडे व जनावरे यांच्यासाठी फारच उत्तम होते सुधारलेल्या जातीचे गवत तेथे लावल्यावर जनावरांची चंगळच झाली या मैदानात शेती फारशी होत नसे पशुपालन मात्र भरपूर प्रमाणात करत असत पण ताम्रवर्णीय नेहमी गुरे-ढोरे पळवून नेत, म्हणून मैदानाच्या उत्तर टोकाला किल्ल्यांची मालिका बांधण्यात आली.

पपास मैदानाच्या पश्चिम टोकाजवळ कोर्डोबा हे शहर सन १५७३ मध्ये वसवण्यात आले. तेथे पाऊस बऱ्यापैकी पडे आणि जवळच रम्य वनराजी असलेल्या टेकड्या होत्या. येथून पूर्वेकडे पाराग्वे नदीवरच्या स्पॅनिशाशी सधान जुळवण्यात आले त्यातूनच गॅराय याने पूर्वेकडील सान्ताफे हे शहर स्थापन केले. ब्यूनोस आयर्सची स्थापना १५८० मध्ये झाली आणि लवकरच हे शहर पशूपालनाचे केद्र बनले या भागातील ताम्रवर्णीय स्पॅनिशाना सहजासहजी वश झाले नाहीत त्याच्यावर पूर्ण विजय मिळवून त्याना या प्रदेशाच्या जनतेत सामावून घेण्यासाठी पुढची दोनशे वर्षे खटपट करावी लागली.

### ॲमेझॉन

आता या कालखडातील संशोधनाची शेवटची महत्त्वाची कथा सागायची राहिली. गोंझालो पिझारो क्विटो येथे राज्यपाल असताना सिनामॉन भूमीचे सशोधन करण्यासाठी पूर्वेकडे गेला होता सन १५४१ मध्ये ही मोहीम निघाली होती या प्रचड मोहिमेत २१० स्पॅनिश, चार हजार ताम्रवर्णीय व काही हजार डुकरे होती उच पठारावरून हे लोक घनदाट अरण्यात घुसले त्याच्यावर नाना प्रकारची सकटे कोसळली. किनारपट्टीला राहणारे ताम्रवर्णीय उच खिडीतल्या थडीमुळे मेले तर पठारा-वर राहाणारे ताम्रवर्णीय रोगराईला बळी पडले. या मोहिमेमुळे स्थानिक रहिवाशांच्या अन्नपुरवठ्याची लुटालूट होऊन ते हैराण झाले. पाऊस सुरू झाला व जंगलातून प्रगती होईना शेवटी ते झुमाक्वेच्या खोऱ्यात पोहोचले व तेथेच थाबले कारण येथे अन्न-पुरवठा मोठ्या प्रमाणावर होता येथे गुयाक्विलचा राज्यपाल व

पिझारोचा दुय्यम अधिकारी 'ओरेलाना' या जथ्थ्याला येऊन मिळाला

आता मोहिमेतील लोकांची संख्या खूपच कमी झाली होती. त्यानी कोका नदीच्या दलदलीतून मार्ग शोधला नौकानयन करण्याइतके पाणी आहे असे पाहून सामानसुमान नेण्यासाठी पिझारोने एक होडी बांधून घेतली ओरेलानाने अन्न शोधण्यासाठी नदीतून प्रवाहाच्या दिशेने जायचे ठरविले. बरोबर ५७ लोक घेतले गोंझालो पिझारो त्याची वाट पाहत मागे थांबला. शेवटी कटाळून तो ओरेलानाच्या शोधाला होडयामधून निघाला. त्याच्या होडया नापो या नदीत शिरल्या तेथे त्याला ओरेलाना तेथून पुढे गेल्याचे समजले. गोंझालोचा जथा नापो नदीत प्रवाहाच्या वरच्या दिशेला वळला. तेथे त्यांना युकाची पाढरी झाडे आढळली त्यामुळे त्याना थोडेबहुत अन्न मिळाले शेवटी ते सर्वजण कसेबसे ऑगस्ट १५४२ मध्ये क्विटोला पोहोचले या वेळेपर्यंत त्यानी त्याच्याजवळचे सर्व घोडे व कुत्रे खाऊन टाकले होते! मोहिमेत गेलेले सर्व ताम्रवर्णीय मृत्यू पावले होते आणि स्पॅनिशापैकी निम्मेच शिल्लक उरले होते!

इकडे ओरेलाना नदीच्या प्रवाहातून जाऊ लागला नदीच्या प्रवाहाला बराच वेग असल्यामुळे तो आठ दिवसात ११२० किलोमीटर अंतर काटू शकला. त्यानतर ढोलाच्या आवाजाच्या अनुरोधाने तो गेला तेव्हा त्याला एक खेडे सापडले तेथे त्याला भरपूर अन्न मिळाले

ओरेलाना हा हाडाचा सशोधक होता त्याने स्थानिक रहिवाशाची भाषा शिकण्याचा प्रयत्न केला त्याला भेटलेल्या स्थानिक लोकाशी आदराने व प्रेमाने वागून त्याची मैत्री त्याने मिळविली.

अशीच दोस्ती झालेल्या एका खेड्यात स्थानिक रहिवाशाच्या मदतीने त्याने एक मोठी बोट बांधली– या बोटीतून तो पुढे प्रवास करू लागला. पुढे गेल्यावर होड्यातून फिरणाऱ्या लढवय्या स्त्रियांची जमात त्याना भेटली. त्या स्त्रिया विष माखलेले बाण फेकून हल्ला करीत असत. या स्त्रियांचे टोपण नाव त्यांनी 'अमेझॉन' असे ठेवले मुख्य नदीतून प्रवास करताना त्याना आढळले की, या नदीला अनेक नद्या येऊन मिळत आहेत ही मुख्य नदी अनेक ठिकाणी ३ किलोमीटर रुंद होती शेवटी ७ महिन्यानंतर ऑगस्ट १५४२ मध्ये ओरेलाना या मोठ्या नदीच्या मुखामुळे तयार झालेल्या प्रचंड आखातात शिरला

आता तो धोक्यातून बाहेर पडला होता पण त्याची व साथी-दारांची बरीच उपासमार झाली होती. तो गियानाच्या किनाऱ्याने व्हेनुझुएला जवळच्या 'क्युआबुआ' येथे पोहोचला त्याने जे पाहिले व अनुभवले त्याचे अतिरंजित वर्णन करण्याची त्याला सवय होती त्याने बढाया मारून हा सर्व प्रदेश व्यापण्याबद्दलची सनद मिळविली आणि आणखी एक मोहीम काढली पण ही नवी मोहीम अयशस्वी ठरली ओरेलानाने जी मोठी नदी शोधून काढली होती तिलाच पुढे 'अमेझॉन' असे नाव मिळाले

ओरेलानाच्या प्रवास वृत्तातामुळे दक्षिण अमेरिका खंडाचे सर्व-साधारण चित्र तयार झाले १५५० साली अमेरिका खंडाचा शोध लागून ५८ वर्षे झाली होती या अर्ध-शतकाच्या कालखंडात स्पॅनिशांनी केलेले संशोधन व उद्योग पाहून आश्चर्य वाटते ! स्पॅनिशांना सोन्याच्या लोभाने प्रेरित केले असले तरी त्यांचे धाडस अपूर्व होते हे मान्य करावे लागेल त्याचा आत्मविश्वास,

अज्ञात प्रदेशात झेप घेण्याचे धाडस आणि सर्व प्रकारच्या संकटाना तोंड देण्याची वृत्ती याचे कौतुकच केले पाहिजे. १४ व्या शतकात पोर्तुगीजानी नौकानयनात खूपच सुधारणा केल्या पण त्याचा फायदा स्पॅनिशांनाच मिळाला. सोन्याच्या मागे फिरणारे स्पॅनिश विजेते चागले सशोधक कधीच नव्हते. पण त्यांच्याबरोबर जे धर्मोपदेशक होते, त्यानीच भौगोलिक माहिती कसोशीने जमा केली.

आतापर्यंत दक्षिण अमेरिकेचा सर्व किनारा ज्ञात झाला होता फक्त मॅगेलानच्या सामुद्रधुनीजवळचा टेरा डेल फ्युगो हा प्रदेश आणि चिलीच्या दक्षिण-पश्चिमेचा द्वीपसमूह हे तेवढे अज्ञात राहिले होते. अँडीज पर्वताच्या पश्चिमेकडील चिचोळी किनारपट्टी उत्तरेकडील गुयाक्विलपासून दक्षिण चिलीतील बायोबायो नदीपर्यंत चांगलीच माहीत झाली होती. अन्डीज पर्वताच्या पूर्व बाजूला प्रदेश दुर्गम होता, पावसाचे मान जास्त होते आणि वनराजी दाट होती त्यामुळे तेथील काही ठळक प्रदेशच माहीत झाले होते. क्यूटोच्या पश्चिमेचा प्रदेश, बोगोटा आणि मारिकैबूचे खोरे, पुटीमाओ नदीच्या उगमाचा प्रदेश, मेंडोझाचा आसमत, तुकुमान आणि साल्टा असे हे अधलेमधले प्रदेश माहीत झाले होते. तसेच सावो-फ्रॅन्सिस्को, ओरिनोको, पिल्कोमाओ, पराना आणि पेरुग्वे या नद्याचीही बरीच माहिती झाली होती पण ब्राझीलियन पठाराचा प्रदेश, गियानामधील पठारे आणि माटोग्रासो पठार हे युरोपियनाना अजून अज्ञातच होते. त्याचप्रमाणे आजच्या युरुग्वेमधील बराच मोठा प्रदेश आणि अर्जेंटिनामधील पपास मैदाने अज्ञात होती. खंडाच्या दक्षिण-पूर्व कोपऱ्याकडे फारसे

कोणी गेलेच नव्हते. तेथे राक्षसाची वस्ती आहे अशा अफवा होत्या यापेक्षा दक्षिण-पूर्व कोपऱ्याची काहीच माहिती नव्हती तसेच ॲमेझॉन व ओरिनोको नद्यांच्या मधल्या प्रदेशात काय आहे हे अज्ञातच होते. ॲन्डीज पर्वताच्या पूर्व उतारावरील अमर्याद जंगलाबद्दलही पाश्चिमात्यांना काहीच माहिती नव्हती.

□

प्रकरण सातवे

# वसाहतींचा विस्तार

दक्षिण अमेरिकेत जेथे जेथे वसाहती स्थापन झाल्या तेथे तेथे स्पेनमधील राज्यकारभारपद्धती राबविली गेली. स्पेनमध्ये लोकशाही व राजेशाही याचे विचित्र मिश्रण होते. स्थानिक स्वराज्यामध्ये लोकाना भरपूर प्रतिनिधित्व होते व अधिकारही होते. नगरपालिकाची ही स्पॅनिश पद्धत तशीच्या तशी दक्षिण अमेरिकेतील वसाहतीमध्ये राबविण्यात आली.

शहराच्या नगरपालिकेमध्ये काही सभासद निवडून आलेले असत त्याना रेजिदोर म्हणत हे सभासद दोन मॅजिस्ट्रेट निवडत एक मॅजिस्ट्रेट न्यायदान करी तर दुसरा पोलिसाची कामे करी. दक्षिण अमेरिकेतील लहान खेड्यालाही स्थानिक स्वराज्याचा हा कारभार करता येई

राजकीय सत्ता स्पेनच्या राजाच्या हातीच एकवटली होती. तो व्हाईसरॉय म्हणजेच राजप्रतिनिधी नेमून त्याच्या द्वारे दक्षिण अमेरिकेतील कारभार चालवी या राजप्रतिनिधीमुळे पिझारो-सारख्या स्पॅनिश विजेत्याच्या हाती राजकीय सत्ता जायला प्रतिबंध होत असे. दक्षिण अमेरिकेसाठी एकूण तीन व्हॉईसराय-पदे निर्माण करण्यात आली पेरु येथील व्हाईसरॉय १५४२ मध्ये

नेमण्यात आला तर न्यू ग्रॅनाडा येथे १७१८ मध्ये आणि ला प्लाटा येथे १७७६ मध्ये व्हाईसरॉय नेमण्यात आले व्हॉईसरॉयला सैन्यावर सर्व अधिकार असत इतर सर्व अधिकारी तोच नेमत असे. ताम्रवर्णीयांचा तो सरक्षक म्हणवत असे.

राजप्रतिनिधीच्या अमलाखाली फार मोठा मुलुख होता. म्हणून निरनिराळ्या ठिकाणी कारभार पाहायला कॉन्सिले किंवा समित्या नेमण्यात आल्या या समित्याना एक-एक अध्यक्ष असे व तो कारभार पाही स्पॅनिशमध्ये या समित्याना ' ऑडेन्सिआ ' असे नाव आहे अशी पाच कौन्सिले स्थापन झाली पेरु येथे १५४२ मध्ये, बोगोटा येथे १५४९, चाराकास येथे १५५९, क्विटो येथे १५६३ आणि सॅंटियागो येथे १५६५ मध्ये कौन्सिले स्थापन झाली.

ही कौन्सिले आपल्या कारभाराखालील प्रदेशाचे विभाग पाडत असत व त्यावर अधिकारी नेमत असत चर्चची सघटना स्वतंत्र होती आणि ताम्रवर्णीयाच्या हितसबंधाचे सरक्षण चर्चने अनेकदा केलेले आहे. लाचलुचपतीला आळा बसावा म्हणून कोणत्याही अधिकाऱ्याची चौकशी तो अधिकारावर असतानाच करण्याची व्यवस्था होती.

दक्षिण अमेरिकेतील कुठल्याही नागरिकाला परकीय राष्ट्राशी व्यापार करता येत नसे सर्व व्यापार कौन्सिलमार्फत व तेथून स्पेनमार्फतच होत असे. उदाहरणार्थ, मेंडोझा येथील सोने चाराकास कौन्सिलच्या अधिकारात होते ते प्रथम ला-पाझमार्गे लिमा येथे जाई आणि तेथून पनामामार्गे स्पेनला जाई पूर्व किनाऱ्यावरील ब्यूनोस आयर्स येथून मेंडोझा येथील सोने नेणे सोपे पडले असते. पण तसे होत नसे.

पोपने जगाची वाटणी पोर्तुगाल व स्पेनमध्ये नकाशावर एक रेघ मारून करून दिली होती. युरोपातील अन्य राष्ट्रांना ही वाटणी मान्य नव्हती त्यावेळची इंग्लडची राणी पहिली एलिझाबेथ हिने म्हटले होते की ' रोमच्या बिशपने स्पॅनिश लोकांना नव्या जगात काही हक्क दिले आहेत, हे मी मान्य करणार नाही. स्पॅनिश लोकाच्या प्रत्यक्ष ताब्यात जितके मुलुख आहेत त्याशिवाय अन्य ठिकाणी त्याना काही हक्क आहेत याची माहिती आम्हाला नाही ' एलिझाबेथचे हे मत युरोपमधील सर्व राष्ट्रांचे प्रातिनिधिक मत होते

स्पॅनिशांना अमेरिकेत अधिकार नाहीत असे एलिझाबेथने जाहीर केल्यामुळे फ्रॅन्सिस ड्रेकसारख्या सभ्य चाच्याना स्पॅनिश खजिने लुटण्यास प्रोत्साहन मिळाले ड्रेकने अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील बदर नोम्ब्रे-द-डायस येथे स्पॅनिश जहाजावर हल्ला करून पुष्कळशी संपत्ती लुटली मार्टीन कोलसारख्या फ्रेंच चाच्याने कार्टाजेना बंदर लुटले. या काळात चाचेगिरीला ऊत आला सर्व राष्ट्रातील गुड व बदमाष चाचे वेस्ट इंडिज्मधील हैती बेटावर मुक्काम ठोकून होते. बेटावरील जगलात त्याना लपायला जागा होत्या. हे चाचे जंगली डुकरे व जनावरे मारत आणि त्यांचे खारावलेले मास आपल्या बोकन जातींच्या जहाजावर साठवून ठेवत. त्यावरूनच या चाच्याना इग्रजीमध्ये ' बकनियर्स ' असे नाव पडले.

डच लोक मुख्यत व्यापारी होते नाईलाज झाल्याखेरीज ते कधी हल्ला करीत नसत. व्हेनुझुएलाच्या किनाऱ्याजवळ अरुबा बेटावर त्यानी आपले ठाणे ठेवले, तेथे हवा कोरडी व उष्ण होती त्यामुळे त्यानी तेथे मीठ बनवायला प्रारभ केला. त्यावेळी व्यापारी

मालात मिठाला फार महत्त्व होते. अरुबा बेट थोड्याच दिवसात गुलाम, मीठ आणि इतर वस्तू यांच्या व्यापाराचे केंद्र बनले डचांनी गियानाच्या किनाऱ्यावर कोरांटिन येथे सन १६१७ मध्ये एक किल्ला बांधला. डचांनी आपली वसाहत पेरनामबुको येथे स्थापन केली होती. तेथील रिसाईक हे ठिकाण पेरु आणि चिली किनाऱ्यावर हल्ला करण्याचे तळ बनले लवकरच अनेक देशातील चाचे स्पॅनिशांच्या दक्षिण अमेरिकेतील व्यापार केंद्रावर हल्ले करू लागले.

चाच्यांची जहाजे हलकी व लहान असत. जहाजावर हल्ला करून ती पटकन् पळून जात आणि त्यांना लपून बसायला वेस्ट इंडीजमधली अनेक लहान-सहान बेटे उपयोगी पडत काही धाडसी चाच्यांनी मात्र किनाऱ्यावरील बंदरावर जाऊनही हल्ले केले. हेन्री मॉर्गन या इंग्लिश चाच्याने पनामा संयोगभूमीवरील पोर्टोबोलो हे बंदर संपूर्ण लुटले-किल्ल्याला शिडचा लावून ते आत चढले सन १६७१ मध्ये त्याने पनामा लुटले. तेथील स्पॅनिश लोकांवर त्याने खूपच अत्याचार केले ताम्रवर्णीयांवर स्पॅनिश लोकांनी जे अत्याचार केले होते त्याचीच जणू ही परतफेड होती ! नंतर याच हेन्री मॉर्गनला जमेका बेटाचा उपराज्यपाल नेमण्यात आले. पश्चिम किनाऱ्यावरही थोडेफार हल्ले होत होते. पण बहुसंख्य चाचे वेस्टइंडीज बेटांच्या आसपासच धाडी घालत असत

विल्यम डॅंपियर हा असाच एक चाचा होता पण त्याला संशोधनाचीही आवड होती. आपल्या प्रवासाच्या तपशीलवार नोंदी तो ठेवत असे व वृत्तांत लिहीत असे. १६९७ मध्ये त्याने ' न्यू व्हॉयेज अराउंड दि वर्ल्ड ' हे पुस्तक लिहिले त्या पुस्तकात चाचेगिरीच्या हकिगतींपेक्षा नव्या प्रदेशांची व तेथील लोकांचीच

माहिती जास्त आहे. त्याने दक्षिण अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यावर हल्ले केले होते आणि गॅलापागास बेटांचे नकाशे तयार केले होते.

दक्षिण अमेरिकेच्या उत्तर किनाऱ्याजवळ १६८० मध्ये १००० चाचे असावेत असा अंदाज होता. चाच्याच्या त्रासामुळेच स्पेनने वसाहती स्थापण्याचे धोरण अंमलात आणले. यामुळे संपत्ती व जमीन स्पेनच्याच ताब्यात राहू शकत होती. चाच्यांपैकी एडवर्ड डेव्हिस या चाच्याने पनामाच्या संयोगभूमीजवळील मास्कुटो ताम्रवर्णीयांच्या प्रदेशात आपली वसाहत व राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला पण लुटारूंना शिस्त लावण्याचे काम फार कठिण होते तेव्हा हा प्रयत्न अयशस्वी झाला हे सांगायला नकोच !

आता थोडे ब्राझीलमध्ये काय चालले आहे ते पाहू ! १५८० मध्ये पोर्तुगाल व स्पेनचे तात्पुरते एकीकरण झाले होते त्याचा परिणाम ब्राझीलवरील घटनांवर झाला. या प्रदेशात डच आणि फ्रेंच उत्तर पूर्वेकडून घुसले साओ पावलो येथे स्थायिक झालेले वसाहतवाले प्रबळ झाले होते. आणि तेथील राज्यकर्त्यांनी स्पेनच्या व पोर्तुगालच्या एकीकरणाला जुमानले नाही या काळामध्ये अनेक देशांतील धाडसी लोक सोन्याच्या आशेने पश्चिमेकडे आणि उत्तरेकडे भटकत फिरत होते. त्यांची संख्या हजारोंनी होती. या टोळ्यांनी स्थानिक ताम्रवर्णीयांवर भयंकर अत्याचार केले पण त्यांच्या या स्वैर भटकण्यामुळे दक्षिण अमेरिकेच्या अंतर्भागातील अनेक प्रदेशांची चांगली माहिती झाली क्षिंगू, आराग्विया, टोकांटिंस या अनेक नद्यांच्या उगमापर्यंतची माहिती झाली. माटोग्रासो हे पठारही माहीत झाले. पराग्वे नदीच्या संपूर्ण प्रवाहाचे

संशोधन झाले. काही धाडसी भटक्यांनी ॲमेझॉन खोऱ्याचा जमीनीवरून प्रवास केला जेसुईट मिशनऱ्यांनी पराग्वे नदीच्या मुखाकडल्या प्रदेशात सात मिशनरी केंद्रे स्थापन केली होती या मिशनऱ्यांनी गुवारानी ताम्रवर्णीयांना सुरक्षित व सुसंस्कृत करण्याचे काम आरंभले होते गुवारानी ताम्रवर्णीय ही जमात दक्षिण अमेरिकेतील सर्व ताम्रवर्णीयांमध्ये अतिशय शांत व सुसंस्कृत जमात होती. या मिशनऱ्यांना सोन्याच्या मागे भटकणाऱ्या टोळ्यांचा बराच त्रास झाला व त्यांच्याबरोबर चकमकीही उडाल्या.

मध्यंतरी उत्तरेकडे अरबस्थानातून दक्षिण अमेरिकेस कॉफीचे झाड आलेले होते. फ्रेंचांनी व्यापलेल्या गियानामध्ये त्याची चांगली वाढ होत होती. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे कॉफीची लागवड व बी यासंबंधी खूपच गुप्तता पाळण्यात येत होती. त्यामुळे मर्यादित कॉफी उत्पादनाला चांगलाच भाव मिळत असे. सन १७२७ मध्ये ब्राझीलमधल्या एका सैनिकाला फ्रेंच वसाहतीत कॉफीचे झाड किंवा बी आणण्याच्या खास कामगिरीवर पाठवण्यात आले त्याने फ्रेंच राज्यपालाच्या पत्नीची मर्जी संपादन केली. राज्यपालाची पत्नी या सैनिकावर प्रेमच करू लागली ! तिच्याकडून शेवटी त्याने कॉफीचे झाड मिळविले एका पुष्प-गुच्छात ते झाड लपवून तो गुप्तपणे बाहिया येथे निघून आला ते तेथे चांगले वाढले पण मकरवृत्तावरील टेरा राक्सो पठारावर कॉफीच्या वृक्षाची चांगलीच वाढ झाली या भागात कॉफीचे उत्पादन त्यानंतर प्रचंड प्रमाणात वाढले. १९३३ साली कॉफीचे उत्पादन भयंकर वाढल्यामुळे ते जाळून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला होता ! रेल्वे इंजिनातील कोळसे पेटवण्यासाठी कॉफी पावड-

रचा उपयोग त्यावर्षी करण्यात आला होता !

ओरेलानाने अॅमेझॉन नदीचा प्रवास प्रथम केला, हे मागे सांगितलेच आहे. अॅमेझॉन नदीचा हा प्रदेश समृद्ध असल्याबद्दल त्याने बराच गाजावाजा केला होता पण तेथील रोगट व प्रतिकूल हवामान व घनदाट जंगल यामुळे तेथील संशोधनात प्रगती होईना तरीही या अज्ञात प्रदेशात एल् डोरॅडो-सुवर्णभूमी-असल्या-बद्दलच्या अफवा वारंवार उठतच होत्या ! या अफवामुळे किंवा अन्य हेतूने प्रेरित होऊन व ताम्रवर्णीयांनी दिलेल्या माहितीवर विसंबून पेड्रो-द-उर्सुआ याने संशोधन सुरू केले त्याने ८ अंश दक्षिण अक्षांशाजवळ अँडीज पर्वत ओलांडला आणि तो हुआलागा नदीच्या किनारी आला तेथे त्याने बोटी बांधल्या. आणि तो प्रवाहाच्या दिशेने निघाला त्याने मारानो ही नदी शोधून काढली ओरेलाना ज्या नापो नदीत शिरला होता त्या नदीत त्याने प्रवेश केला आणि तेथून खाकी रंगाचे पाणी असलेल्या अॅमेझॉन नदीत त्याची नाव आली अॅमेझॉनच्या दाट जंगलात त्यांना जेव्हा सोने सापडेना तेव्हा त्याच्याबरोबरचे लोक खवळले व त्यातील एकाने उर्सुआचा खून केला आता अॅग्विरे हा त्यांचा नेता बनला हे सगळे बंडखोरच लोक होते सुवर्णभूमी सापडल्यानंतर तेथे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे मनसुबे त्याने आखले. अॅमेझॉनला मिळणाऱ्या एका नदीतून ते वर गेले अॅमेझॉनच्या विटकरी रंगाच्या पाण्यापेक्षा या नदीचे पाणी त्यांना काळे दिसले म्हणून त्या नदीचे नाव त्यांनी ‘ निग्रो ’ असे ठेवले वास्तविक ते पाणी जास्त स्वच्छ होते ! त्या नदीतून ते कासीक्वेरे या नदीत शिरले ती नदी उत्तरेकडे जात होती त्यातून ते ओरिनोको नदीच्या किनाऱ्याकडे आले हे सर्व लोक सोने शोधायला निघाले होते व

एकसारखे भाडत होते. त्यानी जर नीटपणे भौगोलिक माहिती गोळा केली असती तर तोच एक खजिना ठरला असता !

उर्सुआने लावलेल्या भौगोलिक शोधाना शेवटी अठराव्या शतकातल्या ॲलेक्झाडर व्हॉन हॅम्बोट या सशोधकाच्या प्रयत्नामुळे मान्यता मिळाली हा जर्मन संशोधक अतिशय उत्साही व कुशाग्र बुद्धीचा होता. स्पेनच्या राजाने त्याला बोलावून घेतले आणि दक्षिण अमेरिकेत कोठेही हिंडण्याचा मुक्त परवाना दिला. तो सन १८०० मध्ये ओरिनोको नदीच्या किनाऱ्याने सशोधनाला निघाला. तोपर्यंत किनाऱ्यावरच त्याने १६०० वनस्पतीचे नमुनें गोळा केले होते त्यातले ६०० नमुने अगदी नवे व पूर्वी माहिती नसलेले होते चिकाटीचा सशोधक असल्याने रात्री रडणाऱ्या माकडापासून ६ मीटर लाब अजगरापर्यंत त्याने सर्वांची तपशीलवार नोंद केली त्याच्या जथ्याने पोपट, पक्षी, माकडे आणि इतर प्राणी यांचे इतके नमुने जमा केले की त्याच्या बोटी म्हणजे तरते प्राणीसग्रहालयच झाले !

हुम्बोल्टने तेथील चुबकीय विलचन मोजले ताम्रवर्णीय जो भडक रंग युद्धप्रसगी लावीत त्या रगाचे रासायनिक निरीक्षण केले आणि आटोमाको ताम्रवर्णीय प्रत्येक वर्षीच्या प्रदीर्घ दुष्काळी काळात भूक भागवायला जो कद खात, त्याचेही नमुने गोळा केले त्याच्या जथ्याने माईप्युरेस रॅपिडस् या वेगवान प्रवाहात धाडसाने बोटी घातल्या आणि कासीक्वेरेच्या मार्गाने निग्रो नदीवरील सॅन कारलोस हे ब्राझीलमधील गाव गाठले सर्व प्रवासात प्रत्येक स्थळाचे अक्षाश रेखाश कसोशीने व सूक्ष्मतेने शोधून काढण्यात आले हॅम्बोल्टचे दक्षिण अमेरिकेतील हे प्रवास



संशोधक हॅम्बोल्ट

विज्ञानाच्या व भूगोलशास्त्राच्या इतिहासात चिरस्मरणीय झाले आहेत

ॲमेझॉनच्या संशोधनावरून हम्बोल्ट कार्टेजेनाकडे गेला आणि जिमेनेझ-द-क्लेसेडा ज्या मार्गाने बोगोटाला गेला होता त्याच मार्गाने हॅम्बोल्टने जायचे ठरविले. मात्र नकाशे काढण्याचे व नमुने गोळा करण्याचे काम कसोशीने चालू होते. तो जेव्हा जंगलाच्या हद्दीजवळ पोहोचला तेव्हा तेथील नानाप्रकारच्या वृक्षानी त्याचे लक्ष वेधून घेतले त्यातच चिंचोनाचे झाड होते. या झाडाच्या सालीपासून त्याने अर्क काढून पाहिला. त्या अर्कालाच आता 'क्विनाईन' असे नाव आहे मलेरियाच्या तापाविरुद्ध 'क्विनाईन' वरदानच ठरले !

पुन्हा जरा मागे जाऊ या ! सन १५९५ मध्ये सर वॉल्टर रॅले गियानाच्या किनाऱ्यावर आला होता. तेथे त्याला लढवय्या स्त्रिया व सोन्याची पूड लावणारा राजा याच्या बातम्या मिळाल्या अेल डोराडो किंवा सुवर्णभूमी गियानाच्या उंच पठारावर असावी असा त्यावेळी अदाज होता. रॅलेने या पठारावर इग्रजांचे राज्य स्थापण्याचे बेत केले होते. हे उच पठार अॅमेझॉनच्या उत्तरेला, ओरिनोको नदीच्या दक्षिणेला आणि ओरिनोको व अॅमेझॉन नद्या जेथे जोडल्या जातात त्या कॅसिक्वारेच्या पूर्वेला आहे– या पठाराची उची तीन हजार मीटर आहे. तेथील पर्वत घनदाट जगलाने भरलेले आहेत. या जंगलाचा सुरवातीला संशोधकांना अडथळा झाला तर स्थानिक ताम्रवर्णीयाना त्या जंगलाचे चागले संरक्षण मिळाले. इग्लडला दक्षिण अमेरिकेत पाय रोवायचाच होता. हे पठार किनाऱ्यापासून जवळ होते आणि तेथे स्पॅनिशाचा फारसा प्रभाव नव्हता. रॅलेने ओरिनोको नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर सशोधन केले आणि तेथून त्याने पठारावर 'मानोबा' हे अफवा मधील समृद्ध शहर शोधून काढण्यासाठी मोहीम काढली ती अशयस्वी झाली. पुढे त्याला पहिल्या जेम्सने कैद केले पण दक्षिण अमेरिकेत सपत्ती शोधून काढण्याच्या अटीवर त्याची सुटका झाली त्याने त्रिनिदाद बेटावर कब्जा केला पण त्याला स्पॅनिशानी तेथून हाकलून लावले.

हम्बोल्टसारख्या अनेक युरोपियन संशोधकानी संशोधन केले हे खरे पण दक्षिण अमेरिकेतीलही विद्वानांनी त्यात भर घातली बोगोटा येथील स्थानिक रहिवासी मुटूस याने वनस्पतीशास्त्रज्ञ म्हणून जागतिक कीर्ती मिळविली

पण हुम्बोल्टला शास्त्रीय ज्ञान मिळवणे एखाद्या खेळाच्या सामन्यासारखे वाटत असे. त्याने आपल्या सशोधन मोहिमामध्ये अनेक अचाट कृत्ये केली त्याने भूगर्भातील कोळशासारख्या खनिजाची ठिकाणे शोधून काढली सफरचदे व इतर फळाची झाडे जगली अवस्थेत रानात कोठे सापडतात ते शोधले कौका खोरे ओलाडून तो पौपायान येथे गेला तेथे प्युरेस येथील ज्वालामुखी-तून बाहेर पडणाऱ्या वायूचे पृथ.करण केले. नतर तो अल्टिप्लेनो पठारावर आला तेथील जमिनीची त्याने पाहणी केली. आणि जमिनीची धूप होऊ नये म्हणून योजायचे उपाय सागितले. शेवटी तो चिबोराझोचा २०५७७ फूट म्हणजेच ६२७२ मीटर उचीचा ज्वालामुखी पर्वत चढून गेला त्या वेळी दक्षिण अमेरिकेतील ज्ञात पर्वतातील तो सर्वात उच पर्वत होता. परतु अटकोमा ताम्रवर्णीय २२ हजार शभर फूट उचीच्या लुलायाको ज्वालामुखी पर्वतावर १५५० पूर्वीसुद्धा सहज चढून जात असत ! फक्त पाश्चिमात्यांना ते माहीत नव्हते इतकेच !

मात्र ॲमेझॉन खोऱ्याचे संशोधन हुम्बोल्टने फारसे केले नाही. ॲमेझान नदीतील मार्ग आता चागला माहीत झाला होता १५९८ मध्ये फॅन्सिस्कन मिशनरी क्विटो येथून निघून ॲमेझॉनच्या मुखाजवळच्या बेलेम ठाण्याजवळ ॲमेझॉन नदीतून आले होते त्यानतर लौकरच पेड्रो तेक्सेरिया बेलेम येथून निघून क्विटोपर्यंत गेला आणि तेथून पुन्हा त्याच मार्गाने बेलेमला परतला कोंडा-माईन हा फ्रेंच शास्त्रज्ञ फ्रेंच ॲकेडमीच्या वतीने क्वटो येथे सशो-धनासाठी आला होता. त्याला विषुववृत्ताजवळचा पृथ्वीचा परिघ मोजावयाचा होता पृथ्वी ही पूर्ण गोल आहे की विषुववृत्ताजवळ

जराशी फुगीर आहे हे निश्चितपणे ठरवण्याचा प्रश्न त्या वेळच्या शास्त्रज्ञांच्या पुढे होता व त्यासाठी निरीक्षण घ्यायला ला-कोंडा-माईन आला होता. त्या निरीक्षणाबरोबरच त्याने तेथे सापडलेल्या रबराच्या झाडापासून निघालेल्या चिकाचे दाणे युरोपला पाठवले. युरोपला रबराचा झालेला हा पहिलाच परिचय[1] ला-कोंडा-माईनने १७३१ मध्ये ॲमेझॉन नदीतून प्रवास केला. त्याच्या प्रवासामुळेच ॲमेझॉन नदीची युरोपियनाना चागली माहिती झाली येथून पुढच्या काळात दक्षिण अमेरिकेत प्रवाशाचे पेवच फुटले त्या काळच्या प्रकाशकानी अनेकाची प्रवासवर्णने कादबरी-सारखी खपविली यापैकी मादाम देस ओडोनेस हिचे प्रवासवर्णन खूपच रोमहर्षक आहे. एका होडीतून तिने ॲमेझॉनचा प्रवास केला व तिची उपासमार झाली. मासे खाऊन ती कशीबशी जगली. ॲमेझॉन प्रदेशाचे सशोधन अनेकानी वैयक्तिक कीर्तीसाठी किंवा धार्मिक कारणासाठी केले. पण केवळ शास्त्रीय दृष्टीकोन बाळगूनही सशोधन करणारे काहीजण होते.

ऑस्ट्रियाची डचेस लिओपोल्डिना हिचा विवाह पोर्तुगालचा राजपुत्र असलेला ब्राझीलचा सम्राट याच्याबरोबर झाला त्यामुळे ऑस्ट्रेलियातील अनेक सशोधक ब्राझीलला आले. व्हॉन मॉरशस आणि व्हॉन स्पिक्स हे दोन वनस्पतीशास्त्रज्ञ सर्वत्र भटकले आणि ब्राझीलमधील वनस्पतीजीवनासबधी माहिती देणारे चाळीस खड प्रसिद्ध केले स्पिक्स १८२७ मध्ये मृत्यू पावला तोपर्यंत ३२७६७ प्रकारच्या वनस्पतींची माहिती गोळा झाली होती व्हॉन मॉरशस पुढे आणखी खूप वर्षे जगला आणि स्थानिक रहिवाशासबधी त्याने प्रचड माहिती गोळा केली

अल्फेड वालेस, हेन्री बेटस् आणि रिचर्ड स्प्रूस हे तिघे इग्रज

शास्त्रज्ञ बेलेम येथे १८४८ मध्ये पोहोचले. तेथे पोहोचण्यापूर्वी ॲमेझानबद्दलची सर्व माहिती त्यांनी वाचली होती बेलेम सोडण्या-पूर्वीच त्यांनी तेथे सापडलेल्या ७०० कीटकांची वर्गवारी निश्चित केली वॉलेस तेथून निग्रो नदीकडे गेला आणि ब्रिटिश म्युझियम व हौशी संग्राहक यानी मागणी नोंदवलेल्या कीटकाचे नमुने त्याने गोळा केले बेटस्‌ने ॲमेझान नदीकडील मुखाचे संशोधन केले बेटस्‌ला भूगोलापेक्षा प्राणीशास्त्रात जास्त रस होता त्याच्या दृष्टीने ॲमेझॉन म्हणजे विविध प्रकारच्या जिवत प्राण्याचे आश्चर्यकारक जग होते तो या अमेझॉन नदीच्या किनारी ११ वर्षे राहिला प्रकृती खराब होईपर्यंत त्याने काम केले ॲमेझानच्या मुखाकडील प्रदेशामधील वनस्पती व प्राणीजीवनाचे असख्य तपशील त्याने जमवले या त्याच्या अखड परिश्रमातून ॲमेझान नदीवरील निसर्गशास्त्रज्ञ 'The Naturalist on the River Amazon' हा प्रचड ग्रथराज निर्माण झाला या कालातील त्याच्या दैनदिन्यामध्ये तेथील हजारो कीटक, फुलपाखरे याची चित्रे त्याने जलरगात काढली आहेत. त्याकाळी माहिती नसलेल्या कीटकांच्या ८००० जाती त्याने नोंदवल्या !

सन १८६७ मध्ये लुईस आगासीझ या स्वित्स्झर्लंडमधील शास्त्रज्ञाने 'रिओ-द-जानेरिओ' नदीकिनारी असलेल्या पर्वताकडे त्याने संशोधन मोहीम काढली तो भूगर्भशास्त्रज्ञ होता. पूर्वीच्या हिमयुगाचे पुरावे त्याने शोधून काढले. सम्राटाने दिलेल्या मदती-मुळे त्याला ॲमेझॉन नदीत सर्वत्र आरामात फिरता आले तेथे त्याने तोपर्यंत माहिती नसलेल्या माशाच्या १८०० नव्या जाती शोधून काढल्या.

स्थानिक ताम्रवर्णीय व युरोपियन यांचे संबध अनेक ठिकाणी

आले व भीषण युद्धापासून एकनिष्ठ मैत्रीपर्यंत अनेक प्रकार या संबधात आढळून आले. स्पॅनिशानी करीब हा शब्द विरोध करणाऱ्या सर्व जमातींना वापरला आणि मैत्री करणाऱ्या जमातीं-साठी आरावाक हा शब्द प्रचारात आला. कारण या नावाच्या दोन जमातीचे शत्रुत्व व मित्रता हे विशेष पूर्वी अनुभवाला आले होते आजही हे शब्द प्रचारात आहेत. गियानाच्या किनार-पट्टीवर प्रथम डचानी व नतर इग्रजानी व फ्रेंचांनी स्वामित्व प्रस्थापित केले. लवकरच किनारपट्टीवर बरीच दाट लोकसख्या झाली तरीही अतर्भागात फारसे कुणी गेले नव्हते. तेथील स्थानिक ताम्रवर्णीयांशी व्यापार मात्र चालू झाला झाला होता शेवटी अठराव्या शतकातच शास्त्रीय शिक्षण घेतलेले सशोधक अतर्भागात शिरले ज्युलेस क्रेवूझ हा फ्रेंच डॉक्टर मोरोनी नदीतून उगमाकडे सशोधनासाठी गेला. ही मोरोनी नदी सुरिनाम (डच गियाना) आणि कायेने (फ्रेच गियाना) यामधून वाहते तेथून जाऊन त्याने टुमुकुमाक्वे पर्वतश्रेणी शोधून काढली. नंतर तो ब्राझील व कायेनेच्या हद्दीवरील ओपोक या गावी गेला आणि तेथे पारु नदी ओलाडून तो ॲमेझॉन नदीतून बाहेर पडला.

विज्ञानाच्या इतिहासात चार्लस डार्विनने १८३२ मध्ये केलेली दक्षिण अमेरिकेची सफर प्रसिद्ध आहे बिगल या जहाजातून डार्विनने हा प्रवास केला त्याने दक्षिण अमेरिकेतील अनेक वन्य जमातीचा अभ्यास केला मानवी उत्क्रातीच्या अगदी खालच्या पायरीवर असलेला वन्य माणूस त्याने पाहिला टेराडेल्फयुगो येथे त्याला जी वन्य माणसे भेटली ती लोकरी कातडयातील जना-वरेच होती ! बर्फाचे वादळ होत असताना मुलाला पाजणारी एक स्त्री त्याने पाहिली. त्या दोघाच्या अगावर कपडा नव्हता

ज्याना चार-पाच शब्दापलिकडे बोलता येत नव्हते अशी जमातच्या जमात त्याला आढळली. सस्तन प्राण्याचे जीवावशेष त्याला आढळले या निरीक्षणावरूनच प्राण्याची जीवनावस्था स्थिरपद नसते, त्यात बदल होतो हे त्याला समजले येथील निरिक्षणाच्या आधारावरच त्याने आपले जगप्रसिद्ध पुस्तक ' ओरिजिन ऑफ स्पेसिज ' लिहिले आहे

आता दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भागाकडे वळू इच, नाविक व्हॉन साचेन याने खडाचे दक्षिण टोक केप हॉर्न याला सन १६१६ मध्ये वळसा घातला. व खडाचे खरे दक्षिण टोक शोधून काढले दक्षिण टोकाची चिलीची बाजू म्हणजेच पॅसिफिक महासागराकडची किनारपट्टी खूपच काळपर्यंत अज्ञात राहिली होती कारण तेथील शूर लढवय्ये अरुकान ताम्रवर्णीय युरोपियनाना प्रवेशच करू देत नव्हते त्याच्यावर विजय मिळवून या किनारपट्टीची युरोपियनांना माहिती व्हायला १८७७ साल उजाडावे लागले दक्षिण टोकाच्या अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर 'पॅटागोनिया ' हा प्रदेश आहे तो वैराण व उजाड आहे. काही मधल्या खोऱ्यामध्येच गवताची कुरणे आहेत त्यामुळे या प्रदेशाचे वसाहत करण्यासाठी आकर्षण लोकाना वाटले नाही. तेथील किनाऱ्यावर दुर्गम कडेकपारी आहेत आणि प्रचड लाटा किनाऱ्यावर आपटतात. येथील ताम्रवर्णीयानी युरोपियनाना आत शिरकाव करू दिला नाही. सन १८७७ मध्ये त्यांचा पराभव केल्यानतरच युरोपियन लोक वसाहतीसाठी आत घुसू शकले. त्यांचा पराभव होण्यापूर्वी च्यावर्थ मस्टर्स याने या ताम्रवर्णीय जमातीत प्रवास केला होता. आणि त्याच्या चालीरितींची नोंद केली होती त्यानतर इग्लडमधील मेंढपाळ इकडे आले आणि

त्यानी या प्रदेशात वसाहत स्थापन केली त्याचीच या प्रदेशात आज प्रमुख वस्ती असून तेथे वेल्स परगण्यातील इग्रजी भाषा हीच कामकाजाची भाषा आहे. या पेन्टागोनिया प्रदेशात अलीकडे खनिजतेल सापडल्यामुळे हा विभाग महत्त्वाचा बनला आहे.

दक्षिण अमेरिकेतील अनेक ताम्रवर्णीय जमाती झुझार प्रवृत्तीच्या होत्या. आणि तेथे येणारे युरोपियन हे बोलून चालून राज्य करायला आलेले दुसऱ्यासाठी कष्ट करण्याची या दोघापैकी कोणाचीच तयारी नव्हती. म्हणून लवकरच सर्वत्र दक्षिण अमेरिकेत मजूराचा तुटवडा जाणवू लागला स्पॅनिश राज्यकर्त्यांनी ताम्रवर्णीयांना गुलाम बनविण्याला परवानगी दिली होती. पण ताम्रवर्णीय गुलाम म्हणून कुचकामाचे होते ते काम करत नसत. राज्यपाल लॉस कॅसास याने ताम्रवर्णीय गुलामाऐवजी निग्रो गुलाम वापरावेत असा आग्रह धरला होता स्पॅनिश वसाहतीत ते चोरटचा मार्गाने येत होतेच जॉन हॉकिन्स या इग्रजाने सन १५६२ मध्ये हैती बेटावर प्रथम निग्रो गुलाम विकले. त्यानंतर हा व्यापार वाढत जाऊन सन १७१३ मध्ये इंग्लडला स्पेनकडून गुलाम विक्रीची सनद मिळाली आणि दक्षिण अमेरिकेत इग्लडकडे गुलामविक्रीची मक्तेदारी आली लवकरच पनामा, व्हेनुझुएला आणि कोलबिया येथील लोकसंख्येत निग्रो प्रमुख घटक बनले.

ब्राझीलमध्ये किनारपट्टीचा प्रदेश सुपीक होता व जवळच्या उंच डोंगरापलीकडे घनदाट जगले होती युरोपियनानी सर्व ताम्रवर्णीयाना त्या दुर्गम अरण्यात माघार घ्यायला लावली कष्टाची कामे करायला निग्रो गुलाम हवे होतेच. ब्राझीलमध्ये एकदर ८० लाख जिवत गुलामाची विक्री झाली असावी असा अदाज आहे. या निग्रो गुलामानी आपल्याबरोबर आपली स्थानिक दैवतेही

आणली त्या दैवताचे कलम ब्राझीलमधील कॅथॉलिक पंथावर करण्यात आले आहे व त्या दैवतांना ब्राझीलमधल्या कॅथॉलिक धर्मात महत्त्वाचे स्थान आहे.

सन १६९३ मध्ये ब्राझीलच्या अतभागातील पठारावर पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्याच्या उगमाजवळील प्रदेशात सोने सापडले नद्याची वाळू धुऊन ते मिळवता येत असे. ही बातमी वणव्यासारखी पसरली आणि पूर्वी दुर्गम वाटणारा घाट ओलाडून शेकडो लोक या प्रदेशात जमा झाले. ते लोक सॅवो फ्रॉन्सिस्को किंवा पेरनामबुको या नद्यांतून वर आले किंवा बाहिया आणि रिओ-द-जानेरिओ येथील पर्वत चढून आले या प्रदेशातील ताम्रवर्णीयानी या लोंढयाला विरोध केल्यामुळे त्यातील अनेकजण उत्तरेकडे वळले तेथे त्याचे नशीब आणखीनच उघडले आणि त्याना तेथे हिरे सापडले ! १७३० मध्ये डायमडटिना हे शहरच तयार झाले आणि या उत्तरेकडील प्रदेशाचा स्वतत्र प्रात तयार झाला लवकरच तेथे सर्व प्रकारची रत्ने सापडू लागली. आरोप्रेटो हे गाव वाढून त्याची लोकसंख्या एक लाख झाली. या नव्या गावातील चर्चच्या वीस देखण्या इमारतींवरून तेथील वैभवाची कल्पना येऊ लागली. आजही उत्तरेकडच्या या मिनासगेरीयास प्रातात, माटोग्रासो येथे पाराच्या आसपास, सोने व रत्ने सापडतात आजही हजारो छोटे छोटे खाणकाम करणारे रत्ने व सोने खणून काढतात आणि सॅन्टेरेम येथे आणून विकतात.

दक्षिण अमेरिकेचा केंद्रबिंदू १५ अश दक्षिण अक्षाश आणि ५५ अंश श्चिम रेखाश असलेल्या ब्राझीलच्या गोयास प्रातात आहे तिथला विकास अजून फारसा झाला नाही. तिथले हवामानही उष्ण आहे या केन्द्रबिंदूच्या दक्षिणेला अॅन्डीज पर्वतातील

बर्फ वितळते तेव्हा पूर येऊन सर्व जमीन पाण्याने भरते. उत्तरेला घनदाट अरण्य आहे. मधले उच पठार झुडपाळ व कोरडे आहे या पठाराच्या काठापर्यंत पूर्वी समुद्रकिनारा होता असा पुरावा मिळाला आहे पपासचे मैदान म्हणजे पूर्वीचा उथळ समुद्र असून पराग्वे आणि पराना नदीच्या साठलेल्या गाळांमुळे ते मैदान तयार झाले असावे असा तर्क आहे. दतकथेतील अटलांटिस शहर येथेच जवळपास होते असेही काहीजण बोलतात. प्लेट नदीकडून जेसूईट आणि सावोपावलो येथील वसाहतवाले या उंच पठारावर प्रथम आले पराग्वे नदीचा उगम आणि उत्तरेकडे वाहणाऱ्या गुआपोरे या ॲमेझॉनच्या उपनदीचा उगम अगदी एकमेकाजवळ आहे असे त्याना आढळले.

या भागात दतकथेतील अटलांटिस शहर सापडण्याची शक्यता आहे या अफवेवर विश्वास ठेवून कर्नल फॉसेट हा इग्रज सशोधक मध्य दक्षिण अमेरिकेत आला आणि त्याने एकर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात बरेच सशोधन केले. १९२५ मध्ये तो कुईबा या नदीच्या काठी त्याच नावाच्या गावी आला. तेथील लोकांनी त्याच्या कल्पनेला खाद्य पुरविले त्याच्या मते शिनगू आणि आरागुईया या नद्याच्या मधल्या भागात अटलांटिस शहर असावे या दोन्ही नद्या ॲमेझॉनला मिळतात. त्याने हे उच पठार ओलांडले आणि तो ॲमेझॉन खोऱ्याच्या टोकावर बकेरी येथे



कर्नल फॉसेट

पोचला. त्या भागात अजूनही नरभक्षक टोळचा राहत असाव्यात असा सशय होता आपल्या शेवटच्या दैनंदिनीच्या पानावर त्याने लिहिले होते–‘ अपयश येण्याची भीती बाळगायचे कारण नाही ’ त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणापासून शिनगू नदी ९६ किलोमीटर अंतरावर असावी त्यानतर कर्नल फॉसेटचा ठावठिकाणा लागला नाही स्थानिक टोळयांनी एका गोऱ्या इसमाला कैदी म्हणून पकडल्याच्या बातम्या नतर काही दिवस आल्या त्याच्या शोधासाठी अनेक मोहीमा पाठविण्यात आल्या. त्याचा शेवट कसा झाला याचे गुढ अद्यापही राहिले आहे

रबराच्या झाडाच्या चिकाचा शोध पूर्वीच लागला होता. एक स्थितीस्थापक मजेदार पदार्थ यापेक्षा त्याचा उपयोग माहीत नव्हता. सन १८४० मध्ये चार्लस गुडियरने रासायनिक प्रक्रिया करून टणक व कठीण रबर या चिकापासून मिळविले ताबडतोब रबराचा औद्योगिक उपयोग सुरू झाला व महत्त्व वाढले. पण रबराचे झाड–‘ हेवेआ ब्राझीलयनीस ’–फक्त ॲमेझानच्या जगलात सापडत होते ॲमेझानला व ब्राझीलला औद्योगिक जगात महत्व मिळाले १८६६ मध्ये ॲमेझान नदी आतरराष्ट्रीय नौकानयनासाठी खुली करण्यात आली मानाऊस हे शहर परिकथेत वर्णन करतात त्याप्रमाणे एका रात्रीत बांधण्यात आले. लवकरच त्या शहरात ऑपेरा हाऊस, ट्रॅम आणि गॅसचे दिवे आले रबराला मागणी अमाप होती. आणि पुरवठयाच्या बाबतीत ब्राझीलची मक्तेदारी होती रबराच्या तेजीच्या काळात अनेकानी अफाट ऐश्वर्य कमावले व गमावलेही रबराचा चीक मिळविण्यासाठी जी जीवघेणी चढाओढ सुरू झाली त्यातून नवीनच प्रकारची गुलामगिरी निर्माण झाली एखादा व्यापारी एक जगलपट्टी

भाड्याने घेई आणि मजूराना आधीच रक्कम देऊन या जगल-पट्ट्यात नेण्यात येई त्यानी कितीही रबराचा चीक गोळा करून आणला तरी त्याने घेतलेली उचल फिटत नसे. मालकाचे कर्ज त्याच्या डोक्यावर कायमच राहत असे. तो पळून जाऊ लागला तर त्याच्यावर गोळी चालविण्यात येत असे ! आणि समजा त्यातून वाचलाच तर त्याला वेड लागण्याची पाळी येत असे.

रबराच्या तेजीच्या व्यापारामुळे ब्राझीलमधील सशोधनाचे व विकासाचे पाऊल पुढे पडले. १९०२ साली एकर या नावाच्या प्रदेशात आणि बोलिव्हिया आणि ब्राझील यांच्या सरहद्दीजवळ रबराच्या झाडाचा एक विशाल जगलपट्टा असल्याचा शोध लागला त्या पट्ट्यावर ब्राझील व बोलिव्हिया या दोन्ही देशानी हक्क सागितला. दोन्ही देशाच्या चकमकी उडाल्या. आणि त्यात ब्राझीलचा जय झाला शेवटी तह झाला त्यात ब्राझीलने बोलिव्हियाला अटलाटिक महासागराकडचा मार्ग खुला करून देण्याचे मान्य केले मामोरे नदीतील धबधबा टाळण्यासाठी बोलिव्हियाला उपयोगी पडेल अशी रेल्वेही बाधून द्यायचीही कबूल केले. लढाईत व रेल्वे बाधणीत पुष्कळच लोक मेले रूळाखालच्या प्रत्येक लाकडी ठोकळ्यामागे एक मनुष्य मेला— असा हिशेब एकाने केला ! ज्या दिवशी या मार्गावर पहिली गाडी धावली त्याच दिवशी रबराचा बाजार कोसळून तेजी सपली !

एका इग्रजी शाळा मास्तरने ब्राझीलला हा फटका दिला सान्टेरेम येथे हेन्री विकहॅम हा शिक्षक म्हणून काम करत होता त्याने रबराच्या झाडाच्या बिया लंडनला पाठविल्या तेथून त्या मलायाला नेण्यात आल्या व त्याची काळजीपूर्वक लागवड करण्यात आली. तेथील हवामान अनुकूल होतेच. तेथे निगा

घेतल्यामुळे रबराच्या झाडापासून फार मोठ्या प्रमाणात रबर मिळाले आणि तेही खूप स्वस्त ! ब्राझीलमध्ये जगलात आपोआप वाढलेल्या झाडापासूनच रबर मिळवत असत जंगल अमर्याद होते तेव्हा मुद्दाम लागवड कोण करतो ? मलायामधील स्वस्त रबरांमुळे ब्राझीलमधील रबर मिळविण्याचा उद्योग एकाएकी कोसळला आणि नष्ट झाला अनेकाच्या नशीबाची उलथापालथ होऊन गेली.

ब्राझीलमध्ये ताम्रवर्णीयांवर होणारे अत्याचार व जुलूम थाबवण्याचा प्रयत्न जनरल बॉन्डन याने केला त्याने अमेझान व माटोग्रासो येथील विस्तीर्ण अरण्याचा शोध केला. त्यातून रस्ते पाडले आणि टेलिग्राफची तार टाकली. ताम्रवर्णीयाना सरक्षण देण्यासाठी त्याने नियमावली तयार केली. पण त्याच्या मृत्यूनतर त्याची तत्वे बाजूला सारली गेली. आणि अगदी अलीकडे ताम्र-वर्णीयावरील अनेक जुलूम आणि काही वेळा सपूर्ण जमातीची कत्तल केल्याची अनेक कृत्ये १९६८ मध्ये नुकतीच उजेडात आली आहेत

आता दक्षिण अमेरिका सपूर्णपणे सशोधला गेला आहे. तरी सुद्धा काही अतीदूरची ठिकाणे अज्ञात आहेत. ॲमेझानचे खोरे जगातील सर्वात मोठ्या अज्ञात प्रदेशात मोडते.

□

प्रकरण आठवे

## स्वातंत्र्य, विकास व सामाजिक स्थैर्य

दक्षिण अमेरिका खंडाचे आता अचूक मोजमाप झाले आहे. या खंडाचे क्षेत्रफळ ६५ लक्ष चौरसमैलापेक्षा जास्त म्हणजेच १ कोटी ७० लक्ष चौरस किलोमीटरपेक्षा जास्त किंवा स्पेनच्या क्षेत्रफळाच्या ३४ पट जास्त हे क्षेत्र आहे स्पॅनिश किंवा पोर्तुगीज राज्यकर्ते या विशाल प्रदेशाचा राज्यकारभार आपल्या देशाच्या प्रांताप्रमाणे राज्यपाल किंवा राज्यप्रतिनिधी नेमून चालवू इच्छित होते नवीन भूमीत वसाहतीला गेलेले लोक रक्ताने त्याच्या नात्याचे असले तरी नवीन भूमीत त्यानी आपली मुळे रुजवली होती आणि तेथील नव्या वातावरणाशी व निसर्गाशी त्यानी जमवून घेतले होते त्यांची ही निर्माण झालेली अस्मिता व अस्तित्व स्पॅनिश राज्यकर्त्यांना समजू शकले नाही. नव्या वसाहतवाल्याना राज्यकारभारात भाग हवा होता स्पेन व पोर्तुगालमधील राज्यकर्त्यांचा व त्याना संघर्ष होणे अपरिहार्य होते. १८१० पासून १८२५ पर्यंत असे लहानमोठे संघर्ष उडाले. आणि या कालावधीत संपूर्ण दक्षिण अमेरिका स्पेनच्या व पोर्तुगालच्या वर्चस्वातून मुक्त झाली. स्पेनच्या अधिपत्याखालच्या प्रत्येक प्रांतात व प्रदेशात स्पेनने नेमलेल्या अधिकाऱ्याविरुद्ध बंडेही झाली. ब्राझीलच्या प्रांतातही उठाव

झाला आरुकान ताम्रवर्णीय युरोपियन आक्रमणाविरुद्ध चिलीमध्ये दोन शतके लढले. ताम्रवर्णीयांच्या इन्का जमातीच्या लोकांनी बडे केली पण ती दडपण्यात आली म्हणजे दक्षिण अमेरिका जी स्वतंत्र झाली ती युरोपियन वसाहतवाल्याच्या दृष्टीने ताम्रवर्णीय वसाहतवाल्यांचे अंकितच राहिले ! नेपोलियनची स्पेनवर स्वारी, युरोपातील उदारमतवादी चळवळ आणि फ्रेंच राजक्रांती यामुळे हा बदल घडणे सोपे झाले येथील बुद्धिमान व जमीनदार वर्ग जागृत झाला. आपल्या मायभूमीतील शासनाविरुद्ध त्यांनी उभारलेल्या बंडांना इंग्लंडने संपूर्ण पाठिंबा दिला व मदत केली. त्यामुळे पुढे बराचसा व्यापार इंग्लंडच्या हाती गेला व इंग्लंडचा फायदा झाला या सगळ्या झगड्यामधून दक्षिण अमेरिकेच्या अकरा सार्वभौम राष्ट्रांचा उदय झाला. या राष्ट्रांच्या सरहद्दी स्पेनच्या राज्यपालांच्या व्यवहारातून आणि स्पेन व पोर्तुगालच्या ऐतिहासिक संबंधातून निर्माण झाल्या आहेत. काही सरहद्दींसाठी युद्धेही झाली तर काही सरहद्दी वाटाघाटीने ठरल्या. तेव्हापासून दक्षिण अमेरिका हे एक आशियासारखे भौगोलिक नाव होऊन बसले या अकरा राष्ट्रांच्या विकासाचा धावता इतिहास आपल्याला क्रमाने पहावयाचा आहे.

## द. अमेरिकेतील ११ राष्ट्रे

### अर्जेन्टिना

अर्जेन्टिनामध्ये सध्या ९८ टक्के लोकसंख्या युरोपियनांची आहे त्यातले निम्मे इटालियन आहेत. येथील ताम्रवर्णीय जवळजवळ नष्ट झाले आहेत किंवा जंगलात वस्तीला गेले आहेत.

ब्युनोस-आयर्स हे राजधानीचे शहर दक्षिण गोलार्धातील सर्वात मोठे आहे ते दक्षिण अमेरिकेतील मिलॉन आहे असे इटालिया-नांना वाटते ते प्रशस्त, सुंदर व वैभवशाली शहर आहे. १७७६ पर्यंत अर्जेन्टिना स्पेनच्या अधिपत्याखाली पेरु प्रांताचा एक जिल्हा होते त्यामुळे सर्व व्यापार उलटचा मार्गाने, लिमा शहराद्वारा करावा लागे १७७६ मध्ये येथे स्वतंत्र व्हॉईसरॉय नेमण्यात आला तेव्हापासून अर्जेन्टिनाला अटलांटिक महासागरातून व्यापार करता येऊ लागला त्यावेळी ब्यूनोस आयर्स हे गाव लहान होते सभोवती पसरलेले पपासचे मैदान थोडचाशा जमीनदाराच्या मालकीचे होते आणि फक्त कुरण म्हणून वापरले जात असे १८०५ मध्ये नेपोलियनने स्पेनवर हल्ला केल्याचा सूड उगविण्या-साठी इंग्लडने या शहरावर हल्ला करून ते काही महिने ताब्यात ठेवले होते या घटनेमुळे स्पेन आपले रक्षण करू शकत नाही, हे तेथील वसाहतवाल्यांना कळले. त्याचा आत्मविश्वास जागृत झाला सन १८१० मध्ये ब्यूनोस-आयर्सच्या नगरपालिकेने व्हॉइस-रॉयला स्थानभ्रष्ट केले व राज्यसूत्रे आपल्या हातात घेतली त्या-वेळी स्पेनचा राजा फ्रेंचाच्या कैदेत होता सन १८१६ साली स्पॅनिश आरमाराने ब्युनोस-आयर्सची नाकेबंदी केली तेव्हा स्पेनचे पेरु येथील सैन्य आक्रमणाच्या तयारीत होते त्यावेळी तुकामॉन येथे कॉंग्रेस भरविण्यात आली आणि जुलैमध्ये स्वातंत्र्य जाहीर करण्यात आले

त्याचा हा प्रयत्न स्पेनच्या सैन्याने दडपला असता पण जनरल जोसे-द–सॅनमॅर्टिन याने सैन्य उभारले ॲन्डीज पर्वत ओलांडून तो चिलीत देशात उतरला तेथील स्वातंत्र्यसंग्रामाला त्याने मदत केली आणि जहाजातून उत्तरेकडे जाऊन स्पॅनिश लष्कराचे केन्द्र

असलेल्या लिमा शहरावर हल्ला केला. या धाडसी कृत्यामुळे अर्जे-न्टिनाचे स्वातंत्र्य कायम झाले

स्वातंत्र्यानंतर अर्जेन्टिनात पक्षोपक्षाची एकच गडबड माजली. एकच मध्यवर्ती सरकार असावे का वेगवेगळ्या प्रान्ताना स्थानिक सरकारे असावीत याबाबत खूपच मतभेद माजले त्यामुळे तेथील शासनसंस्था अत्यंत निर्बल राहिली. १८५९ मध्ये घटना दुरुस्त करण्यात आली आणि राजधानी पराना नदीच्या किनाऱ्याकडे नेण्यात आली मध्यंतरी आर्थिक क्रान्तीची सुरुवात झाली होती. पपास मैदानामधील भटक्या ताम्रवर्णीयाना हुसकून लावण्यात आले या मैदानात आता शेतकरी शेती करू लागले त्या-मुळे जमिनीचे उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढले शेतीला रानटी गुराचा फार त्रास होत असे काटेरी तारांची कुंपणे घालून तो थांबविण्यात आला सुधारलेली शेतकी अवजारे व बी-बियाणे या-मुळे शेती भरभराटीस आली व ब्युनोस-आयर्स हे शहर व बंदर वाढू लागले

१८५१ मध्ये इंग्लंडमधील उतारू वाहतूक कंपन्या ब्यूनोस-आयर्स बंदर नियमितपणे घेऊ लागल्या पपासच्या मैदानात गाळाच्या जमिनीमुळे रस्ते तयार करणे कठीण काम होते. पण रेल्वेलाईन बांधणे फार सोपे होते लवकरच ब्रिटिश भांडवलाच्या साह्याने रेल्वेचे जाळे बांधण्यात आले १८८३ पर्यंत ताम्रवर्णीय जमातींचा समूळ उच्छेद करण्यात आला दक्षिणेकडे डोंगराळ प्रदेशात पॅन्टागोनियाच्या सरहद्दीपर्यंत शेतवाड्या पसरल्या. हजारो इंग्रज मेंढपाळ मेंढ्या पाळण्यासाठी दक्षिणेकडच्या डोंगराळ भागात येऊन राहिले जमीन अगदी स्वस्त होती व जमिनीचे प्रचंड तुकडे ताबडतोब मिळत असत. १८७७ पासून गोठवलेल्या

गोमांसाची निर्यात इंग्लंडला होऊ लागली शुद्ध वंशाची जनावरे आणून व संकर करून गाई, बैलांची व मेंढ्यांची प्रत सुधारण्यात आली. नवीन व चांगल्या गवताच्या जाती आणून त्याची लागवड करण्यात आली त्यामुळे गवताची पैदास वाढली. गोपालन फायदेशीर होऊ लागले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत अर्जेन्टिना दक्षिण अमेरिकेतील सर्वांत जास्त पुढारलेला व सर्वांत जास्त श्रीमंत देश बनला होता अर्जेन्टिनाची राजधानी ब्यूनोस आयर्सला दक्षिण गोलार्धात तोड नव्हती या शहरातील कित्येक लोक खूपच श्रीमंत बनले होते. पण अजूनही हा शेतकीप्रधान देश होता. तेथे कोणताच उद्योगधंदा नव्हता अर्जेन्टिनाची अर्थव्यवस्था ब्रिटिशांच्या ताब्यात होती तेथील संस्कृतीवर फ्रेंचांची छाप होती तर लष्करीपद्धत व परंपरा जर्मनांच्या होत्या. सर्व युरोपातून स्थानिक होण्यासाठी लोकांचे लोंढे सतत येत होते.

जून १९४३ मध्ये या देशात क्रांती झाली. ज्युआॅन पेरॉन याने सत्ता बळकावली १९४६ पासून १९५५ पर्यंत त्याने हुकुमशहा बनून राज्य केले. त्याने लोकांना प्रत्यक्षात न येणारी भव्य आश्वासने दिली. स्वतःची वैयक्तिक संपत्ती गोळा केली. आणि देश दिवाळखोर झाला तरी त्याने मजूरवर्गाला समाजव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान मिळवून दिले त्याने उद्योगधंदे सुरू केले आणि परकीय भांडवलावर चालणाऱ्या टेलिफोन, रेल्वे यासारख्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले. अलिकडेच पेरॉंची दुसरी पत्नी अध्यक्ष झाली होती पण लष्कराने तिच्याविरुद्ध क्रांती केली आणि तिला देशातून हद्दपार केले. सध्या तेथे लष्करी राजवट चालू आहे.

अर्जेन्टिनाचे क्षेत्रफळ ४०२७०२४ चौं. कि. मी.
लोकसख्या (१९७०) २३३६४४३१
भाषा स्पॅनिश
धर्म . ख्रिश्चन
राजधानी ब्युनोस आयर्स (५१ लाख)

## युरुग्वे

ब्राझीलची दक्षिण बाजू व युरुग्वे यांची भौगोलिक रचना अगदी एकसारखी आहे १६८० मध्ये पोर्तुगीजांनी दक्षिण अमेरिकेचा सर्व उत्तर किनारा प्लेट नदीपर्यंत व्यापला होता. पण त्यात स्पॅनिशानी अनेक खिंडारेही पाडली.

युरुग्वेची राजधानी मॉंटेव्हिडो पोर्तुगीजानी आखली होती. पण तिचे बाधकाम स्पॅनिशानी केले. स्पॅनिशानी पोर्तुगीजांना येथून १७२५ मध्ये हुसकावून लावले १८०८ मध्ये जेव्हा ब्यूनोस आयर्सने स्वातंत्र्याची घोषणा केली, त्याच वेळी मॉंटेव्हिडो येथील वसाहतवाल्यांनी स्वातंत्र्य घोषित केले पुढची १९ वर्षे ब्राझील व अर्जेटिना हे दोन देश युरुग्वेचा ताबा घेऊ पाहात होते. शेवटी इंग्लडच्या मदतीने त्या दोन्ही राष्ट्रांनी युरुग्वेचे स्वातंत्र्य मान्य केले युरुग्वेने आपले स्वातंत्र्य ऑगस्ट १८२८ मध्ये जाहीर केले पण लागलीच तेथील दोन पक्षात यादवी युद्ध सुरू झाले व गोंधळ माजला. ब्लॅंको आणि कोलोराडो असे दोन पक्ष तेव्हापासून आजपर्यंत तेथे अस्तित्वात आहेत. ब्राझीलच्या पाठिंब्याने कोलोराडो पक्षाने १९५८ पर्यंत ९३ वर्षे राज्य केले.

युरुग्वेची सामाजिक सुरक्षा पद्धत अत्यंत पुढारलेली व आदर्श

म्हणून प्रसिद्ध आहे. उदाहरणार्थ कोणत्याही नोकराला ५५ व्या वर्षी निवृत्त होता येते व त्यावेळी असलेला सर्व पगार त्याला निवृत्तीवेतन म्हणून मिळतो. परतु या सोयींचा गैरफायदाच फार घेण्यात आला. त्या नियमाची अमलबजावणीही चागली होत नाही

हा तसा पुढारलेला देश आहे दक्षिण अमेरिकेत घटस्फोट कायदेशीर करणारे हे पहिले राष्ट्र । अनौरस मुलाना तेथे वारसा मिळतो येथील साक्षरतेचे प्रमाण सर्व दक्षिण अमेरिकेत जास्त आहे हा देश लष्करावर फार कमी खर्च करतो अजूनही या देशात भरपूर जमीन उलब्ध आहे व लोकसख्या त्या मानाने वाढलेली नाही काही जमीनदाराकडे फार मोठी जमीन असली तरी एकदर समाज मध्यमवर्गीय आहे
येथील हवामान सौम्य आहे व अति थडी किंवा जास्त उष्मा याचा अनुभव येथे येत नाही या प्रदेशात थोडीफार जगले आहेत व बहुतेक जमीन कुरणाची व शेतीस उपयोगी आहे आपली गरज भागल्यानंतर जादा कष्ट उगीच का करायचे अशी येथील लोकाची धारणा आहे त्यामुळे आजच्या चढाओढीच्या जगात हा देश आर्थिकदृष्ट्या मागे पडतो आहे.

माँटोव्हिडो हे वैभवशाली शहर नाही. पण तेथील प्रसन्नता मनाला लोभावते रस्ते अतिशय स्वच्छ असतात. आणि सार्वजनिक सेवा कार्यक्षम आहेत. या शहरात झोपडपट्टी नाही. तेथे जुगाराला परवानगी आहे त्यामुळे रोज रात्री बराच जल्लोष उडतो. कार्निवाल उत्सवाच्या रात्री सर्व शहर नटते व जागे होते

युरुग्वेचे क्षेत्रफळ, १७७५०८ चौ कि. मी.
लोकसख्या (१९७०) २८८६१००
राजधानी मॉन्टेव्हिडो (१३ लाख)
धर्म . ख्रिश्चन
भाषा : स्पॅनिश

## बोलिव्हिया

सन १८०९ मध्ये सुक्रे येथील विश्वविद्यालयामधून सर्व स्पॅनिश वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे म्हणून आवाहन करण्यात आले तेव्हापासून चाराकास प्रांतालाही स्वातन्त्र्य मिळावे म्हणून अनेकदा चळवळी करण्यात आल्या. अर्जेंटिनाला हा प्रांत आपल्या देशात सामील करावयाचा होता कारण तेथे खनिजसपत्ती भरपूर होती आणि या देशाचा बराचसा भाग अॅन्डीज पर्वताच्या पूर्वेला अर्जेंटिनाला लागून होता. सीमॉन बोलिव्हार या सेनापतीने स्पॅनिश सैन्याचा पराभव पेरुमधील आयाकुचो येथे १८२४ मध्ये केला. त्यावेळी काही लोकांना पेरु देशात सामील व्हायची इच्छा होती. पण बोलिव्हारचा दुय्यम सेनापती सुक्रे याला स्वतत्र राज्य हवे होते १८२८ साली साताक्रूझ या मिश्रवर्णीयाने सत्ता हाती घेऊन या देशाचे विलिनीकरण पेरुबरोबर केले होते, पण ते लवकरच रद्द झाले सीमॉन बोलिव्हारने आपलेच नाव या देशाला ठेवले म्हणून 'बोलिव्हिया' हे नाव पडले आहे या देशात नेहमी लष्करी क्रात्या चालू असतात व लष्करातील कोणीतरी सत्ता बळकावतो १८२८ पासून आजपर्यंत अशा १७६ क्रात्या या देशात झाल्या आहेत !

सध्या बोलिव्हियाच्या हद्दी उत्तरकडे एकर जंगलपट्टीपर्यंत, पूर्वेकडे पराग्वे नदी आणि पश्चिमेकडे अटकामा वाळवंट अशा आहेत. या अटकामा वाळवंटातच ३२० किलोमीटर्सची पॅसिफिकची किनारपट्टी या देशाला मिळाली आहे या देशाचे सुरुवातीचे क्षेत्रफळ २३ लाख चौरस किलोमीटर होते पण शेजारच्या राष्ट्रांनी लचके तोडल्यामुळे ते आता सुमारे ११ लाख चौरस किलोमीटरवर आले आहे शेजारच्या राष्ट्रांनी लचके तोडायचे दुसरे एक कारण ऐतिहासिक आहे स्पेनने आपल्या प्रांताच्या सीमा स्पष्टपणे कधीच आखल्या नव्हत्या व जाहीर केल्या नव्हत्या. एकरची जंगलपट्टी, ग्रान चाकोचे माळरान, किंवा अटकामा वाळवंट यापैकी कुठूनच स्पेनला फायदा होण्यासारखा नव्हता मग स्पेन कशाला हद्दी आखून ठेवेल ? चिलीबरोबरच्या युद्धात बोलिव्हियाला पॅसिफिकची बरीचशी किनारपट्टी गमवावी लागली. त्या बदल्यात 'अरिका' बंदर वापरायची मुभा आणि तेथपर्यंतची रेल्वे लाईन बोलिव्हियाला मिळाली. पण त्याचा फारसा उपयोग बोलिव्हियाला होत नाही.

अर्जेंटिनाने दक्षिण पूर्वेकडील चाको प्रदेशाचा काही भाग बळकावला त्यावेळी नुकसानभरपाई म्हणून बोलिव्हियाला रेल्वे लाईन मिळाली. रबराच्या तेजीच्या काळात एकर जंगलपट्टीत रबराची झाडे आढळली तेव्हा त्या भागावर ब्राझीलने हक्क सांगितला व युद्ध करून तो भाग बळकावला नुकसानभरपाई म्हणून बोलिव्हियाला ब्राझीलमधील मदेरा नदीवरील पोर्टोवेलोपासून बोलिव्हियातील बेनी नदीवरील रिबेरटा एथपर्यंत रेल्वे बांधून देण्याचे आश्वासन मिळाले या रेल्वेचा बोलिव्हियामधील भाग कधीच बांधून झाला नाही. १९२८ पासून १९३५ पर्यंत

बोलिव्हिया आणि पाराग्वे याच्या चकमकी ग्रान चाको माळरान वरील हक्कासाठी चालू होत्या शेवटी बोलिव्हियाला हे ग्रान चाको सोडून द्यावा लागला

सर्व बाजूकडून प्रदेश गेल्यामुळे बोलिव्हिया आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनला त्यामुळे आपल्या देशातल्या रिकाम्या प्रदेशाचाही तो विकास करू शकला नाही या युद्धामुळे लोकांत राष्ट्रीय भावना व एकजूट निर्माण व्हायला मदत झाली बोलिव्हियामध्ये ७० टक्के लोकसख्या ताम्रवर्णीयाची व २५ टक्के लोकसख्या मेस्टिजोंची म्हणजेच मिश्रवर्णीयांची आहे

ग्रान चाकोच्या युद्धामुळे देशात प्रागतिक चळवळ सुरू झाली चांदीनंतर या देशात टिन हे एकच प्रमुख खनिज राहिले आहे. टिनच्या धनाढ्य खाणमालकानी युद्धाला आर्थिक मदत दिली नाही म्हणून झालेल्या पराभवाबद्दल त्याना दोषी धरण्यात आले टिनच्या या खाणी बऱ्याच उंच प्रदेशात आहेत आणि तेथील मजुरांची स्थिती दयनीय होती १९६७ साली झालेल्या राज्य क्रांतीनतर टिनच्या सर्व खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. अलिकड अमारकन मदतान पराग्व नदाच्या [illegible]पासून. अॅन्डीज पर्वतापर्यंत रस्ते बाधण्यात आले आहेत त्यामुळे देशाची निसर्गसपत्ती बाहेर येऊ लागली आहे. जमीनविषयक कायद्यातील सुधारणा व शेतीसुधारणा होत आहे, पण अल्टिप्लेनो पठारावरील ताम्रवर्णीयाला आपले शांत जीवन सोडायचे नाही. श्रमप्रवृत्ती निर्माण करून त्याला विकासाला कसे प्रवृत्त करायचे हाच मुख्य प्रश्न आहे दरवर्षी होणारा फियस्टाचा उत्सव व जत्रा आणि आठवड्याचा बाजार यातील वैचित्र्यावरच सर्व बोलिव्हियन लोक खुष असतात

बोलिव्हियाचे क्षेत्रफळ– १०९८६०० चौ कि. मी.
लोकसख्या (१९७१) ५०६२५००
भाषा स्पॅनिश
धर्म ख्रिश्चन
राजधानी ला पाझ व सुक्रे.

## ब्राझील

ब्राझील राष्ट्राने दक्षिण अमेरिकेचा अर्धा भाग व्यापला आहे अर्थात यात पोर्तुगीजाचे काहीच कौशल्य नाही ! भौगोलिक रचनाच याला कारणीभूत आहे अॅन्डीज पर्वत पॅसिफिकला खूपच जवळ आहे तेथून अॅमेझॉन व तिच्या उपनद्या निघतात व पूर्व किनाऱ्यावर अटलांटिकला मिळतात पोर्तुगीजानी अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर आपले प्रभुत्व स्थापन केले त्यामुळे आपोआपच अॅमेझॉन व तिच्या उपनद्या याचे अॅन्डीज पर्वतापर्यंतचे विस्तृत खोरे पोर्तुगीजांच्या ताब्यात आले.

प्रथमपासूनच ब्राझीलमधील वसाहतवाल्याना स्थानिक राज्यकारभारात बरेच महत्त्व होते व त्यांचा त्यात सहभागही होता. कारण पोर्तुगालमधील सरकार फारसे सामर्थ्यवान नव्हते. पोर्तुगालच्या राजाने फक्त खाणीबाबत आपले अधिकार गाजवले. त्यामुळे ब्राझीलचा आर्थिक विकास तेथील स्थानिक वसाहतवाल्याच्या प्रयत्नाने झाला. येथील समाजावर निग्रो गुलामाच्या आयातीचा फारच मोठा परिणाम झाला आहे. निग्रो गुलाम फार मोठ्या सख्येने येथे आले. त्याच्या पोर्तुगीज मालकानी निग्रोना अगदी घरातल्याचप्रमाणे वागवले. परिणामी येथील समाज निग्रो आणि पोर्तुगीज याच्या मिश्रवर्गाचा बनला आहे शुद्ध पोर्तुगीज

किंवा शुद्ध निग्रो वंशाचे लोक व कुटुंबे या देशात आहेत पण ती अपवाद म्हणूनच ! पोर्तुगीज वसाहतवाल्यांनी गुलामगिरी बंद करायला विरोध केला खरा पण एकदा गुलामगिरी रद्द झाल्यावर तेथील मुक्त निग्रो गुलामाला उत्तर अमेरिकेतील निग्रोपेक्षा जास्त सामाजिक स्वातंत्र्य मिळाले या समाजात वर्ण भेद नाही. गोरा, निग्रो किंवा मिश्रवर्णीय मिलेटो हे सर्वजण आधी ब्राझीलियन आहेत मुख्य समस्या दारिद्र्य दूर करण्याची आहे

१७६० मध्ये पोर्तुगालचा परराष्ट्रमंत्री पोंबाल याने ब्राझील-मध्ये एकसंघ समाज निर्माण व्हावा म्हणून धोरण आखले त्याने ब्राझीलची राजधानी बाहिया येथून 'रिओ-द-जानेरिओ' येथे नेली कारण तेथून अंतर्भागात बऱ्याच खाणींचा शोध लागत होता. आणि तेथून त्यांचे चांगले नियंत्रण करता येत होते. १७८९ मध्ये पहिले महत्त्वाचे बंड झाले. जोसे-द-सिल्व्हा झेवियर हा बंडाचा नेता होता येथून पुढच्या १०० वर्षांत फारसा रक्त-पात न होता ब्राझील स्वतंत्र झाला ज्यावेळी नेपोलियनने पोर्तु-गालवर स्वारी केली तेव्हा राजा व त्याचे दरबारी ब्रिटिश जहाजातून रिओ येथे पळून गेले. लवकरच रिओ शहराला आंतर-राष्ट्रीय राजधानीचा दर्जा प्राप्त झाला तेथे आंतरराष्ट्रीय जहाज-वाहतूक सुरू झाली. बँकांची स्थापना झाली. एक छापखानाही सुरू झाला व शाळा सुरू झाल्या नंतर पोर्तुगालचा राजा जेव्हा पोर्तुगालला परतला तेव्हा त्याने ब्राझीलचे वेगळे राज्य जाहीर केले. व आपला मुलगा डॉम-पेद्रो पहिला याला या नव्या राज्याचा सम्राट बनविले नंतर पुन्हा जेव्हा पोर्तुगालने आपले प्रभुत्व ब्राझीलवर लादण्याचा प्रयत्न केला तेव्हा या तरुण राजाने विरोध केला व स्वातंत्र्य जाहीर केले. त्यामुळे पोर्तुगालचे काही चालले

नाही सन १८८९ मध्ये कुठलीच खळबळ न माजता ब्राझील प्रजासत्ताक बनले.

ब्राझीलला आपल्या सरहद्दीसाठी फारसे भांडावे लागले नाही. पराना आणि पराग्वे नदीच्या उगमाकडील प्रदेश ब्राझीलच्या ताब्यात आहे व होता. पराग्वेबरोबरच्या सरहद्दीच्या युद्धाची माहिती त्या देशाच्या इतिहासात घेऊ. ब्राझीलच्या व्हेनिझुएला व गियाना या देशाबरोबरच्या हद्दी नैसर्गिक आहेत. कोलंबिया, इक्वेडोर आणि पेरु या देशाबरोबरच्या सरहद्दी शांततापूर्ण वाटाघाटीतून ठरल्या. बोलिव्हियाबरोबरच्या हद्दीसाठी युद्ध झाले व त्यात ब्राझीलचा जय होऊन एकरची जगलपट्टी ब्राझीलला मिळाली. त्या नव्या प्रदेशाचा कारभार मध्यवर्ती सरकारच पाहते.

१९२९ पर्यंत ब्राझीलमध्ये लोकशाही यशस्वीपणे चालू होती. त्या वर्षी कॉफी पिकाचे भाव पडले आणि आर्थिक सकट आले. गेटिलिओ वर्गीस हा लोकनेता पुढे आला आणि त्याने पंधरा वर्षे सर्व सत्ता आपल्या हातात ठेवली. त्याने मजूरविषयक कायदे सुधारले आणि ब्राझीलियन राष्ट्रीयत्व जागृत केले दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी युरोपबरोबरचा व्यापार थाबला. तेव्हा ब्राझीलमध्ये सर्व परकीय कपन्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले आणि आपल्या गरजा भागविण्यासाठी ब्राझील स्वयपूर्ण होण्याची खटपट करू लागला.

पण ब्राझीलला एकदम पुढे नेण्याचे काम जुसेलिनो कुबीटशेक याने केले ब्राझीलच्या घटनेमध्ये फार पूर्वीपासून राजधानीबाबत एक कलम होते देशाची राजधानी देशाच्या मध्यवर्ती विभागात असावी असा आदेश त्या कलमात दिलेला होता देशाच्या अतर्भागात निरनिराळ्या वेळी अनेक शहरे उभारली

गेली होती. ॲमेझॉन नदी किनाऱ्यावरचे मानाबूस हे शहर रबराच्या तेजीच्या काळात झटपट उभारले गेले होते व वैभवसंपन्नही झाले होते सतराव्या शतकाच्या शेवटी 'आरोप्रेटो हे शहर जवळच सापडलेल्या सोन्याच्या साठ्यामुळे वसवले गेले होते.

कुबीटशेकने राजधानीबाबतचे घटनेतील कलम अमलात आणायचे ठरविले. त्याने त्यासाठी अफाट खर्च केला. व देशाला दिवाळखोरीपर्यंत नेऊन पोचवले चलनवाढ होऊन महागाई वाढली पण शेवटी ब्राझिलिया हे राजधानीचे शहर बांधून झाले. तेथे आता तीन लाख लोक राहतात लोकसभा तेथेच भरते आणि केंद्र सरकारची कार्यालयेही येथेच आहेत गोयास पठारावरच्या एका खलाटीत हे शहर वसवले आहे. नवी राजधानी रिओपासून मोटार रस्त्याने १२०० किलोमीटर अंतरावर आहे येथून बेलेमपर्यंत जंगलातून रस्ता बांधला आहे दुसरा एक राजमार्ग पोर्टोव्हेलोपर्यंत जातो आणि तेथून आणखी ८०० किलोमीटर पुढे 'एकर' वनविभागातील 'रिओ-बँको'पर्यंत जातो तिसरा एक रस्ता मनावूस शहराकडे बांधणे चालू आहे मनावूसकडे जाणारा हा रस्ता संपूर्णपणे अज्ञात प्रदेशातूनच जात आहे या दुर्गम अरण्यात आजवर कोणीच घुसले नव्हते या अज्ञात प्रदेशात काय आहे याचा शोध घेण्यासाठी बुल्डोझर पथकाबरोबर शास्त्रज्ञांचे पथकही काम करत असते ब्राझीलचा साठ टक्के मुलूख ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात आहे. पण ब्राझीलच्या लोकसंख्येपैकी फक्त दोन टक्के लोकसंख्या त्या खोऱ्यात राहते म्हणजे या खोऱ्याच्या विकासाला किती वाव आहे हे लक्षात येईल. याच खोऱ्यात अजून अज्ञात प्रदेश आहेत ब्राझीलमधील सर्वांत उच्च शिखर पिको-द-नेब्लीना अगदी अलीकडे म्हणजे १९६५ साली शोधण्यात आले

आजचा ब्राझील उद्योगप्रधान देश आहे. पण धद्यात गुतलेले खूप भांडवल परकियाचे आहे जवळ जवळ प्रत्येक प्रकारचा औद्योगिक माल ब्राझीलमध्ये तयार होतो. तेथे खनिजसपत्तीचा साठा अमाप आहे ब्राझीलमधील मिनासगेरियास या मध्यवर्ती पठारावरील घटक राज्यात कच्च्या लोखडाचा अफाट साठा आहे. जगातील कच्च्या लोखडापैकी ३५ टक्के लोखड ब्राझील-मध्ये आहे. हा ब्राझीलमधील साठा एकूण ६५०० कोटी टनाचा असावा असा अदाज आहे अर्थातच ब्राझीलमधील लोखड पोलाद उद्योग दक्षिण अमेरिकेतील सर्वात मोठा उद्योग आहे खाणींच्या क्षेत्रात लोकसख्या पुरेशा प्रमाणात वाढली तरच ब्राझीलला या खनिजसपत्तीचा पुरेपूर फायदा उठविता येईल अर्थात त्यासाठी जास्त सुधारलेलेही तंत्रज्ञान वापरायला हवे आहे सध्या ब्राझील-मध्ये भयकर चलनवाढ होत आहे लोकसख्याही फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे व निरनिराळ्या घटक राज्याच्या विकासाचा समतोल साधता आला नाही वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी पुरेशा शैक्षणिक सोई उपलब्ध नाहीत मध्यमवर्ग वाढत असून त्याच्या राहणीमानाच्या अपेक्षा वाढत आहेत. दारिद्र्य, रोगराई व दुष्काळ या नेहमीच्याच समस्या आहेत या सगळ्या समस्येला तोंड देऊन ब्राझीलला मार्ग काढावयाचा आहे

१) ब्राझीलचे क्षेत्रफळ ८५११९६५ चौ. कि मी.

लोकसंख्या (१९७०) ९३२१५३०१.

भाषा पोर्तुगीज

राजधानी ब्राझिलिया

धर्म ख्रिश्चन

# चिली

चिली हा पेरु येथील व्हॉईसरॉयच्या अमलाखाली एक प्रांत होता. चिलीची मुक्तता करणारा सेनानी स्पॅनिश नव्हता. मात्र तोस्पेनच्या सैन्यात एक अधिकारी होता. त्याचे नाव– बर्नार्डो- हो हिगिन्स १८१० मध्ये स्पेनवर नेपोलियनने आक्रमण केल्याची बातमी येताच त्याने व त्याच्या मित्रांनी चिलीचे स्वातंत्र्य जाहीर केले त्यानंतरची सात वर्षे युद्धात गेली शेवटी अर्जेन्टिनाचा सेनापती जनरल सान मार्टीन ॲन्डीज पर्वत ओलांडून चिलीच्या मदतीला आला आणि त्याने विजय मिळवून दिला चिलीच्या स्वातंत्र्ययुद्धाला अलेक्झांडर कॉचलने या स्कॉटिश दर्यासारंगाची मदत मिळाली त्याने चिलीचे आरमार सज्ज केले स्वातंत्र्य मिळाल्यानंतर होहिगिन्स पहिला अध्यक्ष झाला पहिली राज्य- घटना आदर्श लोकशाहीची होती. पण ती मोठ्या जमीनदारांना आवडली नाही लवकरच होहिगिन्स दूर सारला गेला आणि १८३३ साली नव्या राज्यघटनेनुसार शासनसंस्थेतून जमीनदार वर्गाचे व उच्चभ्रू वर्गाचे उच्चाटन झाले

याचेळी चिलीच्या नैसर्गिक हद्दीबद्दल काहीच तंटा नव्हता. एका बाजूला पॅसिफिक महासागराचा किनारा आणि पूर्व बाजूला सागराला समांतर असलेली अन्डीज पर्वतरांगाची नैसर्गिक तटबंदी. दक्षिणेकडे टेरा-डेल फ्युगोचे टोक आणि तेथून उत्तरेकडे ३२०० किलोमीटरवर अटकामाचे वाळवंट अशा या नैसर्गिक हद्दी होत्या. अटकामा वाळवटात पुढे नायट्रेट सापडले आणि काराकोल्स येथे चांदी सापडली. पण हे दोन्ही खनिज पदार्थ जास्त प्रमाणात बोलिव्हियाच्या हद्दीत होते. चिलीने बोलिव्हियाकडून या खनिज

पदार्थाबाबत हक्क मिळविले पण बोलिव्हिया अटीबाबत कुरकूर करू लागला तेव्हा चिलीने पेरु व बोलिव्हियाविरुद्ध युद्ध पुकारले. सन १८८४ मध्ये चिलीला सपूर्ण विजय मिळाला पेरुची राजधानी लिमा चिलीच्या ताब्यात दोन वर्षे होती नायट्रेट हे उत्तम खत आहे ते नैसर्गिक स्थितीत अटकामा वाळवटातच सापडते १८८४ पासून पुढे चाळीस वर्षं नायट्रेट विकून चिलीने फायदा मिळविला नंतर जर्मनीत रासायनिक प्रक्रियेने नायट्रेट निर्माण करता येऊ लागल्यानतर चिलीमधील नायट्रेटचे महत्व कमी झाले

चिलीमध्ये मोठ्या जमीनदारांनीच बहुसंख्य जमीन आपल्या ताब्यात ठेवली होती लहान शेतकऱ्याला जमीनदाराकडेच काम करावे लागे स्वातन्त्र्ययुद्धात या लहान शेतकऱ्यानी स्वातन्त्र्याची थोडीशी चव चाखली होती त्याना जमीनदारावर अवलबून राहणे नकोसे वाटू लागले. मग त्यांपैकी अनेकजण खाणकामाकडे वळले काही जणानी बायोबायो नदी ओलाडली आणि आरुकान जमातीच्या ताम्रवर्णीयाच्या भूमीत जमीन मिळविली या आरुकान जमातीने युरोपियनाच्या आक्रमणाला दोन शतके विरोध केला होता पण १९ व्या शतकातील आर्थिक, सामाजिक व लष्करी दडपणाखाली त्याचा विरोध मोडून पडला. आणि त्यांनी आपल्या जमिनी सगळ्यासाठी मोकळ्या केल्या.

चिलीमध्ये इकाचे साम्राज्य येण्यापूर्वीसुद्धा तेथील स्थानिक ताम्रवर्णीय खाणीतून ताबें काढत असत जर्मनीतील शोधानतर नायट्रेटचे महत्त्व कमी झाले त्यानतर अर्थव्यवस्थेत ताब्याच्या निर्यातीला प्रमुख स्थान मिळाले १९५० पर्यंत चिलीमधील ताब्याच्या खाणीचे ९० टक्के हक्क अमेरिकन भांडवलदाराच्या

हातात गेले होते जगातल्या ताब्याच्या भावावर चिलीची अर्थ-व्यवस्था अवलबून राहू लागली.

चिलीमध्ये फारच थोड्या जमीनदाराच्या हाती बहुसख्य सुपीक जमीन एकवटली होती. जमीनीच्या कायद्यामध्ये बदल करावयाला हवे होते उदारमतवादी अध्यक्ष बाल्मा केडा (१८८६ ते १८९१) याने या दिशेने प्रयत्न केले पण यादवी युद्ध माजून त्या युद्धात दहा हजार लोक ठार झाले १९२२ साली आर्थोरो अलेरोन्द्री हा उदारमतवादी अध्यक्ष निवडून आला. आणि त्याने सामाजिक समता आणणारे कायदे केले. १९७० साली अध्यक्ष फ्रेई याने जमीनदाराच्या जादा जमिनी काढून घेतल्या व ताब्याच्या खाणींचे काही प्रमाणात राष्ट्रीयकरण केले. त्यामुळे अमेरिकन भाडवलदारांचे प्रभुत्व कमी झाले. कॅम्युनिस्ट पक्षाला उघडपणे काम करण्यास त्याने परवानगी दिली व दक्षिण अमेरिकेत अन्यत्र न दिसणारे वृत्तपत्रस्वातत्र्य दिले.

पुढच्या निवडणुकीत कॅम्युनिस्ट पुढारी आयेंदे अध्यक्ष म्हणून निवडून आला. पण त्याची राजवट टिकली नाही. अमेरिकन गुप्तहेर सघटनेच्या मदतीने लष्कराने क्राती केली व आयेंदेचा वध झाला जनरल उगार्टो याने सर्व सत्ता आपल्याकडे घेतली. या सर्व अगदी अलीकडील घटना.

चिली देश निसर्गरम्य आहे. अटकामा वाळवट जगातील सर्वात कोरडे वाळवट आहे पण त्याचीही माणसाला ओढ वाटते. तेथे पुराणवस्तु सशोधनाला खूपच वाव आहे कोलबसापूर्वीचा इतिहास उत्खननातून जुळवता येण्यासारखा आहे.

व्हल्परासिओ हे बदर सान्टियागोला जोडलेले आहे. दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचे ते सर्वात मोठे व्यापारी बदर

आहे टेकड्यानी वेढलेल्या उपसागरात हे सुरक्षित बदर वसवलेले आहे दूरवर अॅन्डीज पर्वताची बर्फाच्छादित शिखरे डोकावत असतात. हवामान भूमध्यसागराजवळील हवामानाप्रमाणे सौम्य व सुखकारक आहे. जवळच विनाडेरमारची सुरेख पुळण हौशी प्रवाशाचे आवडते ठिकाण आहे

दक्षिणेकडे पॅन्टागानियाच्या सरहद्दीजवळ पर्वतशिखरावरून हिमनद्या वाहत येतात. येथे पुन्हा चिलीचा व अर्जेटिनाचा सर-हद्दीचा झगडा होताच. नुकताच तो मिटला या दक्षिणेच्या प्रदेशात चिलीचे नवे वैभव दडलेले आहे. तेथे खनिज तेल सापडत आहे। मेंढीपालन उत्तम होऊ शकते त्यापलीकडे अटार्टिक खडाची भूमी आहे त्यावर चिलीने हक्क सांगितला आहेच

चिलीचे क्षेत्रफळ ७,५६९४५ चौ कि. मी.
लोकसख्या (१९७०) ९७,८०,०००
भाषा स्पॅनिश
राजधानी सॅन्टियागो (२,५८,६२१२)

## परागवे

परागवे हा आर्थिक दृष्टचा गरीब देश आहे या देशाचे क्षेत्रफळ महाराष्ट्राइतके आहे. पण परराष्ट्रीय व्यापार फक्त ८० लक्ष पौंडाचा किंवा १२ कोटी रुपयाचा आहे हा देश समुद्रापासून १४४० किलोमीटर अतरावर आहे. लोकसख्या २० लाखाच्या आसपास आहे बाहेरच्या सर्व जगात आर्थिक विकास चालू असताना परागवेने मात्र आपले दरवाजे या विकासाला बद ठेवले आहेत कदाचित औद्योगिक क्रान्तीपूर्वीची सस्कृती तेथेच सापडेल.

जरी आॅसिन्शन येथे स्पॅनिशाच्या वसाहती फार पूर्वीपासून

झाल्या असल्या तरी सध्या तेथे स्पॅनिशाचा काहीच मागमूस *राहिलेला नाही तेथे पूर्वीपासून राहाणारे गुवारानी ताम्रवर्णीय* शात व समजूतदार लोक होते. जेसुईट मिशनऱ्यानी त्याना खूप मदत केली व ख्रिस्ती करून घेतले. गुवारानी लोकानी युरोपियन लोकाकडून घरबाधणी आणि लेखनकला शिकून घेतल्या. त्यांनी स्पॅनिश समाजात मिसळून जायचे ठरविले. आज पराग्वे देशात ९७ टक्के लोकसख्या मेस्ट्रीझोंची म्हणजे मिश्रवर्णीयाची आणि तीन टक्के सख्या युरोपियनाची आहे राज्याच्या दोन अधिकृत भागापैकी गुवारानी ही एक भाषा आहे. पराग्वेला सन १८११ मध्ये रक्तपाताशिवाय स्वातन्त्र्य मिळाले डॉ फ्रन्सिस हा पराग्वेचा पहिला हुकुमशहा बनला. आणि त्यानतर हुकुमशहाची मालिकाच लागली पहिला हुकुमशहा फ्रॅन्सिस २९ वर्षे अधिकारावर होता. त्याने आपल्या देशाला बाह्य जगापासून अलग ठेवले. व देशाची प्रगती किंवा अधोगती यापैकी काहीच घडू दिले नाही. सन १८६५ मध्ये ब्राझील, अर्जेन्टिना आणि उरुग्वे याच्याबरोबर पराग्वेच्या भीषण लढयात पराग्वेचे लोक फार चिकाटीने लढले त्याची निम्मी लोकसख्या मारली गेली. युद्धाच्या शेवटी फक्त २८ हजार पुरुष जिवत राहिले !

याच सुमारास युरोपातून काही लोक स्थलातर करून कायमची वस्ती करायला आले. त्यानी येथील समाजात महत्त्वाचे स्थान मिळविले १९१३ मध्ये पराग्वेचे व बोलिव्हियाचे युद्ध जुपले. त्यातील विजयामुळे ग्रान चाको माळरानाचा एक मोठा तुकडा पराग्वेला मिळाला याच नव्या भागात काही खनिजे सापडली आणि आता खनिज तेलही सापडले आहे

हा देश मुख्यत पराग्वे आणि पॅराना या नद्याच्या मधल्या

प्रदेशात वसलेला आहे आणि पश्चिमेकडे एक फाटा ग्रानचाको माळरानावर पसरला आहे उत्तरेकडे जगल आहे व त्यातून बरेच उत्पन्न मिळते. दक्षिणेकडच्या पठारावर देशातली बरीच लोकसख्या एकत्र झाली आहे ग्रानचाको माळरान झुडपाळ व कोरड्या हवामानाचे आहे. तेथे फक्त पशूपालन होऊ शकते. या देशातून गोमास, इमारती लाकूड, आणि कातडी याची निर्यात होते

क्षेत्रफळ ४०६७५२ चौ किलोमीटर
लोकसख्या (११७०) २३८६०३०
भाषा स्पॅनिश व गुबारानी.
राजधानी ॲसेन्शन (४४००००)

## पेरु

स्पॅनिशानी जिकलेला दक्षिण अमेरिकेतील हा पहिला देश आहे. त्यावेळी इन्काचे साम्राज्य येथे पसरले होते व लोकसख्याही बरीच दाट म्हणजे ६० लाख होती. स्पॅनिशांच्या कत्तलीमुळे ती १५७० मध्ये $\frac{1}{8}$ वर आली. सध्या पेरुची लोकसख्या १ कोटी २८ लाखाच्या आसपास आहे लोकसख्येतील ८८ टक्के लोक मिश्र-वर्णीय मेस्टिझो किंवा शुद्ध ताम्रवर्णीय आहेत ताम्रवर्णीयाची क्वेचुहा ही भाषा अजून मोठ्या प्रमाणात बोलली जाते. पण त्या भाषेतून आकाशवाणीचे कार्यक्रम कॅम्युनिस्ट क्यूबा देशातून फक्त प्रसारित केले जातात. पेरु हे स्वतत्र राष्ट्र असले तरी त्या स्वातत्र्याचा फायदा ताम्रवर्णीयांना अजून मिळालेला नाही

स्वातत्र्यासाठी पहिला उठाव १७८० मध्ये ताम्रवर्णीयांनी केला तुपाक-अमारु-दुसरा-या इन्कांच्या पदच्युत राजाने या

उठावाचे नेतृत्व केले तो अयशस्वी झाला, आणि उठावाच्या नेत्याना क्रूर मृत्यूदंड देण्यात आला. दुसरा उठाव १८१४ मध्ये झाला पेरुत जन्मलेल्या स्पॅनिशाचा या उठावाला पाठिंबा होता. पण राजनिष्ठ फौजाचा पराभव अर्जेंटिनाच्या जनरल-सॅन मार्टीननेच केला. त्याचे सैन्य ॲडमिरल कोचरमेच्या आरमारातून लिमा येथे आले होते १८२१ मध्ये पेरुचे स्वातंत्र्य जाहीर करण्यात आले तरीही स्पेनशी एकनिष्ठ असलेल्या सैन्याचा पूर्ण पराभव झाला नव्हता सिमॉन बोलिव्हारने स्वातन्त्र्ययोद्धयाना एकत्र करून आयाकुचो येथे राजनिष्ठाचा पराभव १८३४ मध्ये केला.

स्वातन्त्र्याच्या पहिल्या अर्धशतकात पेरु देशावर लष्करानेच राज्य केले तेव्हापासून आजपर्यंत पेरुच्या राज्यकारभारात लष्कर हा महत्त्वाचा घटक होऊन बसला आहे. राज्यघटना अनेकदा बदलण्यात आली जनतेच्या मतातून निवडून आलेला फर्नांडो-टेरी हा अध्यक्ष त्यातल्या त्यात चागला होता. लष्कराने क्रांती करून १९६८ मध्ये त्याला पदच्युत केले कारण त्याने ताम्रवर्णीयाच्या मागण्या तातडीने पूर्ण केल्या व राष्ट्रीकरणाबाबत उत्साह दाखवला नाही अशी कारणे पुढे करण्यात आली पेरुमध्ये ताम्रवर्णीय लोकाना जागृत करण्यासाठी क्यूबातील कम्युनिस्ट प्रयत्नशील आहेत. या ताम्रवर्णीयानी आपली क्वेचुहा भाषा व सस्कृती सर्व प्रकारच्या आक्रमणाना तोंड देऊन जपली आहे. पण ताम्रवर्णीयाचा हा समाज नैतिक-दृष्ट्या खालावलेला व कुपोषित आहे गुगी आणणाऱ्या कोकाच्या बिया खायचे व्यसन इन्कापूर्व काळापासून या लोकांना आहे त्यामुळे मनुष्य गुगीत राहतो व त्याची शारीरिक, मानसिक

ताकद मदावते. इन्काच्या काळापासून डोंगरावरून जी टप्प्याची शेती केली जात होती त्या शेतीवरच ताम्रवर्णीय जगतो कारण खोऱ्यामधील सुपीक जमीन थोडचा जमीनदाराच्या हातात आहे अॅन्डीज पर्वताच्या पूर्व उतारावर असलेल्या मौटानाच्या जगलात क्रांतिकारकांचे गुप्त अड्डे आहेत व तेथे त्याचे वर्चस्वही आहे दरम्यान २९ ऑगस्ट १९७५ मध्ये मागचा लष्करी हुकुमशहा व्हेलास्को याला सेनापती फ्रॅन्सिस्को बरमुडेझने पदच्युत करून स्वत कडे कारभार घेतला आहे

अलीकडे सरकारने अमेरिकेच्या मदतीने अॅन्डीज पर्वतात बरेच रस्ते बाधले आहेत. त्यापैकी एक रस्ता आब्रामार्गा ह्या १४हजार फूट उचीच्या म्हणजेच ४३०० मीटर उंचीच्या खिडीतून जातो अशा रस्त्यामुळे अद्याप वस्ती न झालेला नवा प्रदेश पेरुला साप-डला आहे. या नव्या प्रदेशाला ' न्यू फ्रांटियर ' असे म्हणण्यात येते तेथे भरपूर सुपीक जमीन उपलब्ध झाली आहे. तेथील ताम्रवर्णीयाच्या गरजा अगदी प्राथमिक असल्यामुळे पेरुची अर्थ-व्यवस्था स्थिर आहे पेरुची मुख्य सपत्ती व उत्पादन कापूस, साखर, मासेमारी व खाणकाम या चार बाबींवर एकवटलेले आहे. मासेमारी जहाजांचा जगातला सर्वात मोठा ताफा पेरुमध्ये आहे. पेरुमधल्या खाणी अॅन्डीज पर्वतात इतक्या उचीवर आहेत की तेथे फक्त ताम्रवर्णीयच काम करू शकतात अल्टिलेनो पठारावरच्या ताम्रवर्णीयाची फुप्फुसे सामान्य माणसापेक्षा वीस टक्क्यानी मोठी असतात व त्याच्या अगात सर्वसामान्य माणसापेक्षा दोन पिंट रक्त जास्त असते

पेरु देशात अॅन्डीज पर्वताच्या उच रागा असल्यामुळे येथे दळण-वळणाचा प्रश्न खूपच गुतागुतीचा आहे ब्रिटिशानी अत्यत अवघड

जागी रेल्वे लाइन बांधून मंतेरो आणि हुआनकायो या दोन निसर्गरम्य खोऱ्याकडे मार्ग काढला. दुसरी एक वेगळी लाइन मोलेन्टो येथून निघते आणि आरेक्विपा या मोठ्या शहरातून पुढे जाऊन १९ हजार फूट म्हणजेच ५७९१ मीटर उंचीच्या मिस्टी या ज्वालामुखीच्या पायथ्याजवळून जाते नंतर टीटाकाका सरोवराजवळच्या पठारावरून जाऊन ती कुझकोला पोहोचते. अॅडीन्स पर्वतातून रस्ते बांधण्यात आले आहेत. ते अतिशय धोक्याच्या प्रदेशातून जातात हिमालयातील वाहतुकीप्रमाणेच या रस्त्यावरून एकमार्गीच वाहतूक चालू असते

किनाऱ्याजवळच्या वाळवटातून अखिल अमेरिकन महामार्ग जातो हा महामार्ग सँटिआगोपासून पनामापर्यंत गेलेला आहे. पेरुमधील या महामार्गाचा भाग खूपच चांगला आहे व सुस्थितीत आहे या महामार्गाला समांतर असलेला पण अॅडीन्स पर्वताच्या पूर्वेकडून जाणारा नवा अखिल अमेरिकन महामार्ग आखला गेला आहे व त्याचे बांधकाम चालू आहे पॅसिफिक किनाऱ्यावरच्या दाट लोकसंख्येच्या प्रदेशातून अॅडीन्स पर्वत ओलांडून जाणारे पाच रस्ते झाले आहेत, त्यापैकी सेरो-द-पास्को येथून युकायली नदी-पर्यंत जाणारा मार्ग फार महत्त्वाचा आहे यामुळे राजधानी युकायली नदीशी जोडली जाते. युकायली येथून इक्विटोस या अॅमेझान नदीवरील गावापर्यंतही दळणवळण ठेवता येते. युकायली आणि इक्विटोस या दोन्ही ठिकाणाभोवती शेकडो किलोमीटरपर्यंत वस्तीच नाही इक्विटोस हे इतके अंतर्भागात आहे की अगदी अलीकडच्या काळापर्यंत लिव्हरपूलहून प्रत्येक महिन्यात एकदाच येणाऱ्या आगबोटीद्वारेच बाह्य जगाशी संबंध ठेवता येत असे.

बिलकाबा पर्वताच्या जंगलमय प्रदेशातही दळणवळणाचे मार्ग

नव्हते या पर्वतात अजूनही कित्येक प्रदेश अज्ञात आहेत. या पर्वतराजीमध्ये अलीकडे १९११ मध्ये 'हिराम बिंगहॅम' या येल विद्यापीठाच्या प्राध्यापकाला माचू पिचु हे इन्काचे निर्जन शहर सापडले

पेरुचे क्षेत्रफळ १२८५२१५ चौरस किलोमीटर
लोकसंख्या १,३५,८६,३००.
भाषा स्पॅनिश व क्वेचुहा.
धर्म ख्रिश्चन.
राजधानी लिमा (३१,५५,८००)

## गियाना राष्ट्रे

दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर पूर्व किनाऱ्यालगत असलेल्या उच्च पठारावर गियाना नावाची तीन राष्ट्रे वसलेली आहेत. फ्रेंच, डच आणि ब्रिटिश यांच्या वसाहतींच्या प्रयत्नातून ही तीन राष्ट्रे निर्माण झाली आहेत. या तिन्ही राष्ट्रांच्या आपसातील सीमा भौगोलिक नाहीत उत्तरेकडील सीमा कृत्रिम असून त्याबाबत व्हेनुझुएलाशी नेहमी वाद चालू असतो. दक्षिणेची हद्द ब्राझीलच्या जंगलप्रदेशाशी लागून आहे- आणि तेथे लोकसंख्या इतकी विरळ आहे की सरहद्दीचा वाद काढणे व्यर्थच ठरणार आहे।

तिन्ही गियाना देशाची भौगोलिक रचना एकसारखी आहे. किनाऱ्याजवळची पट्टी शेतीस योग्य असून देशातील बहुसंख्य लोक तेथेच राहतात, त्या पलीकडे अंतर्भागात खूपच उच्च पठार आहे. आणि त्या पठारावर तांबड्या खडकाची शिखरे डोकावत असतात. तेथील डोंगरउतारावरच बॉक्साइट, सोने व हिरे सापडतात

तिन्ही गियानामधील हवामान सर्व दक्षिण अमेरिका खंडात उष्ण आहे.

ज्याला नुसते गियाना या नावानें ओळखले जाते तो प्रदेश पूर्वीची ब्रिटिश वसाहत होता या प्रदेशाचे क्षेत्रफळ साधारण महाराष्ट्राएवढे आहे. येथील लोकसंख्या सात लाख असून त्यात भारतीय व निग्रो प्रमुख आहेत. भारतीयाची लोकसंख्या निम्म्या-पेक्षा जास्त आहे. मूळचे ताम्रवर्णीय नावापुरतेच शिल्लक आहेत. इंग्लिश वसाहतीचा अवशेष म्हणून इंग्लिश भाषा व इंग्लिश कायदे येथे शिल्लक राहिले आहेत.

पूर्वीचा डच गियाना आता सुरिनाम या नावाने ओळखला जातो.

दोन्ही गियानाच्या हा मध्यभागी आहे इतिहासामध्ये या वसाहतीची अनेकदा ब्रिटिश आणि डच यामध्ये सत्तेची अदला-बदल झाली आहे. बाकीच्या गियानाप्रमाणेच सुरिनामचेही तीन भौगोलिक भाग पडतात किनारपट्टीचा शेतीचा व नद्याचा भाग, गवताळ माळरान आणि त्यापलीकडे डोंगरातील वनप्रदेश, येथीलही लोकसख्या भारतीय, निग्रो, चिनी व इंडोनेशियन अशा मिश्र जमातीची बनली आहे येथे बॉक्साइट भरपूर सापडते व निर्यातीमध्ये त्याचा ९० टक्के वाटा आहे

क्षेत्रफळ ५५ हजार चौरस मैल
लोकसख्या ४०३०००
राजधानी परामीरोबो (१५००००)

## फ्रेंच गियाना

'फ्रेंच गियाना' किंवा 'कयेंने' ही दक्षिण अमेरिकेतील एकमेव फ्रेंच वसाहत होती व आहे. इतिहासकालामध्ये ती

अनेकांच्या हातात गेली होती येथील लोकसंख्या फारच कमी म्हणजे ३४००० आहे फ्रासमधून जन्मठेपेचे कैदी पाठविण्याचे हे ठिकाण असून तेथील 'डेव्हिल्स आयलंड' या बेटावरची गुन्हेगाराची वसाहत बरीच कुप्रसिद्ध झाली आहे फ्रेंच राज्यपाल येथील कारभार पाहत असत.

## इक्वेडोर

ॲन्डीज पर्वताच्या आसमतात जी प्रजासत्ताक राज्ये आहेत त्यातील हा निसर्गरम्य देश आहे येथे पेरुमधल्या शिखराप्रमाणेच उच्च पर्वतशिखरे आहेत आणि त्यावर हिरवेगार दाट जंगल असते. येथील गोऱ्या रहिवाशांनी १८०९ मध्ये स्पेनपासून स्वातंत्र्य मिळविले जनरल सुक्रे याने राजनिष्ठ फौजांचा १८१४ मध्ये पराभव केला. जनरल बोलिव्हार याला या विशाल कोलंबियाचे राज्य हवे होते. या विशाल कोलंबियामध्ये इक्वेडोर, व्हेनुझुएला, कोलंबिया व पनामा हे देश होते पण १८३० मध्ये हे सगळे देश पुन: वेगळे झाले.

या राज्याचा पहिला अध्यक्ष व्हेनुझुएलातील होता. ही वसाहत स्पॅनिशाची असताना त्यांनी जुनी सरंजामदारी पद्धत येथे अंमलात आणली होती आजही जमीनदारी पद्धतीतून या देशाची सुटका झाली नाही. जमिनीच्या लहानशा तुकड्यासाठी सामान्य शेतकऱ्याला जमीनदाराच्या शेतीवर वर्षभर काम करावे लागते या देशाची १० टक्के युरोपियन आहे. लोकसंख्येतील ४० टक्के लोक शुद्ध ताम्रवर्णीय वशाचे आहेत.

इक्वेडोरच्या शेजारी राष्ट्रांनी इक्वेडोरचे नेहमी लचके तोडले आहेत अगदी अलीकडे म्हणजे १९४६ मध्ये शेजारच्या पेरुने इक्वेडोरचा १,८३,००० चौरस किलोमीटर प्रदेश बळकावला

इक्वेडोरमधून केळी, कॉफी व कोको यांची निर्यात होते. येथील केळ्यांचे उत्पादन सर्व जगात जास्त आहे. आता खनिज तेलही सापडले आहे या देशात कच्चे लोखंड, शिसे व कोळसा याचे मोठे साठे आहेत. 'पनामा हॅटस्' नावाने प्रसिद्ध असलेल्या गवती टोप्या येथेच तयार होतात.

क्युटो ही राजधानी असून तेथे चर्चच्या खूपच इमारती आहेत. या शहरातील हवामान नेहमी धुक्याने भरलेले असते किनाऱ्यावरील गुयाक्विल हे शहर पूर्वी मलेरियाग्रस्त होते. पण आता डास हटवल्यामुळे ते भरभराटीला येत आहे. अँन्डीज पर्वताच्या पूर्वेला फार मोठे प्रदेश मोकळे पडले असून तेथे अजूनही भाले फेकणारे रानटी ताम्र राहतात

क्षेत्रफळ २,८१,३४१ चौरस किलोमीटर्स
लोकसंख्या (१९७१) ६१७७,१२७
भाषा स्पॅनिश व ताम्रवर्णीय बोलभाषा
राजधानी क्विटो (५२८०९४)

## कोलंबिया

या देशाला पॅसिफिक व अटलांटिक अशा दोन्ही महासागराची किनारपट्टी लाभलेली आहे येथील स्वातंत्र्यचळवळ खूपच स्थानिक होती सन १८१० पर्यंत बोगोटा, तुजा आणि कार्टेजेना येथील वसाहतवाल्याचे तीन गट स्वतंत्र झाले होते व एकमेकात सामील व्हायची त्याची तयारी नव्हती सन १८१९ मध्ये बोलिव्हारने ओरिनोको नदीच्या वाटेने सैन्य घेऊन प्रवास केला. व बोगोटा येथे येऊन राजनिष्ठ सैन्याचा पराभव केला त्याने 'विशाल

कोलंबिया ' राज्य निर्माण केले. हे राज्य १८३० साली फुटले. व सध्याचे कोलंबिया राज्य ' न्यू ग्रॅनाडा ' या नावाने ओळखले जाऊ लागले. ' कोलंबिया ' हे नाव १८६३ मध्ये स्वीकारण्यात आले. या देशात उदारमतवादी व सनातनी अशा दोन्ही पक्षाचे झगडे नेहमी चालू असतात १९५० ते ५७ पर्यंत येथे हुकुमशाही होती आता लोकशाही आहे पण दर पाच वर्षांनी दोन मुख्य पक्षांपैकी एका पक्षाचा अध्यक्ष आलटून पालटून होतो.

नैसर्गिकदृष्ट्या कोलंबिया हा समृद्ध देश आहे कॅरेबियन समुद्रकिनारी खनिज तेलाचे प्रचंड साठे सापडले आहेत. कोलंबियातली कॉफी चविष्ट व दर्जेदार असते येथील शेतजमीन सुपीक आहे व तेथे सर्व प्रकारची पिके होऊ शकतात. हवामान वर्षभर एकसारखेच असते. समुद्रसपाटीपासूनच्या उंचीप्रमाणे त्यात बदल होतो इतकेच. अँन्डीज पर्वताच्या पूर्वेला प्रचंड मैदाने पसरली आहेत ती थेटपर्यंत ओरिनोको व ॲमेझॉन नद्यांच्या काठांच्या अरण्यापर्यंत जातात. कोलंबियामधील लिटिसिया येथून ॲमेझॉन नदीत प्रवेश करता येतो. या देशाच्या पूर्वेकडील $\frac{2}{3}$ भागात अजूनही लोकवस्ती नाही. त्या प्रदेशात आजही अश्मयुगीन जीवन जगणारे आदिवासी लोक राहतात आणि मिशनऱ्यांना नरभक्षकांनी खाऊन टाकलेल्यांचे वृत्तान्त अधूनमधून कानी येतात ! वाढती लोकसंख्या व जमिनदारी पद्धत हे या देशापुढील प्रमुख प्रश्न आहेत.

जगातील पाचूपैकी ९० टक्के पाचू या देशात सापडतात. तसेच अत्यंत दुर्मिळ प्लॅटिनम धातू येथे सापडतो

क्षेत्रफळ ११३८९१४ चौरस किलोमीटर्स

लोकसंख्या २१७९३८००.
भाषा स्पॅनिश
राजधानी बोगोटा (२६६३०००)

## व्हेनुझुएला

व्हेनुझुएलामध्ये काय नाही ते विचारा. अत्यंत उष्ण हवामाना-पासून बर्फाच्छादित हिमशिखरावरचे थंड हवामान, लोकशाही, संपत्ती, वनसंपत्ती सर्व काही येथे आहे. या देशात किनाऱ्यावरची ७२ बेटेही सामील आहेत. व्हेनुझुएला हे २० घटक राज्याचे संघराज्य आहे.

दक्षिण अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाचे वीर येथूनच निर्माण झाले. फ्रॅन्सिस्को-द-मिरांडा याने दक्षिण अमेरिकेतील गोऱ्यासाठी लंडन-मध्ये 'लौटारो लॉज' नावाची संस्था काढली होती. त्याने स्वातंत्र्यासाठी दोन वेळा उठाव केला व त्यातच त्याला प्राण गमवावा लागला. सिमान बोलिव्हार हा सेनापती व्हेनुझुएलातील श्रीमंत कुटुंबात जन्माला आला होता. त्याने व्हेनुझुएलाला स्वतंत्र केले. इतकेच नव्हे तर इतरही अन्य दक्षिण अमेरिकन राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळवून दिले. या देशामध्ये लोकशाही राज्यव्यवस्था आहे. फक्त सन १९५२ ते ५८ या दरम्यान हुकुमशहा जिमेनेझ याने बराच धुमाकूळ घातला होता तो सोडला तर लोकशाहीची परंपरा अखंड आहे.

हा झपाट्याने विकास पावणारा देश आहे. विकासाचा उत्साह प्रथम आला की पैसा प्रथम उपलब्ध झाला हे सांगणे कठीण आहे. 'मारीकैबू' सरोवरात खनिज तेलाचे अतिशय समृद्ध

तेलाचे क्षेत्र सापडले व त्यातून खूपच पैसा मिळू लागला जगातील खनिज तेलाच्या साठ्यापैकी सात टक्के साठे एकट्या मारिकैबू सरोवरात सापडले आहेत या खनिज तेलामुळे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर मिळू लागले देशाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता आली व विकासासाठी पैसा उपलब्ध झाला व्हेनुझुएलातील दर माणशी उत्पन्न दक्षिण अमेरिका खंडात सर्वात जास्त आहे. व्यक्तिगत उत्पन्नात तफावत फार आहे पण येथील मजूर संघटना प्रबळ असल्यामुळे ती तफावत लवकरच दूर होईल.

निसर्गाचे वरदान या देशाला चांगलेच लाभले आहे उत्तर किनारा जरी उष्ण हवामानाचा असला तरी तेथील हवामान कोरडे व आरोग्यदायी आहे देशातील सर्व वस्ती सूर्यप्रकाशात न्हावून निघणाऱ्या पर्वतराजींच्या प्रदेशात एकवटली आहे कराकास हे राजधानीचे शहर डोंगराच्या कुशीत समुद्रसपाटी-पासून ९१४ मीटर उंच आहे समुद्रकिनाऱ्याशी ते एका उत्तम राजमार्गाने जोडले आहे. हे शहर नेहमी विविध प्रकारच्या उद्योगाने गजबजलेले असते येथून अखिल अमेरिका महामार्गाने सँटिआगोला किंवा न्यूयॉर्कला जाता येते पण दक्षिण-पूर्वेकडे जाणारा रस्ता ओरिनोको नदीवरील प्रचंड पूल ओलांडतो व तेथेच थांबतो इलानॉस येथील विशाल मैदानांना या पूलाचा उपयोग होतो तेथे सध्या पशुपालनाचा व्यवसाय जोरात चालतो. या मैदानांच्या प्रदेशात सँटोटोमे येथे नवीन औद्योगिक शहर वसवले जात आहे तरीपण ओरिनोको नदीच्या खोऱ्यामधील फार मोठा प्रदेश अजून असंशोधित व अविकसित राहिला आहे

व्हेनुझुएलाच्या लोकसंख्येत पंचवीस टक्के गोरे व पासष्ट टक्के मेस्टिजो म्हणजे मिश्रवंशाचे लोक आहेत लोकसंख्येतील आठ

टक्के लोक नव्याने आलेले स्थलांतरित आहेत. सामाजिक सुधारणा व शिक्षण यामध्ये हा देश आघाडीवर आहे. येथील समाज दक्षिण अमेरिकेतील अत्यंत जागरूक समाज आहे.

क्षेत्रफळ : ९१२०५० चौरस किलोमीटर्स.

लोकसंख्या (१९७१) १०७७८०७१.

भाषा स्पॅनिश.

राजधानी : काराकास (२५३५३७९).

□

प्रकरण दहावे

## विसाव्या शतकातील शोध व मोहीमा

अटकामा येथील ताम्रवर्णीयांनी १५५० मध्येच प्रचंड उंचीच्या ज्वालामुखी पर्वतावर स्वाऱ्या केल्याचे पुरावे आहेत पण ही शिखरे चढण्यास सोपी होती त्याचप्रमाणे चिंबोराझो येथील हुम्बोल्टने पादाक्रांत केलेला ज्वालामुखी पर्वतसुद्धा त्या मानाने चढायला सोपाच होता. सर्व अमेरिका खंडातील सर्वांत उच्च शिखर इक्वेडोर देशातील ' एकॉन्गहुआ ' हे आहे त्याची उंची २२ हजार ९०० फूट म्हणजेच ६९७९ मीटर उच्च आहे या शिखरावर झुल्पिकेन हा गिर्यारोहक १८९७ मध्ये चढला आता तेथे जाणे खूपच सोपे आहे अनेक हौशी प्रवासी तेथे जात असतात

गिर्यारोहकाच्या दृष्टीने त्याना आव्हान देणारा पर्वत म्हणजे पेरु देशातील रिओ-सान्टो-नदीच्या खोऱ्यामधील ' कोर्डिलेश ब्लॅका ' आणि कॉर्डीलेरा हुआहुशा ही पर्वतशिखरे आहेत. या शिखराचे कडे भितीसारखे सरळ उभे आहेत १९५१ साली अमेरिकेतील दोन कॉलेज विद्यार्थ्यांनी ही शिखरे पादाक्रांत केली रिओ-सान्टोच्या खोऱ्यात व ब्लाका प्रदेशात १९३० च्या आसपास

ऑस्ट्रियन व जर्मन गिर्यारोहकानी बहुतेक सर्व उच्च पर्वतशिखरे पादाक्रांत केली होती

१९५० नंतर अॅन्डीज पर्वतावर गिर्यारोहणाचे नवे पर्व सुरू झाले अमेरिका, युरोप व जपान येथून शेकडो गिर्यारोहक अॅन्डीज पर्वतावर स्वाऱ्या करू लागले. अजून जिंकायच्या राहिलेल्या अनेक पर्वतशिखरावर विजय मिळविण्यात आले. न्यूझीलंडच्या गिर्यारोहकांनी 'कायेस' हे शिखर जिंकले तर फ्रेंचानी अल्पा-मायोचे 'पिरॅमिड' सारखे शिखर जिंकले. ऑस्ट्रियनानी 'निरिशाका' हे शिखर जिंकले कुझको शहरातून दिसणारे सालकान्टे हे दुर्गम शिखर फ्रेंच गिर्यारोहकानी पादाक्रांत केले. तरुण इंग्रज गिर्यारोहकांनी 'उमासिलो' हे शिखर जिंकले. सर्वात कमाल इटालियन गिर्यारोहकानी केली. पॅन्टागोनियाच्या प्रतिकूल हवामानात उभ्या भिंतीसारखे व ठिसूळ खडकाचे बनलेले 'सेरे-टोरो' हे शिखर जिंकले याशिवाय त्यानी आणखी शभर दुर्गम पर्वतशिखरावर आरोहण केले.

कार्टेजेना आणि मेरिडाच्या उत्तरेला विषुववृत्ताजवळ असलेली बर्फाच्छादित हिमशिखरे सहज जिंकता आली. पूर्व ब्राझीलमधील कठीण खडकाची उच्च शिखरे १९१२ मध्ये पादाक्रांत करण्यात आली तेथीलच 'पिनायकल ऑफ इटाबिया' हे शिखर १९६० मध्ये पादाक्रांत करण्यात आले. आता दक्षिण अमेरिकेतील २० हजार फूटापेक्षा किंवा ६०९६ मीटर उंचीपेक्षा उच्च असलेल्या प्रत्येक पर्वतशिखरावर गिर्यारोहक आपले निशाण रोवून आले आहेत

□

प्रकरण अकरावे

# भवितव्य

दक्षिण अमेरिकेतील बहुतेक राष्ट्रे स्वतन्त्र होऊन दीडशे वर्षांचा काळ लोटला आहे. तरी या सर्व देशात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली आहे असे दिसत नाही जमीनदारी पद्धत अजूनही अस्तित्वात असल्यामुळे जमिनीच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न गंभीर आहे दक्षिण अमेरिकेतील बरीच लोकसंख्या शहरातूनच राहते तेथे आता नवीन मध्यम वर्ग तयार झाला आहे आणि आपले कमी पगार व चलनवाढ व महागाई यांविरुद्ध तो आवाज उठवू लागला आहे, शिवाय परकीय भांडवलाविरुद्धही सर्वत्र असंतोष आहे अमेरिकेचे तीन हजार अब्ज डॉलरचे भांडवल या भागात गुंतले आहे तर ब्राझीलमध्येच इंग्लंडचे भांडवल चौदाशे अब्ज डॉलरचे होते

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ् केनेडी याना अखिल अमेरिकन चळवळीमध्ये रस होता दक्षिण अमेरिकेत केनेडी बरेच लोकप्रिय झाले होते. त्यांनी सुरू केलेल्या मदतीच्या कार्यक्रमानुसार अमेरिकेने दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांना एक हजार अब्ज डॉलरची मदत दिली आहे.

येथील सर्व राष्ट्रे विकासासाठी धडपड करीत आहेत तेथे

नैसर्गिक सपत्ती विपुल आहे आणि योग्य दिशेने प्रयत्न केल्यास ती लवकरच वैभवसपन्न बनू शकतील. पण त्यानी आपली लोकसख्या नियत्रित ठेवली पाहिजे, तरच समाजकल्याणाच्या व विकासाच्या योजना यशस्वीरित्या अमलात येतील

दक्षिण अमेरिकेत विमानातून सर्वेक्षण सुरू झाल्यापासून प्रत्येक स्थळाचा नकाशा तयार झाला आहे पण जमिनीवरून अद्याप माणसाचा स्पर्शही झाला नाही असे विस्तृत प्रदेश शिल्लक आहेत. १९६८ मध्ये एका ब्रिटिश हावरक्राफ्टने अमेझॉन ते त्रिनिदाद असा प्रवास केला ते हॉवरक्राफ्ट अमेझॉन नदीच्या मुखाच्या आत शिरले आणि ॲमेझान व आरिनोको या नद्या जेथे जोडल्या जातात त्या कॅसिक्वायरे कालव्यातून ते ओरिनोको नदीत उतरले माईपुरेस या अवघड उताराच्या भागातूनही ते सहज पुढे गेले. या धाडसी प्रवासामुळे असशोधित राहिलेला अमेझॉन खोऱ्यातील प्रदेश आता ढवळून निघू लागला आहे ॲमेझॉन नदीमध्ये सुप्त सामर्थ्य दडलेले आहे. या नदीवर एक धरण बांधल्यास त्यातून निर्माण होणारी विद्युतशक्ती दक्षिण अमेरिका खडात राहणाऱ्या सतरा कोटी लोकाना पुरू शकेल

५८७३५ प्र.
२७९११

REFBK-0021999